# श्रीमद्विद्यारण्यस्वामीविरचितसार्थसद्गुरुप्रार्थना

लेखक-ब्रह्मश्री पंडित आत्मारामशास्त्री जेरे

ब्रह्मविदाशीर्वाद पद्धति किंवा द्विपंचाशत् प्रार्थना किंवा प्रार्थना द्विपंचाशत्कं अशा नावाचा ग्रंथ पदवाक्य प्रमाण पारावारीण शब्दब्रह्मात व परब्रह्मात निष्णात अशा विद्यारण्यस्वामी महाराजांनी केला आहे. यांच्या लेखनाची शैली फार अपूर्व आहे. कोणतेही प्रमेय स्पष्ट करून सांगण्यात यांचा हातखंडा आहे. यांनी एकशेचार ग्रंथ त्या त्या शास्त्रावर केले आहेत असे म्हणतात. यांच्या बुद्धीची गती सर्वत्र अप्रतिहत अशी

होती. हे खरोखरच सर्वज्ञ व ईश्वरावतार रूपच होते. सर्व वेदांवर व शास्त्रांवर यांच्या व्याख्या आहेत. एवढेच नव्हे तर हे राज्य चालविण्यात निष्णात होते. त्यांनीं बुक्क नांवाच्या राजाचे प्रधानपद घेऊन साम्राज्याचा गाडाही उत्तम रीतीने पूर्वाश्रमात चालविला होता असे त्यांच्याच **'तस्यविभोरभूत्कुलगुरुर्मन्त्रीतथामाधवः'**। या मीमांसा अधिकरण न्यायमालेतील श्लोकाच्या चतुर्थ चरणावरून सिद्ध होते. हे परम ईश्वरभक्त व वादविवादपटू असे पंडितही होते. असेही प्रमाणावरून सिद्ध झाले आहे. रोजचे भजन झाले म्हणणे विद्यारण्यकृत प्रार्थना रोज चार याप्रमाणे म्हणण्यात व दुसऱ्या कोणीतरी प्रत्येक प्रार्थनेनन्तर तथास्तु तथास्तु तथास्तु असे त्रिवार म्हणावे अशी परमपूज्य प्रातःस्मरणीय गुरुचरण प. प. वासुदेवानंद सरस्वती श्री चरणांची आज्ञा आहे व त्यांचे पट्टशिष्य श्री दीक्षितस्वामीमहाराज यांचे परंपरेत भजनोत्तर अशा प्रार्थना झालेल्या मी लहानपणी ऐकलेल्याही आहेत. परमपूज्य गुळवणी महाराजांनी या प्रार्थनांचे भाषान्तर मराठीत करून पंथराजात छापण्यास द्यावे, कारण प्रार्थना संस्कृत असल्याने संस्कृत भाषानभिज्ञास त्याचा तितका उपयोग होणार नाही, अर्थज्ञानसहित प्रार्थना म्हटल्यास एक विलक्षण आनंद निर्माण होईल, अशी आज्ञा केल्याने सर्वसाधकरूप परमेश्वराची सेवा म्हणून प्रार्थनासहित भाषांतर यथामती केले आहे. त्याचा लाभ सार्थ प्रार्थना करून साधक संत सज्जन घेतील व प्रार्थनेतील तत्त्वज्ञान तुझ्या आंगीही आमच्या प्रमाणेच बाणो असा आशीर्वादही मला देतील अशी आशा किंवा प्रार्थना त्यांचेकडे मी करीत आहे.

भगवद्गीतेत 'नहिज्ञानेन सदृशं पवित्रमिहविद्यते । तत्स्वयंयोग संसिद्धः कालेनात्मनिविंदति, असे चौथ्या अध्यायातील अडतिसाव्या श्लोकात भगवंतानी अर्जुनाला म्हटले आहे. भगवान् म्हणतात अर्जुना ज्ञानासारखे पवित्र या जगात दुसरे काही नाही. प्राणिमात्राला पवित्र करणारी गंगा, कृष्णा, नर्मदा इत्यादि तीर्थे व अनंत क्षेत्रे वगैरे पुष्कळ पदार्थ आहेत. परंतु मुळासहित पाप घालविणे म्हणजे पाप करण्याच्या वासनेसहित पाप घालविणे हे त्यांचे सामर्थ्य नाही. कारण तीर्थक्षेत्रादिकास जाऊन आलेले किंवा प्रायश्चित्तादिकांचे अनुष्ठान केलेले लोक पुनः पातक करतातच म्हणजे यांचे हे सर्व कर्म गजस्नानाप्रमाणे आहे. म्हणजे हत्ती जसा स्नान करून पुनः आपल्या अंगावर धूळ उडवून घेतो ते त्याचे स्नान फुकट होते त्याप्रमाणे पापाचे मूळ जे अविद्यावत्

कार्य, काम, कर्म व वासना या नष्ट झाल्याशिवाय समूळ पाप जाणार नाही. ज्ञान हे सर्वांचे मूळ जी अविद्या तिचाच नाश करते म्हणून पुन: पाप उत्पन्नच होत नाही. यासाठी ज्ञानासारखे पवित्र करणारे जगात दुसरे नाही. ते ज्ञान होण्याला पुष्कळ काळ लागतो. त्याकरता निष्काम कर्मयोगाचे अनुष्ठान निष्ठेने करावे लागते म्हणजे तो योग संसिद्ध होतो व तत्त्वज्ञानाला अधिकारी होतो. मशागत करून जमीन तयार झाल्यावर बीज जमिनीत लवकर उगवते त्याप्रमाणे ज्ञानाचे बीज अंत:करणरूप जमिनीत म्हणजे योगसंसिद्ध अन्त:करणात लवकर रुजते. जमीन तयार झाल्यावर अंकुरोत्पत्तीला पाण्याची जशी आवश्यकता असते त्याप्रमाणे योगसिद्ध अन्त:करणाला श्रवण, मनन, निदिध्यासनाप्रमाणे कळकळीने संतांच्या चरणी तत्त्वज्ञान होण्याबद्दल प्रार्थना करणे हेही एक मोठे साधन आहे. संत दयाळू असल्याने मेघाप्रमाणे आपली आशीर्वादरूप जलवृष्टी साधकावर करतात. त्यायोगे ते साधक सिद्ध होतात. 'सकलमिदमहंचवासुदेव:' म्हणजे हे सर्व जगत् व मी सर्व वासुदेवरूप आहे. वासुदेवाहून दुसरा पदार्थ जगात नाही. या परमोच्च ज्ञानानेच मनुष्य कृतार्थ होतो. त्या वासुदेवालाच ब्रह्म परमात्मा भगवान् असे म्हणतात, असे भागवतात स्पष्ट म्हटले आहे '**एकमेवाद्वितीयं**' असे म्हणजे द्वैतरहित एक अद्वितीय तत्त्वच सर्व चराचर जगरूपाने नटले आहे. अशा या भगवत्स्वरूपाचे ज्ञान त्याच्याशी प्रत्यक्ष सर्व व्यवहार करीत असताही प्राण्याला नाही याचे काही कारण अवश्य असले पाहिजे व ते कारण म्हणजेच अविद्या किंवा माया हे होय. या मायेचा नाश तत्त्वज्ञान झाल्याशिवाय होत नाही व हे तत्त्वज्ञान भगवान् किंवा तद्रूप झालेले जे संत यांना शरण गेल्याशिवाय व यांची प्रार्थना केल्याशिवाय होत नाही म्हणून श्रवणमनन निदिध्यासनाप्रमाणे किंबहुना त्यापेक्षाही अधिक प्रमाणात संतांची प्रार्थना करणे हे साधकांचे आद्य कर्तव्य आहे. संत हे स्वभावत:च उदार असतात. परंतु प्रार्थनेशिवाय ते वळत नाहीत. आई सुद्धा मूल रडू लागले म्हणजेच त्याला दूध पाजून शांत करते. एरवी ते संतुष्ट आहे असे समजून ती त्याच्याकडे पाहात नाही. संतस्वरूप आईचेही तसेच आहे. साधक आर्त होऊन जेव्हा कळवळून रडून प्रार्थना करील तेव्हांच त्याच्यावर ते प्रसन्न होऊन आशीर्वाद देतात व त्याला कृतार्थ करतात. या करता या प्रार्थनांची अत्यंत आवश्यकता आहे म्हणून त्या सार्थ प्रार्थना पंथराजात देण्याचा विचार केला आहे. त्याचा योग्य फायदा साधक घेतीलच.

**प्रार्थना पहिली :—**

हिरण्यगर्भादिस्थावरान्तेषु शरीरेषु यदेकं चैतन्य मस्ति तदेवाह मस्मीति दृढ ज्ञानसिध्दिर्भूयादिति भवन्तो महान्तोऽनुगृण्ह्न्तु ॥१॥ तथास्तु तथास्तु तथास्तु ॥

**विवरण :—**

' हिरण्यगर्भः समवर्तं ताग्रेभूतस्यजात: पतिरेक आसीत् ।'

या श्रुति प्रमाणे मायाविशिष्ट चैतन्यरुप परमात्यानें जगातील सर्व प्राण सर्व इंद्रिये व सर्व अन्त:करणरूप समष्टी म्हणजे समुदायरूप सूक्ष्म-शरीररूप उपाधीत प्रविष्ट होऊन म्हणजे त्या उपाधीशी तादात्म्य पावून 'जीवति प्राणान् धारयति' या व्युत्पत्तीस अनुसरून आपणाला जीव असे नाम धारण केले व या समष्टीस आपले शरीर मानलेल्यामुळे तो परमात्मा हिरण्यगर्भरुप जीव झाला. हा पहिला जीव आहे. या जीवाचा अन्तर्यामी जो परमात्मा त्याने या हिरण्यगर्भाला स्वस्वरूपाचे म्हणजे शुद्ध बुद्ध मुक्त अशा परब्रह्माचे वेदप्रदानपूर्वक ज्ञान दिले व इतर हे सर्व विषयाचे ज्ञान दिले व त्याच्याकडून सर्व सृष्टी निर्माण करविली. जगातील सर्व अन्त:करणात तेच एक चैतन्य भरून राहिले आहे. गवताचे शरीर धारण करणाऱ्या जीवालाही सूक्ष्म शरीर आहेच. हिरण्यगर्भरूप समष्टि सूक्ष्म शरीर धारण करणारा जीव जसे समष्टि-स्थूल शरीर धारण करतो त्याप्रमाणेच व्यष्टि एक व्यक्तिरूप हिरण्य-गर्भाचा भाग विराट शरीराचा एक भाग असणारे स्थूल शरीर धारण करतो. हे स्थूल शरीर सर्व समष्टिस्थूल शरीराचाच एक लहानसा भाग असल्याने व त्यात सर्व इन्द्रिये व सर्व अन्त:करणे यांचा विकास नस-ल्याने ही स्थावर शरीरे (गवत वगैरे) सर्व जीव शरीरापेक्षा अत्यंत खालच्या दर्जाची आहेत. यांना 'स्तंब' अशी संज्ञा आहे. 'ब्रह्मादिस्तंब-पर्यन्त' असा यांचा नामनिर्देश शास्त्रात आहे. हिरण्यगर्भाच्या विराट्रूप स्थूल शरीराला आरंभ करून स्तंबादि स्थूल शरीरापर्यंत जेवढी शरीरे आहेत त्या सर्वात प्रगट झालेले जे एक चैतन्य आहे तेच मी आहे. स्थूलसूक्ष्म व्यष्टिसमष्टिरूप उपाधि सोडून दिल्यास उपाधिरहित अखंड एक निर्विकल्प चैतन्यच मी आहे. म्हणजे मी ब्रह्म आहे असे अत्यंत दृढ ज्ञानरूप जी सिद्धि ती मला व्हावी असा अनुग्रह परमपूज्य सर्व संत महात्म्यांनी माझ्यावर करावा व मला कृतार्थ करावे अशी माझी आपल्या चरणाजवळ प्रार्थना आहे. ही प्रार्थना मोठ्या कळकळीने केलेली ऐकून सर्व संतश्रेष्ठ तथास्तु म्हणजे सर्व जगातील उपाधीमध्ये

असणारे एक अद्वितीय स्वयंप्रकाश सच्चिदानंदरूप जे परब्रह्म तत्त्व आहे तेच तू आहेस अशी दृढ बुद्धि तुला होवो असा आम्हीं त्रिवार तुला आशीर्वाद देतो व तो कायावाचामनाने देतो. तुझे कल्याण होवो म्हणजे तुझे स्वतःचे जे सच्चिदानंद स्वरूप ते तुला लाभो ते तुझेच स्वरूप असून गळयात असून विसरलेल्या अलंकाराप्रमाणे ते भ्रमाने नाहीसे झाल्याप्रमाणे झाले आहे ते तुला मिळो व तू कृतार्थ हो ॥१॥

## प्रार्थना दुसरी :-

**लय-विक्षेप-कषाय-रसास्वादेभ्योरक्षितं चित्तमविघ्नेन ब्रह्मण्यवस्थितं भूयादिति भवन्तो महान्तोऽनुगृण्हन्तु ॥ तथास्तु तथास्तु तथास्तु ॥**

**विवरण** – लय-विक्षेप-कषाय व रसास्वाद या चार विघ्नापासून रक्षित असे माझेचित्त निर्विघ्नपणे परब्रह्माच्या ठिकाणी अवस्थित म्हणजे स्थिर होवो अशी आपणा संतश्रेष्ठांच्या चरणकमलीं माझी प्रार्थना आहे. सर्व स्थिर चरांत व्यापून असलेलें ब्रह्मचैतन्य मी आहे. अशी दृढबुद्धि मला देण्याबद्दल संतांची प्रार्थना मी प्रथम केली. परंतु माझ्या चित्ताची तयारी असल्याशिवाय संतांचा आशीर्वाद फलद्रूप कसा होणार व तशी मनाची तयारी संतांच्या सदिच्छारूप आशीर्वादा-नेच होणार. अनेक जन्मात केलेली पापें परमार्थमार्गांतून साधकाला खालीं ओढण्या करता विघ्नरुपाने त्याचेंकडे येतात. त्यामुळें अंतःकरण परब्रह्माचे ठिकाणी स्थिर होऊ शकत नाही. साधक जर परब्रह्मरूप झाला तर सर्वच जगाला त्याच्या ताब्यात राहावे लागते. आतांपर्यंत आमच्या ताब्यात असणारा साधक ब्रह्म होऊन आतां आमच्यावर तो आपली सत्ता गाजविणार हें जाणून त्या विघ्नांना बरें कसें वाटणार ? म्हणून तीं विघ्नें साधकाला सन्मार्गांतून भ्रष्ट करण्याकरतां अहोरात्र धडपडत असतात. साधक एकटा व विघ्ने पुष्कळच आहेत त्या सर्वांच्या तावडीतून त्याला सुटले पाहिजे तरच पुढचा मार्ग त्याला आक्रमण करता येईल. देव, स्त्री-धन-कीर्ति-प्रतिष्ठा-इत्यादि अनेक प्रकारचे पाश साधकावर टाकतात. त्यांना न जुमानतां त्यांतून सुटून साधक एकान्तात जाऊन अभ्यास करू लागला तर मग ते देव लय-विक्षेप-कषाय व रसा-स्वाद या अंतरंग विघ्नांनीं त्याला साधनापासून भ्रष्ट करण्याचा प्रयत्न करतात. बहुतेक साधक बहिरंग विघ्नांतूनच साधन भ्रष्ट होऊन देशोधडी जातात. श्रीहरि गुरुकृपेने एखादा त्या संकटातून निसटलाच तर ही दबा धरून बसलेली अंतरंग विघ्ने साधकाला भ्रष्ट करण्याचा प्रयत्न करतात, कारण देव त्यांचे साहाय्यक असल्याने त्यांचा आश्रय या

विघ्नांना असतो. प्रथम विघ्न अभ्यासूला 'लय' नांवाचे आहे. ब्रह्माकारवृत्ती करण्याचा अभ्यास करणारा साधक 'लय' म्हणजे निद्रा तिला वश होतो. युक्ताहार विहारांनी ती निद्रा त्याला जिंकावी लागते. अज्ञानातील तमोगुणांत चित्ताचा लय न होऊं देता त्याला जागृत ठेवणें फार कठीण आहे. झोपेपुढें कांहींच चालत नाहीं व ती प्राण्याला फार प्रिय आहे कारण निद्रेत मोठा आनंद असतो व दुःख कोणतेही नसतें. मग तिचा स्वीकार कोण मनापासून करणार नाही बरें? एखाद्याने युक्ताहारादि नियमाने झोप जिंकलीच तर बहिर्वृत्तिरूपविक्षेप त्याला पकडण्याकरता तयारच आहे. सिनेमा पाहा. नाटक पाहा. तमाशा पाहा. रेडिओ ऐका, निदान वर्तमानपत्र वाचा. हे न झाले तर शेजाऱ्याच्या घरी जाऊन भाकड गप्पा मारीत बसा. अशा अनेक बहिर्वृत्ति त्याला सारख्या खेंचत असतात. यातून तो सुटणार कसा? महद्‌भाग्याने संतसंगती लागून यातूनही सुटला तर 'कषाय' नांवाचे विघ्न त्रास देण्यास तयारच असते. झोपही नाही व बहिर्वृत्तीही नाही अशी स्तब्धावस्था तिला कषाय म्हणतात. शेतात काम करणाऱ्या बैलामध्ये काही बैल असे असतात की ते एकदाका स्तब्ध होऊन बसले की कितीही चाबूक मारले तरी उठतच नाहीत. तसे हे मन बैलासारखे स्तब्ध होऊन जाते. ते ब्रह्माकार वृत्ति कितीही प्रयत्न केला तरी धरतच नाही. ही कषाय अवस्था सत्कर्मानुष्ठानाने नाहीशी करावी लागते. 'कषायेकर्मभि:पक्वे' असे शास्त्र सांगते. मनांतील कषाय ही नाहीसा करून अहंब्रह्मास्मि अशी वृत्ति निर्माण झाल्यास परमानंदाचा अनुभव येतो. तो आनंद निर्विकल्प स्वरूप असतो. परंतु त्या वेळी मी किती परमानंदात आहे अशी जर वृत्ती झाली तर तो साधक पुनः विक्षेप या अवस्थेला प्राप्त होतो. यालाच 'रसास्वाद' असे म्हणतात. परंतु पूर्वी वर्णन केलेल्या विक्षेपाप्रमाणे हा ही विक्षेप साधकानी टाकलाच पाहिजे. नाहीतर इतके केलेले श्रम फुकटच होणार. तरी या चार विघ्नांचा नाश होऊन ब्रह्मस्वरूपाचे ठिकाणी माझे चित्त निरंतर राहो म्हणजे निर्विकल्पसमाधि होवो असा अनुग्रह आपण संतश्रेष्ठ करा अशीं माझी आपल्या जवळ दुसरी प्रार्थना आहे. यावर संतमहात्मे तसेच होवो असे त्रिवार म्हणाले ॥२॥

**प्रार्थना तिसरी :-**

**नित्यनिर्विकारासंगाद्वितीय परिपूर्ण सच्चिदानन्द स्वप्रकाश ब्रह्मानुभव सिद्धिर्भूयादितिभवन्तो महान्तोऽनुगृण्हन्तु ॥ तथास्तु तथास्तु तथास्तु ॥३॥**

**विवरण**—पूर्वी केलेल्या दुसऱ्या प्रार्थनेप्रमाणे लयविक्षेपादि दोषांनी रहित चित्त झाले असता, भूत, वर्तमान व भविष्य कालामध्ये ज्या ब्रह्माचा कधी अभावच नाही म्हणजेच ते कालत्रयामध्ये सर्वदा विद्यमान आहे. उत्पन्न होणे, कालाशी संबद्ध होणे, वाढणे, घटणे, परिणाम पावणे व नाश पावणे हे सहा प्रसिद्ध विकार व भूक लागणे, तहान लागणे, शोक होणे, दुःख होणे, इत्यादि अनंत विकार देह इन्द्रिय प्राण मन व बुद्धी यांचेच आहेत. ब्रह्म हे सर्वदा सर्वविकारशून्य आहे व ब्रह्म हे असंग म्हणजे कोणाचाही वास्तविक संबंध नसणारे असे आहे. ब्रह्माहून इतर सर्व दृश्य पदार्थ काल्पनिक म्हणजे खोटे असल्याने व काल्पनिक पदार्थांनी सद्वितीयत्व येत नसल्याने ब्रह्म अद्वितीय आहे व अद्वितीय असल्याने ते परिपूर्ण म्हणजे सर्वत्र भरून उरले आहे. ते 'सत्' म्हणजे त्रिकालाबाधित, 'चित्' म्हणजे ज्ञानरूप व आनंदरूप आहे. सर्व जीवांना जो आनंदानुभव येतो तो या ब्रह्मानंदाचाच एक लेश आहे व ब्रह्म हे आनंदसमुद्र आहे व ते ब्रह्म स्वप्रकाश आहे. म्हणजे दुसऱ्या कोणापासून प्रकाशित न होता त्या सर्वांना प्रकाशित करणारे असे प्रकाशरूप आहे. अशा ब्रह्माचा प्रत्यक्षानुभव म्हणजे जसा मला माझा प्रत्यक्ष अनुभव आहे तसा या ब्रह्माचा मला अनुभव यावा. माझा अनुभव मला दुसऱ्या कोणाकडून होत नाही. मला स्वतःलाच स्वतःने अनुभव येतो. इतर इंद्रियादि माझ्या योगाने प्रकाशित आहेत. त्यांच्याकडून माझा अनुभव मला कसा होणार ? मीच त्यांना सत्ता व प्रकाश दिला आहे. अर्थात् माझ्या अनुभवाप्रमाणेच ब्रह्माचाही अनुभव मला व्हावा म्हणजे अज्ञानाने आलेला अब्रह्मभाव जाऊन माझा स्वयंसिद्ध जो ब्रह्मभाव त्याचा अनुभव मला यावा असा आशीर्वाद आपण संतांनी मला द्यावा अशी प्रार्थना आहे. ती ऐकून संतश्रेष्ठ तसाच तुला ब्रह्मानुभव येवो असे त्रिवार म्हणाले ॥ ३ ॥

## प्रार्थना चौथी

अहमादिदृश्यविलक्षणाऽस्मत्प्रत्ययानुभूत प्रत्यक्चिन्मात्रानुभव सिद्धिर्भूयादिति भवन्तो महान्तोऽनुगृह्णन्तु ॥ तथास्तु तथास्तु तथास्तु ॥ ४ ॥

**विवरण** – मन, बुद्धी, अहंकार व चित्त ज्ञानेन्द्रिये व कर्मेन्द्रिये दहा प्राणाचा नादिमुख्य गौणप्राण यांनी युक्त देहाशी या सर्वांच्या आंत असलेल्या चैतन्याचा काल्पनिक तादात्म्यसंबंध घेऊन अहं म्हणजे मी अशी एक वृत्तिरूप अनुभूती सर्वांना असते. ही अनुभूती आत्मा व अनात्मा यांची मिश्रानुभूती आहे म्हणजे शर्करा मिश्रित दूधाप्रमाणे

डालडा मिश्रित तुपाप्रमाणे किंवा जल मिश्रित दुधाप्रमाणे संकीर्णानुभव आहे. शुद्ध आत्म्याचा किंवा शुद्ध अनात्म्याचा हा अनुभव नव्हे. माझे अंत:करण, माझी इन्द्रिये, माझे प्राण किंवा माझे शरीर असा जो ममत्वाने किंवा इदंत्वाने जो अनुभव तो अन्त:करणादिकांचा शुद्ध अनुभव म्हणता येईल. तसेच अहं ब्रह्म असा जो आतील शुद्ध चैतन्याचा अनुभव व त्याला आत्म्याचा शुद्ध अनुभव म्हणता येईल किंवा मी या अन्त:करणादिकापासून अगदी वेगळा आहे हे अन्त:करणादि माझे विषय आहेत व मी यांचा द्रष्टा आहे असा जो आत्म्याचा अनुभव त्यालाही शुद्ध आत्म्याचा अनुभव म्हणता येईल. यालाच इदंत्वानें अन्त:करणादिकांचा व अहंत्वाने तद्भासक चैतन्याचा अनुभव असे म्हणता येईल. श्रवण मनन निदिध्यासनरूपसाधनाने आत्मा व अनात्मा यांचा साक्षात्कार झाल्याशिवाय प्रत्यक्षात्मक असा अनुभव कोणालाही नसतो. वेदान्त शास्त्राच्या परिपूर्ण अभ्यासाने प्रमाण, असंभावना व प्रमेयासंभावना गेल्यातरी देहादिक दृश्य आहेत व मी त्याहून वेगळा असा द्रष्टा आहे असे परोक्षज्ञानच होते. त्या ज्ञानाचाही पुष्कळ उपयोग आहे. परंतु ते ज्ञान परिपूर्ण नव्हे. निदिध्यासन करून विपरीत भावना म्हणजे मी अन्त:करणादिस्वरूप आहे अशी भावना जोपर्यंत जात नाही तोपर्यंत श्रवण मनन सहित झालेले शास्त्रजन्य ज्ञान खरोखर अपरोक्ष असून सुद्धा परोक्षाप्रमाणेच असते. आपण प्रत्यक्ष असल्याने आपल्याविषयी कोणत्याही प्रमाणाने झालेले ज्ञान प्रत्यक्षच असणार. जसे आपले सुख आपण उपभोगीत असता दुसऱ्या माणसाने तू सुखी आहेस असे उच्चारलेल्या शब्दापासून झालेले माझ्या सुखाचे ज्ञान मला शब्दजन्य असले तरी ते प्रत्यक्षच आहे असा वेदांत शास्त्रचा सिद्धान्त आहे. अशा 'तत्त्वमसि' या वाक्यातील त्वं पदार्थात असलेल्या शुद्ध आत्म्याचे प्रत्यक्षज्ञान मला व्हावे. हे ज्ञान झाल्यावर मग तत्त्वमसिवाक्यातील शुद्ध तत्पदार्थाचे ज्ञान होऊन तत्त्वंपदार्थातील शुद्ध आत्म्याचे ऐक्यरूप महावाक्यार्थ ज्ञान होण्यास वेळ लागणार नाही. तरी हे 'प्रत्यक्' म्हणजे असत्जड वदु:स्वरूप असणाऱ्या म्हणजे अन्त:करणादि सर्व पदार्थांच्यापेक्षा सत्, चित् व आनंद म्हणजे कालत्रयाबाधित ज्ञान व आनंदरूप सुख या रूपाने अत्यंत विलक्षण असा जो आत्मा त्याचे म्हणजे शुद्ध अहंचे ज्ञान मला होवो अशी संतमहात्म्यांनी माझ्यावर कृपा करावी अशी माझी प्रार्थना आहे. ती मानून सर्व संतानी शुद्ध 'प्रत्यक्' आत्म्याचा साक्षात्कार तुला होवो असा आशीर्वाद त्रिवार दिला ॥ ४ ॥

## प्रार्थना पाचवी

सजातीय विजातीय स्वगत भेदरहिताखंड सच्चिदानंदाद्वितीय ब्रह्मानुभव सिद्धिर्भूयादिति भवन्तो महान्तोऽनुगृण्हन्तु ।। तथास्तु तथास्तु तथास्तु ।। ५ ।।

**विवरण** – पूर्वीच्या चौथ्या प्रार्थनेत तत्त्वमसि वाक्यातील त्वं पदार्थाच्या शुद्ध स्वरूपाचा साक्षात्कार मला होवो अशी प्रार्थना म्हणजे मागणी केली. त्याप्रमाणेच महावाक्यातील तत् पदार्थाच्या शुद्धस्वरूपाचे ज्ञान होवो अशी मागणी करावयाची आहे. सर्वज्ञ सर्वशक्ति जगदुत्पत्ति-स्थिति लय करणारे जे ईश्वर रूप मिश्रित स्वरूप आहे म्हणजे मायायुक्त ब्रह्मस्वरूप आहे त्याहून विलक्षण म्हणजे सजातीय विजातीय व स्वगत अशा तीन प्रकारच्या भेदाने रहित अखंड म्हणजे काल्पनिक भाग किंवा भेद रहित द्वितीय रहित शुद्ध सच्चिदानंद स्वरूप जे ब्रह्म तत्पदार्थाचे लक्ष्य स्वरूप आहे त्याच्या अनुभवाची सिद्धी मला होवो अशी प्रार्थना आहे. आंब्याच्या झाडाप्रमाणेच वृक्ष या रूपाने त्याच्याशी सजातीय फणस वगैरे इतर झाडे आहेत. आंब्याचे झाड सजातीय फणसादिकांच्या झाडाहून वेगळे आहे. असा सजातीय भेद त्यात आहे. त्याप्रमाणे तत्पदार्थ जे परब्रह्म त्याच्या सजातीय असे दुसरे ब्रह्म जगात नाही. जीव सच्चिदानंदरूपाने ब्रह्मालाच सजातीय म्हणता येईल. परंतु तो वस्तुतः ब्रह्माहून वेगळा नाही. अन्तःकरणादि उपाधीने तो वेगळा म्हणणे शक्य आहे परंतु उपाधियुक्त जीव मिथ्या असल्याने तो सत्य ब्रह्माशी सजातीय होऊ शकत नाही. मिथ्या व सत्य यांचे सजातीयत्व होऊ शकत नाही. शुद्ध म्हणजे उपाधीरहित जो जीव तो परब्रह्मस्वरूपच असल्याने त्याचा भेद ब्रह्माशी होऊ शकत नाही. म्हणून तत्पदलक्ष्य शुद्ध ब्रह्म सजातीय भेद रहित आहे. ब्रह्माशी विजातीय म्हणजे असत्-जड व दुःखरूप अशी माया किंवा अविद्या असल्याने तिचा भेद ब्रह्मात येऊन ब्रह्म विजातीयाच्या भेदाने युक्त होण्याचा संभव आहे. पण माया व तिचे कार्य मिथ्या असल्याने तिचा भेद ही मिथ्याच असणार. 'यादृशोयक्षस्तादृशोबलिः' म्हणजे यक्ष ज्या योग्यतेचा त्याचा बली सुद्धा त्याच योग्यतेचा अशा या न्यायाने खोटया मायेचा भेदही खोटा व खोटया भेदाने आलेला वेगळेपणाही खोटा असे असल्याने विजातीयाच्या खऱ्या भेदाने रहित ब्रह्म असल्याने वस्तुतः ब्रह्म विजातीय भेदाने रहित आहे असेच आहे. ब्रह्म हे निर्भाग निरवयव म्हणजे अंश अथवा अवयव इत्यादिकांनी रहित आहे. ज्याप्रमाणे वृक्षात शाखा पाने फुले मुळे फळे

वगैरे वृक्षस्वरूपान्तर्गत भेद असतो. म्हणजे पाने शाखा फुले म्हणजे वृक्ष नव्हे. वृक्ष म्हणजे या प्रत्येकाहून वेगळा एक अवयवी आहे. त्यामुळे अवयव व अवयवी यांच्यात स्वगत भेद संभवतो. ब्रह्म हे निरवयव निर्भाग असल्याने तसा स्वगत भेद ब्रह्मात संभवत नाही. असा स्वगत भेद ब्रह्मात वास्तविक असता तर ब्रह्म हे एक वृक्षांप्रमाणे अवयवी झाले असते व जे अवयवी पदार्थ असतात ते अवयव नाशाने नष्ट होतात व स्वतः ही नश्वर असतात. ब्रह्म अवयवी किंवा सभाग जर असते तर तेही अवयवी प्रमाणे नष्ट झाले असते मग त्याला नित्यत्व, सत्स्वरुपत्व ज्ञानस्वरूपत्व व आनंदस्वरूपत्वही आले नसते. श्रुत्यादि प्रमाणाने ब्रह्म सच्चिदानंद असे सिद्ध झाले आहे. अशा सजातीयादि भेदाने व खंडाने म्हणजे भागाने रहित जे तत्पद लक्ष्य ब्रह्म त्यांचा साक्षात्कार मला होवो म्हणजे तत्त्वमसि वाक्यार्थ रूप ऐक्य ज्ञानाने मला कृतार्थता येईल. तरी तसा आशीर्वाद मला संत श्रेष्ठानी द्यावा. ही प्रार्थना ऐकून निर्भेद अखंड ब्रह्मसाक्षात्कार म्हणजे महावाक्यातील तत्पद लक्ष्यार्थाचा साक्षात्कार तुला होवो असे त्रिवार संत मला म्हणाले ॥ ५ ॥

## प्रार्थना सहावी

नित्य शुद्ध बुद्ध मुक्त सत्य परानंदाद्वितीय ब्रह्मानुभवसिद्धिर्भूयादितिभवन्तोमहान्तोऽनुगृण्हन्तु । तथास्तु तथास्तु तथास्तु ॥ ६ ॥

**विवरण**–तत्त्वमसीतील तत्पदार्थ शुद्ध आहे. म्हणजे माया व तिचे कार्य हे मिथ्या असल्याने कालत्रयामध्ये ते मायावतत्कार्य ब्रह्मस्वरूपात नाही. त्यामुळे ब्रह्म हे नित्य म्हणजे सर्वदा शुद्ध आहे. माया उपाधी घेऊन ब्रह्म ज्यावेळी जगदुत्पत्ती स्थिती व लय करते त्यावेळी त्याला अशुद्ध किंवा सगुणब्रह्म असे म्हणतात. परंतु त्यावेळी सुद्धा ते शुद्धच असते. पावसाळ्यात नदीचे पाणी ज्यावेळी गढूळ होते त्यावेळी किंवा ते अग्नीवर ठेवून ज्यावेळी आम्ही ते उष्ण करतो त्यावेळीही पाणी मातीस्वरूप किंवा उष्ण म्हणजे अग्निस्वरूप होत नाही. भावपदार्थाचा स्वभाव दुसऱ्याच्या संपर्काने कधीही बदलत नाही म्हणजे मातीचे गुणधर्म पाण्यावर किंवा अग्नीचे उष्णत्वादिधर्म पाण्यावर कधीच येत नाहीत व तसे जर ते होईल तर हिवाळ्यात ते स्वच्छ होणार नाही व अग्नी विझविल्यावर ते थंड होणार नाही. म्हणजे अग्नीची उष्णता अग्नीतच असते व मातीचे गंधादि धर्म मातीतच असतात. माती किंवा अग्नी पाण्याहून वेगळा केल्यावर ते त्याच्या बरोबरच जातात. म्हणजे आम्ही ज्या गंधयुक्त मातीला खरी समजतो व ज्या अग्नीला खरे उष्ण समजतो

त्यांच्या खऱ्या मानलेल्या संपर्काने सुद्धा त्या संपर्काच्या वेळी पाणी मलीन किंवा उष्ण नसते. केवळ गढूळ पाणी व ऊन पाणी असा खोटा व्यवहार जगात चालू आहे. यालाच अध्यास असें म्हणतात. म्हणजे ज्यावेळी आम्ही पाणी ऊन व गढूळ म्हणतो त्यावेळी सुद्धा ते थंड व शुद्ध असते. संपर्काने सुद्धा एकाचे धर्म दुसऱ्यावर तत्त्वतः येऊ शकत नाहीत. भ्रमाने गढूळ व उष्ण असा व्यवहार पाण्यावर होतो. असे पूर्ण विचाराने सिद्ध होते. मग खरोखरच मिथ्या म्हणजे खोटी असलेली माया व तिचे कार्य यांचा खोटाच संबंध ब्रह्माशी झाला तर ब्रह्म हे मायेच्या धर्मांनी भ्रमकालीही अलिप्त आहे. मग माया नसलेल्या काली अलिप्त आहे याल शंकाच नाही. मग ब्रह्माला सोपाधिक अवस्थेच्या वेळी शुद्ध, अज्ञान काली बुद्ध व प्रपंचाच्या काली मुक्त म्हणण्यास कांहीच हरकत नाही. इतर काली तर ते शुद्ध बुद्ध मुक्त आहेच म्हणून ब्रह्म हे नित्य शुद्ध बुद्ध मुक्त असे आहे. म्हणजे सर्वदा शुद्ध बुद्ध मुक्त आहे. या करताच नित्य शब्द येथे दिला आहे. ब्रह्म नित्य शुद्ध बुद्ध व मुक्त असे आहे तसे ते सर्वदा सत्य आहे व सर्वदा म्हणजे दुःखानुभवकालीसुद्धा पर म्हणजे श्रेष्ठ जो आनंद तत्स्वरुप आहे. ब्रह्म हे सर्व प्रकाशक असल्याने दुःखाचेही प्रकाशक आहे. म्हणून त्याला दुःखानुभवकाली असे येथे म्हटले आहे व ज्यावेळी द्वैत आहे अशी कल्पना आहे. त्यावेळीही ते अद्वितीय म्हणजे द्वितीय रहित आहे. अर्थात् सर्वदा शुद्ध-बुद्ध-मुक्त परानंद व अद्वितीयच अशा ब्रह्माचा म्हणजे तत्पदार्थाच्या लक्ष्य ब्रह्माचा अनुभव मला होवो अशी संत महंताच्या चरणी माझी प्रार्थना आहे. ती ऐकून संत महात्मे तुला तसेच होवो असे त्रिवार म्हणाले ॥ ६ ॥

## प्रार्थना सातवी

**स्वगतादिभेदरहितसच्चिदानन्द लक्षणब्रह्माभिन्न कूटस्थ प्रत्यक् स्वरूपः सर्वसाक्षीति चिद्रूपानुभवसिद्धिर्भूयादितिभवन्तोमहान्तोऽनुगृण्हन्तु तथास्तु तथास्तु तथास्तु ॥ ७ ॥**

**विवरण –** पूर्वीच्या प्रार्थनेत जीवाचे शुद्ध स्वरूप प्रत्यक् असे आहे. प्रति म्हणजे उलट. अञ्चति म्हणजे जे भासते प्रकाशते त्याला प्रत्यक् असे म्हणतात. अर्थात् अन्तःकरण, इन्द्रिये, प्राण व देह हे पदार्थ मिथ्या तादात्म्य संबन्धाने आत्म्यात मिसळले आहेत. अन्तःकरणादि पदार्थ दृश्य परिच्छिन्न जड दुःख व अनेक असे आहेत. त्यांच्या उलट म्हणजे द्रष्टा अपरिच्छिन्न, व्यापक, ज्ञान, आनंद व एक अशा स्वरूपाचा असून त्या रूपाने तो सर्वदा प्रकाशमान आहे. म्हणून त्याला प्रत्यक्

असे शास्त्र म्हणते. ‘ प्रतीपं, अंचति ’ उलट प्रकाशणारा म्हणजे प्रत्यक् हे त्याचे सार्थ नांव आहे. विजेच्या दिव्यावर ज्या रंगाची काच असेल त्या रंगाचा प्रकाश घरभर पसरतो व हिरवा तांबडा इत्यादि हा प्रकाश आहे असा व्यवहार ही होतो. परंतु आतील विद्युत्प्रकाश हिरवा तांबडा वगैरे नसून स्वच्छ असा आहे व तो हिरव्या तांबड्या वगैरे रंगाला अस्तित्व व प्रकाश देणारा असा आहे. व हिरव्या तांबड्या इत्यादि प्रकाशाच्या व्यवहारकालीही तो उलट म्हणजे स्वच्छ या रूपाने प्रकाशत असतोच म्हणून त्या प्रकाशाला उलटया रीतीने प्रकाशणारा असे म्हणणेच योग्य आहे. तसेच आत्मरूप प्रकाशाला प्रत्यक् म्हणणे अत्यंत योग्य आहे. त्याच्या योगाने अन्तःकरणादि दृश्य पदार्थ सत्ता व प्रकाश म्हणजे आहेत व भासतात, या व्यवहाराला लायक होतात. म्हणजे अन्तःकरणादि आहेत व ते भासतात असा त्यांचा व्यवहार होतो. वास्तविक दृष्टीने तांबड्या हिरव्या वगैरे रंगाला भिंतीवर किंवा घरभर सत्ता व प्रकाश नसून आतल्या विद्युत्प्रकाशाचीच सत्ता व प्रकाश घरभर आहे. घरभर तांबड्या हिरव्या इत्यादि रंगाला घरभर सत्ता प्रकाश नसून विद्युत्प्रकाशाचीच सत्ता व प्रकाश घरभर आहे. या प्रमाणे अन्तःकरणादि पदार्थ सत् व प्रकाशरूप नसून यांच्या आत असणारा आत्मप्रकाशच या मिथ्यामिश्रणाने तसा भासतो. हा मिथ्याभास आहे. म्हणून प्रत्यक् आत्म्याला कूटस्थ असे नांव या सातव्या प्रार्थनेत दिले आहे. कूट शब्दाचा अर्थ सोनाराची ऐरण किंवा पर्वताचे शिखर असा आहे. ऐरणीवर सोनार सोन्यादि पदार्थावर नाना प्रकारचे लहान मोठे घाव घालतो, परंतु त्याचा परिणाम ऐरणीवर होत नाही. तसेच पर्वत-शिखरावर पावसाळा, हिवाळा व उन्हाळा या तीनी ऋतूत नाना प्रकारचे विकार ते ते ऋतू करतात. परंतु पाषाणमय दृढ पर्वताचे शिखरास त्या पासून काहींही विकार होत नाही. तसेच प्रत्यक् कूटस्थ आत्म्याला अन्तःकरणादी उपाधीवर होणारे कोणतेही विकार स्पर्शसुद्धा करू शकत नाहीत. हा कूटस्थ म्हणजेच सच्चिदानंद असणारा जीवात्मा व मायेवर होणाऱ्या विकारांनी रहित असणारा परमात्मा. या दोघांचे अत्यंत ऐक्य असल्याने स्वगतादिपूर्ववर्णित सर्व भेदरहित सच्चिदानंद सर्व साक्षी परब्रह्म व प्रत्यक् व कूटस्थ असणारा मी या दोघात किंचित् ही भेद नसून उपाधीने भासणाऱ्या सर्व भेदांनी रहित अभिन्न अशा एकस्वरूप परब्रह्माचा साक्षात्कार मला होवो म्हणजे ‘ तत्त्वमसि ’ या वाक्यार्थाचा साक्षात्कार मला होवो. पूर्वी शुद्ध जीव व शुद्ध ब्रह्म यांचा वेगळेपणाने साक्षात्कार होण्याविषयी प्रार्थना केली होती. आता अज्ञान व तत्कार्य

माया व तत्कार्य या दोनी उपाधी टाकून उपाधीमुळे आलेले भिन्नत्व नाहीसे करून अखंड एकरूपाने साक्षात्कार मला होवो. अशी महा-वाक्यार्थाचा अनुभव होण्याची प्रार्थना या सातव्या संख्येत केलेली ती ऐकून तसेच होवो असे सर्व संतश्रेष्ठ त्रिवार म्हणाले. त्यामुळे मी कृतार्थ झालो असे मला वाटते ।।७।। (क्रमश:)

## सद्गुरु प्रार्थना

सदाशांत आनद गंभीर मूर्ती ।। त्रिखंडी असे गाजली नाम कीर्ती ।।
मनो वेधला दर्शनाचेनि माझा ।। नमस्कार माझा गुळवणी योगिराजा ।।१।।

समुद्रीं भये हेचि आधार बेट ।। अनन्या जना सापडे मोक्ष वाट ।।
गुरुमाऊली पातली भक्तकाजा ।। नमस्कार माझा गुळवणी योगिराजा ।।२।।

पुजा सोहळा नित्य आहे जगाचा ।। कुठे देखिला ना असा वैभवाचा ।।
असंख्यात केल्या यथासांग पूजा।। नमस्कार माझा गुळवणी योगिराजा ।।३।।

सदा भक्तमेळा असे नित्य यात्रा ।। भवे व्यापिले दीन येताति क्षेत्रा ।।
अखंडीत चाले इथे दत्त पूजा ।। नमस्कार माझा गुळवणी योगिराजा ।।४।।

सदाचार आचार सन्मार्ग शुद्ध ।। जना दाविला आपुला पूर्ण बोध ।।
प्रभूदत्त आला पुन्हा धर्मकाजा ।। नमस्कार माझा गुळवणी योगिराजा ।।५।।

अतीरम्य मंदीर दत्तप्रभूचे ।। दिसे पूर्ण ऐश्वर्य स्वर्गीय साचे ।।
म्हणूनीं दास माधव करी नित्यपूजा ।। नमस्कार माझा
गुळवणी योगिराजा ।। ६ ।।

कवी :— श्री. माधवराव बीदरकर.

मंडळातर्फे श्रीगुरुमहाराजांना ५१ रु. दक्षिणा अर्पण केली. महाराजांनीं ती रक्कम मंडळातर्फे " श्रीपाद श्रीवल्लभ श्रीनृसिंहसरस्वती स्वामीमहाराज नरसोबावाडी देवस्थान सभामंडप शिल्प समिती, पुणे " यांजकडे सुपूर्त करवून मंडळाला समितीतर्फे पावती पाठवून देण्याची व्यवस्थाही केली.

यानंतर महाराज जोगेश्वरीसमोर राहात असलेल्या आपल्या निकटवर्ती साधकाकडे, श्री. बाळासाहेब वाकडे, यांचेकडे गेले. तेथून ते आश्रमात परतले.

## " श्रीमत् भागवत सप्ताह "

श्रीनृसिंहवाडीचे देवस्थानच्या पूजेचे मान्यवर घराण्यातील महान दत्तभक्त, ब्रह्मश्री, पंडित श्री. आत्माराम शास्त्री जेरे यांनी, प्रतिवर्षीप्रमाणे, भाद्रपद शु॥ ९ ते भाद्रपद शु॥ १५ पर्यंतच्या भागवत सप्ताह कालामध्ये, श्रीवासुदेव निवास आश्रमात, श्रीगुरुमहाराजांच्या सन्निध राहून श्रीमत् भागवत सप्ताह यथासांग पूर्ण केला.

रविवारी २९ ऑगस्टला सायंकाळी दोन तास " भागवत माहात्म्य" शास्त्रीबुवांनी विशद करून सांगितले, सोमवार ते रविवार अखेर रोज सकाळी संहितावाचन व सायंकाळी अर्थ निरूपण चालत असे. यात अनेकांनी भाग घेतला होता. काही निमंत्रित मंडळी परगावाहून आली होती. सात दिवस अपूर्व समारंभाचे वातावरण आश्रमात होते.

रविवारी शास्त्रीबुवांचा भव्य सत्कार करण्यात आला. आश्रमातर्फे, महाराजांतर्फे, वैयक्तिक, सप्ताहात बसलेल्या व न बसलेल्या भक्तांतर्फे मोठ्या भावभक्तीनें सत्कार करण्यात आला. शास्त्रीबुवा सत्कारात देहाने असले तरी त्यांच्या देहात भागवत होते. त्यांचे चित्त भगवंतमय झाले असल्यानें या लौकिक हर्षामर्षामध्ये ते नव्हते. ते नेहमीप्रमाणे " प्रसन्नचित्त " होते.

सोमवारी भागवत सप्ताहाचा महाप्रसाद झाला व परगावची मंडळी परगावी व गावातील मंडळी आपापल्या घरी गेली.

---

## —श्रीमद्विद्यारण्यस्वामीविरचित सार्थसद्गुरु प्रार्थना—

लेखक:– ब्रह्मश्री पंडित आत्मारामशास्त्री जेरे, ठाणे

### प्रार्थना आठवी

स्वात्मनोऽन्यत्वेन प्रतिभातं सकलं साक्ष्यं जगत् स्वाविद्याविलसितत्वेन स्वानन्यत्वात् स्वात्ममात्राद्वितीयब्रह्मात्मानुभवसिद्धिः सम्यग्भूयादिती भवन्तो महान्तोऽनुगृण्हतु ॥ ८ ॥ तथास्तु तथास्तु तथास्तु ॥

माझ्याहून वेगळेपणाने दिसणारे म्हणजे मी पाहणारा व हे सर्व जग दृश्य आहे अशा तऱ्हेने म्हणजे माझ्याहून भिन्नपणाने दिसणारे सर्व जग 'साक्ष्य' म्हणजे साक्षीचे विषय आहे. साक्षीदार व आरोपी या दोघामध्ये आरोपी हे साक्ष्य असतात व साक्षीदाराशिवाय त्यांचा आरोपही सिद्ध होत नाही. आरोपीनाच जय किंवा पराजयाचा लाभ किंवा हानी होते. साक्षिदाराला जय व पराजय यापासून काहीच फायदा नाही व नुकसानही नाही. तो केवळ उदासीन असतो. परंतु त्याच्याशिवाय मात्र आरोपींचा जय पराजय, लाभ किंवा नुकसान हे काही होत नाही. तो अकर्ता असून जय पराजयाला कारण होतो व आरोपीमुळे त्याला साक्षीपणा येतो. एरवी तो उदासीनच असतो. याप्रमाणे साक्षी व साक्ष्य यांचा अन्योन्य संबंध आहे. साक्षीला दिसणारे जग हे साक्षीच्या खऱ्या स्वरूपाच्या अज्ञानामुळे झाले असल्याने व अज्ञान निर्मित पदार्थ खोटे म्हणजे मिथ्या असल्याने ज्याच्या अज्ञानाने हे पदार्थ होतात व भासतात त्याहून ते खरोखर भिन्न असत नाहीत. अज्ञानाने दोरीवर भासलेला साप दोरीहून भिन्न असत नाही. तो केवळ भासच असतो व दोरीच्या सत्तेने त्याला सत्ता म्हणजे अस्तित्व येते व दोरीच्या सामान्य रूपाचा प्रकाश म्हणजेच भान त्याने त्याचा भास होतो. म्हणजे सापाला स्वतंत्र सत्ताही नाही व भासही नाही. त्याप्रमाणेच साक्षीच्या खऱ्या स्वरुपाचे म्हणजे उदासीन आत्मस्वरूपाचे अज्ञान असल्याने त्या अज्ञानापासून जग निर्माण झाले व भासले. जगाला स्वतंत्रसत्ता व भान दोनीही नाहीत म्हणजे जगाच्या अस्तित्वात व भानात आत्म्याचेच अस्तित्व व भान प्रकट होत असते. म्हणून जगत् हे आत्म्याहून भिन्न नसून ते केवळ आत्मरूप असे आहे. कल्पित सापाने दोरी जशी सद्वितीय म्हणजे द्वितीय जो सर्प त्याच्याशी सहित नसते. सर्पाच्या भासाचे वेळी सुद्धा ती एकमेव अद्वितीय दोरीच असते. तसे जगाच्या भासकालीही जगामुळे आत्मा सद्वितीय म्हणजे जगरूप द्वितीय पदार्थ सहित होत नाही. तो सदा अद्वितीयच आहे. स्वप्नात झालेल्या खोटया लग्नाने ब्रह्मचारी मनुष्य गृहस्थाश्रमी होत नाही—असा अद्वितीय ब्रह्मरूप आत्म्याच्या किंवा आत्मरूप ब्रह्माच्या अनुभवाची सिद्धी चांगल्या रीतीने म्हणजे त्या अनुभवा विषयी अप्रामाण्य शंका किंवा अप्रामाण्य निश्चय याने रहित असा तो अनुभव मला व्हावा पदार्थाचे ज्ञान होऊन त्या ज्ञानाबद्दल खोटेपणाची शंका किंवा निश्चय असल्यास ते ज्ञान असून नसल्याप्रमाणेच होते. या अप्रामाण्य शंकेचा किंवा निश्चयाचा नाश करण्याकरताच वेदान्त वाक्याच्या विचाराची आवश्यकता आहे. विचार हे प्रमाणात अन्तर्भूत नसल्याने

ते साक्षात् ज्ञान करून देत नाहीत. परंतु विचारांना ज्ञानाइतकीच किंबहुना त्यापेक्षाही अधिक किंमत आहे. तरी अप्रामाण्य ज्ञानरहित असा अद्वितीय ब्रह्मात्म्यैक्याचा अनुभव मला व्हावा अशी आपल्या संतश्रेष्ठ चरणाजवळ माझी प्रार्थना आहे. ती ऐकून ते तसेच तुला ज्ञान होवो असे त्रिवार म्हणाले ॥८॥

## प्रार्थना नववी

असंभावना विपरीत भावना रहितत्वेन करतलाम लकवदहं ब्रह्मास्मीत्यप्रतिबद्धापरोक्षब्रह्मसाक्षात्कारो दृढीभूयादिति भवन्तो महान्तोऽनुगृह्णन्तु ॥ तथास्तु तथास्तु तथास्तु ॥ ९ ॥

प्रत्यक्षानुमान शब्द वगैरे सहा प्रमाणामध्ये शब्दशक्ती म्हणजे शब्दाचे सामर्थ्य फार विलक्षण व अचिंत्य विचारातीत आहे. अत्यंत असत् म्हणजे बिलकूल नसलेल्या किंवा खोट्याही अर्थाचे ज्ञानसुद्धा शब्द करू शकतो असे इतर प्रमाणात सामर्थ्य नाही. तुझ्या कानात शंभर हत्ती झगडा करीत आहेत असे वाक्य उच्चारल्या बरोबर श्रोता हसतो व हे वाक्य उच्चारणारा मनुष्य मूर्ख आहे असे तो समजतो. त्या वाक्यापासून त्याला कांहींच बोध जर झाला नसता तर त्याला हसण्याचे व ते वाक्य उच्चारणाऱ्याला मूर्ख म्हणण्याचे काही कारण नव्हते. यावरून नसलेला किंवा खोटा अर्थ सुद्धा शब्द जाणवू शकतो. मग खरा अर्थ जाणविणे त्याला काय कठीण आहे? माझ्या कानात शंभर हत्तींचा झगडा चालणे असंभवनीय आहे असा या श्रोत्याचा पक्का निश्चय झालेला असतो. मग तो निश्चय प्रमाणानी झालेला असो किंवा अज्ञानाने झालेला असो तो निश्चय वक्त्यावरचा अविश्वास व त्याची मूर्खता सिद्ध करण्याचे काम करीत असतो. यालाच प्रमेया संभावना पूर्वक प्रमाणा संभावना म्हणतात. एक प्रमेया संभावना दुसरी प्रमाणा संभावना व तिसरी विपरीत भावना असे तीन मोठे प्रतिबंध या तत्त्वज्ञानाच्या मार्गात आहेत. हे त्या मार्गातील तीन पर्वतच आहेत. हे ओलांडल्याशिवाय तत्त्वज्ञान हे अमृत असूनही अगदी निरुपयोगी असे होते म्हणूनच श्रृती वारंवार 'श्रद्धस्व सौम्य' असे साधकाला वरचेवर जागे करीत असते. प्रथम विपरीत भावना अनेक कारणांनी दृढ झाली असल्याने ती प्रमेयासंभावनेला दृढ करते व त्यामुळे प्रमाणा संभावना सुदृढ होते. प्रथमच प्रमाणाची प्रवृत्ती होऊन जर एखादी भावना पक्की झाली असेल तर तिला विपरीत भावना म्हणता येणार नाही. कारण विपरीत शब्दाचा अर्थ प्रमाणविरुद्ध असा आहे. प्रमाण शब्दाचा अर्थच खरा अर्थ दाखविणारे साधन

असा आहे म्हणून प्रमाण जन्यभाव नाही. प्रमेयाची संभावनाच करणार व प्रमेयाची संभावना असल्याने तद्विषयक प्रमाणाचीही संभावनाच होणार. येथे असंभावनेचा शिरकावच नाही. यामुळे शंभर हत्ती कानामध्ये झुंज करू शकत नाहीत. हे प्रमाणाने सिद्ध असल्याने त्याच्या उलट सांगणारे वाक्य व त्याचा अर्थ खोटा असल्यामुळे व सर्व प्राणी विशेषतः प्राण्यामध्ये परिपूर्ण असलेला मानवप्राणी कल्याण करणाऱ्या अशा प्रमाणाचा पक्षपाती असल्याने शंभर हत्ती माझ्या कानात झुंजतात हे वाक्य व त्याचे प्रमेय अगदी खोटे आहे असे समजून वक्त्याच्या वाक्याला हासतो व त्याला मूर्ख ठरवितो. या वाक्यापासून त्याला ज्ञान होत नाही असे नाही परंतु ते ज्ञान प्रमाण विरुद्ध असल्याने ते वाक्य व त्याचे प्रतिपाद्य प्रमेय खोटे आहे असे तो म्हणतो व ते अगदी योग्यच आहे. प्रमेयाची व प्रमाणाची असंभावना किंवा संभावना मूळभावनेवर अवलंबून असल्याने मूळ भावना प्रमाण-सिद्ध आहे, की अज्ञानसिद्ध आहे याच्या निश्चयावरच पुढील तत्त्व अवलंबून आहे. मूळभावना प्रमाणजन्य असल्यास प्रमेय संभावना व प्रमाण संभावना योग्य आहेत, व मूळ भावना प्रमाणसिद्ध नसल्यास प्रमेयासंभावना व प्रमाणासंभावनाच खोट्या आहेत असे समजले पाहिजे. प्राण्यांच्या काही भावना प्रमाणजन्य आहेत व काही अज्ञानजन्य आहेत. या भावनेवर सर्व जगांचे व्यवहार चालू आहेत व ते अनादिकालापासून सुरू असून अनंतकाला-पर्यंत चालणारच कारण जगच अनादि व अनंत आहे. अज्ञानजन्य भावना म्हणजेच विपरीत भावना. प्रमाणजन्य भावनेने नष्ट केल्यासच जगाचाही त्याचेबरोबर अंत होणार. याप्रमाणे विपरीत भावना, प्रमेया, संभावना व प्रमाणा संभावना यांचे थोडक्यात स्वरूप दाखविले व संभावनेचेही स्वरूप दाखविले आहे. अर्जुनाने नष्टोमोहः स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाच्युत। स्थितोस्मिऽ गतसंदेहः करिष्ये वचनं तव ॥ हे वाक्यसुद्धा या प्रमाणजन्य भावनेच्या भरातच उच्चारले आहे. एकदा एका राजावर परचक्र आले व ते भिल्लांचे होते. त्यांनी त्या राजा व राणी वगैरे इतरांचाही आपल्या सैन्याने नाश केला. त्या राजाला एक अत्यंत सुंदर असा अगदी लहान ४–५ महिन्याचा मुलगा होता व भिल्लाच्या राजाला मूलबाळ काही नव्हते. त्या राजपुत्राला पाहून भिल्लाच्या राजाला या राजपुत्राला आपला पुत्र मानावा असे वाटून, त्याला त्यानी आपल्या घरी आणून पुत्राप्रमाणे त्याचे पालन पोषण केले. त्याच्या स्त्रियेनेही हा आपला पुत्र आहे असे समजून त्याचे पुत्राप्रमाणे संगोपन केले. राजपुत्र लहान असल्याने आपणावर प्रेम करणारे हे दांपत्यच आपले आईबाप आहेत असा समज अज्ञानाने करून घेतला व तो त्यांच्याशी आईबापाप्रमाणे वर्तन

करू लागला व आपणास भिल्लच समजू लागला. मी भिल्ल आहे व हे माझे आईबाप आहेत ही विपरीत भावना आपल्या राजपुत्रत्वाच्या अज्ञानाने झालेली आहे म्हणून या भावनेला विपरीत भावना असे म्हणतात. हा राजपुत्र मोठा झाल्यावर त्याच्या पूर्व भाग्याने त्याला एक सद्‌गुरू भेटले व त्यांनी त्याला तू भिल्ल नाहीस व हे दांपत्य तुझे आईबाप नाहीत, तू राजपुत्र आहेस व तुझे आईबाप या भिल्लांनी मारले आहेत, असे खरे तत्त्व सांगितले. त्या सद्‌गुरु वचनावर त्याचा अत्यंत विश्वास स्वतःला आलेल्या सद्‌गुरुंच्या अनेक अनुभवावरुन बसल्याने व सद्‌गुरुंनीही त्याच्या व राजाच्या फोटोचे साम्य दाखवून व अन्यही अनेक युक्तीने राजपुत्रत्व त्याला पटवून दिल्यामुळे मी राजपुत्रच आहे, असा त्याला अप्रामाण्य ज्ञानरहित आपल्या स्वरुपाचा निश्चय झाला व तो राजा होऊन व खोटाच आलेला भिल्लभाव नष्ट होऊन, तो कृतार्थ झाला असे "राजसूनोः स्मृति प्राप्तौ व्याधभावोनिवर्तते" अशा वार्तिक वाक्याने दाखविले आहे. हा दृष्टान्त देऊन जीव हा वस्तुतःच परब्रह्म असून आपल्या परब्रह्मत्वाचे अज्ञानामुळे देहप्राणइन्द्रियमनबुद्धिअहंकारचित्त इत्यादिकांच्या ठिकाणी आत्मबुद्धी म्हणजे मी देहेन्द्रियादिरूप आहे अशी विपरीत भावना करून आपले स्वतःचे सच्चिदानंदरूपत्व विसरून म्हणजे गमावून देहेन्द्रियांचे दुःखादिधर्म आपल्यावर बळेच ओढून घेऊन निरतिशय सुखरहित व त्रिविध दुःखसहित होऊन अनंत काळ व अनंत असे कष्टभोगीत आहे. तू निरतिशय आनंदरूप व त्रिविधदुःखांनी रहित आहेस असे सांगितले असताही तो ते मानण्यास तयार नाही. उलट तू परब्रह्मरूप आहेस असे सांगणाऱ्यासच तो मूर्ख समजतो व त्याला हसत असतो. हे त्याचे हसणे व उपदेशकाला मूर्ख समजणे आपल्या स्वरुपाच्या अज्ञानामुळे झालेल्या विपरीत भावनेने व तन्मूलक प्रमेयासंभावना व प्रमाणासंभावनेनेच झाले आहे. ही प्रमाणासंभावना, प्रमेयासंभावना व विपरीत भावना जाण्या करताच सर्व शास्त्रांची खटपट आहे. म्हणूनच "तस्माच्छास्त्रं प्रमाणंते" असे सर्वज्ञ भगवान् मनुष्याला शास्त्रोन्मुख होण्याला सांगतात. मनुष्यच शास्त्रश्रवणाला अधिकारी आहे. जगातील सर्व शास्त्रांमध्ये श्रेष्ठ उपनिषदे, ब्रह्मसूत्रे व भगवद्‌गीता हे प्रस्थानत्रयच आहे यात उपनिषदे व गीता हे सिद्धान्तप्रधान प्रस्थान आहे व ब्रह्मसूत्रे हे विचार प्रधानप्रस्थान आहेत. इतर सर्व शास्त्रे या प्रस्थानत्रयीला सहाय्य करणारी आहेत. या माणमूर्धन्य वेदांचा अतिमसिद्धान्ताचा ऊहापोह प्रस्थानत्रयीने केला आहे. त्यात ब्रह्मसूत्रातील प्रथमाध्यायाने प्रमाणासंभावना नष्ट केली आहे व द्वितीयाध्यायाने प्रमेया संभावना घालविली आहे. विपरीत भावना

घालविण्याकरता निदिध्यासनच झाले पाहिजे. त्याचे सांगोपांग विवेचन तिसऱ्या अध्यायात आहे व याला सहकारी प्रामुख्याने योगशास्त्र आहे. चौथ्या अध्यायात या सर्वसाधनानी झालेले ब्रह्मज्ञान व त्याचे फल परमकल्याणरुप मोक्ष याचा विचार आहे. विचार शास्त्ररूप दोन अध्यायाला प्रामुख्याने मीमांसा व न्यायशास्त्राची आवश्यकता आहे. यासर्व साधनसंपत्तीने झालेल्या ज्ञानाने हातातील आवळ्याचा जसा संपूर्णरूपाने साक्षात्कार होतो तसा आपल्या अद्वितीय व सच्चिदानंदरूप अशा आत्मस्वरूपाचा साक्षात्कार होतो व तो जीव कृतकृत्य होतो. तरी माझ्या कल्याणाला प्रतिबंधक असणाऱ्या प्रमाणासंभावना, प्रमेयासंभवना व विपरीत भावना यांचा समूळ नाश होऊन मी ब्रह्म आहे असे दृढनिश्चयात्मक स्पष्ट साक्षात्कारात्मक हस्तामलक ज्ञानाप्रमाणे मला ब्रह्मसाक्षात्कारात्मक ज्ञान होवो अशी आपल्या सर्व संत श्रेष्ठांच्या चरणी माझी प्रार्थना आहे. ही प्रार्थना ऐकून संत त्या प्रमाणे तुला होवो असे त्रिवार म्हणाले ॥९॥

## प्रार्थना दहावी

**यो ब्रह्मादिस्तंबपर्यन्तानां सर्वेषां प्राणिनां देहमध्ये तत्तत्साक्षित्वेन भासमानः परिपूर्णात्माऽस्ति सोऽयं परमात्मा केवलं मुमुक्षोः पुरुषस्य मे स्वरूपमित्येवंरूपात्मसाक्षात्कारो भूयादितिभवन्तोमहान्तो ऽ गृण्हतु ॥ तथास्तु तथास्तु तथास्तु ॥१०॥**

हिरण्यगर्भादि स्थावरान्त या पहिल्या प्रार्थनेत सांगितल्याप्रमाणे ब्रह्मा म्हणजे विराट् याच्या शरीराला आरंभ करून स्तंब म्हणजे गवताचे शरीर धारण करणाऱ्या सर्व जीवांच्या शरीरात म्हणजे प्राण धारण करणारे किंवा जिवन्त असणारे जे सर्व प्राणी त्यांच्या शरीरात त्यांच्या त्यांच्या सर्व कर्माचा साक्षी म्हणजे उदासीन राहून सर्व प्रत्यक्ष जाणणारा जो परिपूर्ण म्हणजे सर्व व्यापक सर्वत्र सदा राहणारा जो आत्मा तोच हा परमात्मा आहे.. तोच, माझा मोक्ष या संसार सागरातून केव्हा होईल असा रात्रंदिवस तळमळणारा मोक्षाशिवाय दुसरे काहीच मला नको असा निरिच्छ, जो जीव त्या माझ्या जीवाचे खरे स्वरूप आहे शास्त्राने मला हे पक्के कळले आहे. परंतु त्या साक्षीपणाचा मला प्रत्यक्ष अनुभव नाही. साखर फार गोड आहे व ती माझ्या जवळ आहे, असा केवळ शाब्दिक अनुभव जरी असला तरी खाऊन पाहिल्यावर जो अनुभव आहे त्या अनुभवानेच समाधान व तृप्ती आहे. प्रत्यक्ष साखर चाखण्याहून वेगळे जे अनुभव आहेत ते परोक्ष अनुभव आहेत. शास्त्रप्रतीती व गुरुप्रतीती या दोन्हीही प्रतीतीहून आत्मप्रतीती वेगळीच आहे.

त्या प्रतीतीमध्ये काही वेगळेच सामर्थ्य आहे. तरी सर्व शरीरामध्ये चाल-लेल्या हालचालीचा प्रत्यक्ष अनुभव घेणारा जो परमात्मा तोच मी आहे, इतर मी कोणी नाही, असा प्रत्यक्ष अनुभव मला व्हावा अशी प्रार्थना आपल्या संतांच्या चरणी मी करीत आहे. आपला आशीर्वाद अमोघ असल्याने आपण मनापासून मला तसा आशीर्वाद द्यावा अशी माझी अनन्य प्रार्थना आहे. आपण आशीर्वाद दिल्याशिवाय हा अनुभव मला होणार नाही. हे ऐकून तुला तसा प्रत्यक्ष सर्व साक्षित्वाचा अनुभव येवो असे संत लोक त्रिवार म्हणाले ।। १० ।। ( अपूर्ण )

## —श्रीमद्विद्यारण्यस्वामीविरचित सार्थसद्गुरु प्रार्थना—

(मागील अंकावरून पुढे चालू)

### प्रार्थना अकरावी

वासनाक्षय मनोनाश तत्त्वज्ञानाभ्यास वशात् ज्ञानरक्षा तपःसिद्धिः सर्वसमत्वं दुःखनिवृत्तिः सुखाविर्भाव इत्येतत्पञ्चप्रयोजन सिद्धिर्भूयादिती भवन्तो महान्तोऽनुगृण्हन्तु तथास्तु ॥ तथास्तु ॥ तथास्तु ॥ ६ ॥

या अकराव्या प्रार्थनेत जीवनमुक्तीचे साधन व जीवनमुक्तीचे फल या दोनीची प्रार्थना संतांच्याजवळ केली आहे. अर्थात् या प्रार्थनेत जीवन्मुक्तीची साधने तत्त्वज्ञान--मनोनाश व वासनाक्षय ही तीन साधने व ज्ञानरक्षा-इत्यादि पांच प्रयोजने जीवन्मुक्तीची पांच फले यांची याचना केली आहे. जे पदार्थ आपल्या जवळ नसतात व ज्यांची आपणास गरज आहे त्यांचीच आपण याचना म्हणजे मागणी करीत असतो व हे सर्व ज्याच्या जवळ आहे व जो उदार दाता आहे त्याचेजवळच मागणी करीत असतो. ज्याच्याजवळ मागितलेले पदार्थ नसतात व असले तरी जे कृपण असतात म्हणजे देत नाहीत त्यांच्या जवळ मागणी करणेही व्यर्थच आहे. संताजवळ हे सर्व पदार्थ असतात व ते फार उदार असतात. म्हणून त्यांना ‘ महान्तः ’ असे म्हटले आहे. आता प्रथम ज्या जीवन्मुक्तीची साधने व फले आम्ही संतांकडे मागतो, ती जीवन्मुक्ती म्हणजे काय हे पाहिले पाहिजे. जिवंत म्हणजे प्राणधारणकरणाऱ्या अर्थात् सजीव पुरुषाला कर्तृत्व भोक्तृत्व सुखदुःखादिरूप जो चित्ताचा धर्म तो फार पीडादायक होत असतो व जोपर्यंत जीवाने चित्ताशी संबंध ठेवला आहे म्हणजे त्याच्याशी तादात्म्य मानले आहे तोपर्यंत हे चित्तधर्म त्याला पीडादायक होणारच. झोपेत चित्ताचा संबंध सुटतो, त्यावेळी जीव कसा अगदी आनंदात असतो. स्वप्नात व जागेपणी चित्ताचा संबंध आल्याबरोबर त्याला हे कर्तृत्व भोक्तृत्व व सुखदुःखादी पीडा देऊ लागते तेव्हा स्वप्नात किंवा जागेपणी यांच्या संबंधाचे निवारण करणे म्हणजेच जीवन्मुक्ती होय. झोपेत कांही काळ हा कर्तृत्वादिबंध नाहीसा होतो व स्वप्नातून जागा झाल्यावरही स्वप्नातील क्लेश आपणच नाहीसे होतात परंतु जागृती ही अवस्था अधिक राहणारी असल्याने व त्याचवेळी मनुष्याला काही पराक्रम करण्याचे सामर्थ्य असल्याने तेथेच त्याने प्रयत्न करून हे क्लेशरुपबंध नाहीसे करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे जीवन्मुक्तीचा अभ्यासकरणे होय व हा अभ्यास प्रत्येक विचारी माणसाने अहर्निश केला पाहिजे. यावर कांहीं विचारी लोक अशी शंका घेतात की, कर्तृत्वादिक्लेशरूपबंध जर चित्ताचाच धर्म असेल व अज्ञानाने तो जर साक्षीरूप

आत्म्यावर आरोपित असेल तर तत्त्वज्ञान म्हणजे आत्म्याच्या खऱ्यास्व-रूपाचे ज्ञान झाले म्हणजे सहजच त्याचे अज्ञान नष्ट होऊन क्लेशरूप बंधही नष्ट होईल त्या करता पृथक् प्रयत्नाची आवश्यकता नाहीं म्हणजे आत्मज्ञानाकरताच प्रयत्न करावा म्हणजे जीवन्मुक्ती सहजच सिद्ध आहे तिच्याकरता प्रयत्न नको. बरे चित्ताचाच हा क्लेशरूप धर्म चित्तातूनच काढून टाकण्याकरता प्रयत्न म्हणजे जीवन्मुक्तीचा प्रयत्न असे म्हणावे व तो प्रयत्न करणे योग्य होईल असे म्हणाल तर हा प्रयत्न व्यर्थ आहे कारण धर्मीला कायम ठेवून धर्म काढणे कधीच शक्य नाहीं. पाणी तसेच कायम ठेवून त्याचा ओलावा नाहींसा करावा किंवा त्याचा पातळपणा नाहींसा करावा हे जसे असंभवनीय आहे तसे चित्त कायमठेवून त्याचा क्लेशरूपबंध नाहींसे करणे हे असंभवनीय अत एव हास्यास्पद आहे पाण्याचा ओलेपणा व पातळपणा स्वाभाविक आहे, असे म्हणाल तर चित्ताचाबंधही स्वाभाविकच आहे मग पाण्याचा स्वाभाविक धर्म जसा स्वाभाविक असल्याने जाणार नाही तसा चित्ताचा क्लेशरूपबंध स्वाभाविक असल्याने तोही प्रयत्नाने जाणारच नाही. तेव्हां जीवन्मुक्तीचा प्रयत्ने साक्षीहून बंध काढण्याचा किंवा चित्तातून बंध काढण्याचा उभयताही व्यर्थ आहे असा या विचारी लोकांचा अभिप्राय आहे. या वर सिद्धान्ती म्हणतात आपले म्हणणे योग्य आहे. साक्षी आत्मस्वरूपावर साक्षिस्वरू-पाच्या अज्ञानामुळे चित्तात असलेला कर्तृत्वादिबंध आरोपित आहे त्याचे निवारण अज्ञानाच्या नाशाने होईल व त्या अज्ञानाचा नाश तत्त्वज्ञानाने होईल म्हणून तत्त्वज्ञानाकरताच मुमुक्षूने प्रयत्न करावा हे खरे आहे परंतु तत्त्वज्ञान होऊन अज्ञानाचानाश झाला तरी कांहीं काळ त्या अज्ञानाचे परिणाम शिल्लक राहातातच. जसे झाड तोडले तरी कांही काळ त्याचा ओलावा राहातोच त्याप्रमाणेच येथे समजावे. तत्त्वज्ञान व प्रारब्धकर्म हे दोनी परस्पर विरोधी नाहीत. ज्या प्रारब्धकर्माने तत्त्व-ज्ञान निर्माण केले त्याच प्रारब्धकर्माने सुखदुःखादि व कर्तृत्वादिबंधही राखून ठेवले असल्याने प्रारब्धकर्म संपल्याशिवाय दुःखादिबंध नष्ट होणार नाहीत, ते पीडा देत राहाणारच. चित्ताचे ते स्वाभाविक धर्म अस-ल्याने चित्तातूनही ते काढून टाकणे शक्य नाहीं तथापी त्यांचा आत्यंतिक नाश करणे प्रारब्धकाली शक्य नसले तरी त्याचा अभिभव करणे शक्य आहे. अभिभव व नाश यात फार फरक आहे. याचे एक उदाहरण असे आहे. आपण रोज गरम पाण्याने स्नान करतो असे म्हणत असतो परंतु पाणी हे गरम कधीच होत नाही. पाणी जर खरोखरच गरम झाले असते तर ते पुन्हाः कधीही थंड झाले नसते परंतु त्यातील उष्णता

...ली की ते आम्हास थंड लागते. याचा अर्थ असा समजला पाहिजे की ज्यावेळेस ते गरम लागत होते त्या वेळीही ते थंडच होते. फक्त पाण्यात शिरलेल्या उष्णतेने त्यात थंडावा अभिभूत झाला होता म्हणजे आह्मास तो कळत नव्हता. उष्णता गेल्यावर तो भासू लागला. त्याच्या थंडाव्याच्या अनुभवास उष्णता ही अधिक असल्याने प्रतिबंधक होती. त्याचप्रमाणे जीवन्मुक्तीही पाण्याच्या गरमपणाप्रमाणे चित्ताची एक अवस्था आहे. त्या अवस्थेलाच निर्विकल्प समाधी योग, जीवन्मुक्ती अशी अनेक नावे आहेत. त्या अवस्थेत कर्तृत्वादिबंध चित्तात असले तरी त्यांचा अनुभव चित्तास म्हणजे तदुपाधिक जीवास होऊ शकत नाही कारण ते बंध जीवन्मुक्तीने अभिभूत झाले आहेत म्हणून. चित्तातील स्वाभाविक बंधाचा आत्यंतिक नाश जरी करता आला नाही तरी त्याचा अभिभव करण्याकरता निर्विकल्प समाधी किंवा जीवन्मुक्ती यांचा प्रयत्न करणे योग्य आहे व त्यामुळे दृष्टदुःखादी बंधाचा प्रतिबंध व स्वरूप सुखाचा आविर्भाव अशी दोन्ही कार्ये जीवन्मुक्तीत होत असल्याने जीवन्मुक्तीचा अभ्यास करणे हे ब्रह्मात्म्यैक्य साक्षात्कारी परंतु सगुण साक्षात्कार न झालेला अकृतोपास्ती जो गौण अधिकारी त्याला आवश्यक आहे. सगुणोपासनेने सगुणसाक्षात्कार झालेला जो ब्रह्मज्ञानाचा मुख्य अधिकारी त्याला समाधीचा अभ्यास सगुणोपासनाकालीच झाला असल्याने ब्रह्मात्म्यैक्य साक्षात्काराबरोबरच जीवन्मुक्ती सिद्ध असल्याने ब्रह्मज्ञानानंतर जीवन्मुक्तीचा स्वतंत्र प्रयत्न करावा लागत नाही. अकृतोपास्ती ब्रह्मसाक्षात्काऱ्यानी जीवन्मुक्ती न साधली तरी त्याच्या विदेह मुक्तीला कोणतीही हरकत येत नाही. दोघानाही पुनर्जन्म नाही. परंतु त्याचे दृष्टदुःख नाहीसे होत नाही, हा विशेष आहे. प्रारब्धकर्म हे तत्त्वज्ञान्याला सुद्धा सुटत नसल्याने ते तत्त्वज्ञानापेक्षा प्रबल आहे असे कोणी म्हणत असतील तर प्रारब्धकर्मापेक्षा योगाभ्यास म्हणजेच जीवन्मुक्तीचा अभ्यास प्रबल आहे असे त्यांना उत्तर आहे. कारण प्रारब्धकर्मास हटविणारेही योगी शास्त्रात वर्णिले आहेत किंवा जीवनमुक्तीही दुःखभावपूर्वक सुखातिशयरूप असल्याने प्रारब्धकर्मातही तिचा अंतर्भाव होऊ शकतो. प्रारब्ध कर्माला फल देण्याकरिता वर्तमान कालातील प्रयत्नाची अपेक्षा आहेच. प्रारब्ध म्हणजे पूर्व जन्मकृत प्रयत्न व प्रयत्न म्हणजे इह जन्मात केलेला उद्योग. एवढेच हे दोनी परस्पर सहाय्यक आहेत. प्रारब्धाशिवाय दृष्ट प्रयत्न फळ देऊ शकत नाही व दृष्ट प्रयत्नही प्रारब्धाशिवाय फळ देऊ शकत नाही. असे हे परस्पर संबंधी पदार्थ आहेत. अल्प प्रयत्न अधिक प्रारब्ध, व

अल्प प्रारब्ध अधिक प्रयत्न. अशी उदाहरणे जगात पाहाण्यास मिळतात असो.

**जीवनमुक्तीची साधने** :–तत्त्वज्ञान, मनोनाशव व ासनाक्षय अशी तीन शास्त्रकारांनी सांगितली आहेत. श्रीगुरुदत्तात्रेयानी आपल्या 'अलर्क' नावाच्या प्रिय शिष्याला

**'शृणुष्वावाहतोऽलर्क मुक्तये कारणत्रयम्**

**तत्त्वज्ञानं मनोनाशोवासनाक्षय एवच ॥ १ ॥** अशा श्लोकात तीनच साधने मुक्तीला म्हणजे जीवनमुक्तीला साधन आहेत असे सांगितले आहे. त्यात जीवनन्मुक्तीचे पहिले साधन 'तत्त्वज्ञान' हे आहे. तत्त्वज्ञानाचे स्वरूप वेदान्तादि प्रमाणांनी पुढीलप्रमाणे सांगितले आहे. हे सर्व द्वैतावडंबर अद्वितीय सच्चिदानंदरूप आत्म्याच्या ठिकाणी मायेने कल्पित असल्याने शुक्तीवर कल्पिलेल्या रजताप्रमाणे खोटे आहे व हे खोटे पदार्थ निर्माण करणारी मायाही खरी नसून खोटीच आहे 'जसा यक्ष तसा त्याचा बळी' अशी म्हण आहे. एक सच्चिदानंद अद्वितीय आत्माच कल्पिताचे अधिष्ठान असल्याने परमार्थ सत्य म्हणजे वस्तुतः खरा आहे व तोच मी आहे असे निःसंशय म्हणजे अप्रामाण्य शंका किंवा निश्चय यानी रहित जे निश्चयात्मकज्ञान त्याला 'तत्त्वज्ञान' असे म्हणतात. हे ज्ञान पूर्ण विचाराने व प्रमाणाने झाले असल्याने अत्यंत दृढ असते. ते डळमळणारे नसते. असे हे ज्ञान जीवन्मुक्तीचे प्रथम साधन अथवा मुख्य साधन आहे. या नंतर 'मनोनाश' हे दुसरे साधन आहे चैतन्यखचित अंतःकरणातून प्रमाणादि कारणांनी नानाप्रकारच्या चैतन्यखचित वृत्ती दिव्यातून ज्वाला जशा निघाव्यात तशा अंतःकरणाच्या ज्या ज्वाला त्यांनी युक्त जे अंतःकरणरूपद्रव्य ते 'मनन' म्हणजे वृत्ती निर्माण करते म्हणून त्याला 'मन' असे म्हणतात. या मनाचा नाश म्हणजे त्याचा मनपणा घालविणे म्हणजे प्रयत्नाने कोणतीही वृत्ती न उत्पन्न होण्याचा उद्योग करणे व ते मन वृत्तिरहित करणे. पाणी तरंगरहित करून निश्चल ठेवण्याप्रमाणे निर्वृत्तिक करून ठेवणे म्हणजे निरोधरूप परिणामात मन ठेवणे याला 'मनोनाश' असे म्हणतात. या मनोनाशालाच योग असे म्हटले आहे 'योगश्चित्तवृत्तिनिरोधः' असे भगवान् पतंजलीचे हे मनोनाशाविषयीचे सूत्र आहे. 'नाश' व लय यात फार फरक आहे. दुष्ट माणसाचा दुष्टपणा नाहीसा करून त्याला जिवंत ठेवून त्याच्याकडून चांगली कामे करवून घेणे हा पुरुषार्थ आहे. त्याला ठार मारून त्याच्याकडून फायदा न करून घेण्यात पुरुषार्थ नाही. जगात कोणतीही वस्तू निरुपयोगी नाही. लय म्हणजे त्याला ठार मारणे.

नाश म्हणजे त्याचे दोष घालवून त्याचा चांगला उपयोग करून घेणे असे आहे. 'णश' धातूचा अर्थ अदर्शन असा आहे-मनाला मन या रुपात न दाखविणे. काहीवेळा लय म्हणजे ठारही मारावे लागते. परंतु ते तात्कालिक फायदेशीर असते. पुन: त्याची उत्पत्ती होऊन त्यापासून मग फार उपद्रव होतो. नाशात तसे नाही. नाश सर्वदा कल्याणकारकच असतो. उपद्रवकारक नाही. याप्रमाणे मनोनाशाचे संक्षेपाने निरूपण झाले.

आता तिसरे साधन 'वासनाक्षय' हे आहे. वासना म्हणजे स्थूल-पदार्थांचे सूक्ष्मरूपाने स्थूलपदार्थाच्या जागी राहाणे. कस्तुरी कापूर वगैरे सुवासिकपदार्थ काही वेळ कपडयावर ठेवून नंतर काढून घेतले तरी त्या कपडयाला त्यांचा वास येतो म्हणून कस्तुरी व कापूर यांची वासना त्या कपडयात आहे असे म्हणण्यास हरकत नाही. त्याचप्रमाणे क्रोध, शोक, लोभ, ज्ञान, इच्छा इत्यादि अंत:करणातील धर्मांचे सूक्ष्मरूपाने अंत:करणात राहणारा जो भाग त्याला वासना म्हणण्यास हरकत नाही. अंत:करणात पूर्व पूर्व अभ्यासाने त्याचे वास्तव्य झाले आहे. यालाच संस्कार असेही नाव आहे. त्या वासना चांगल्या व वाईट अशा दोन्ही प्रकारच्या असतात. चांगल्या वासना कल्याणकारण व वाईट वासना घात करणाऱ्या असतात. या वासना काहीतरी कारणाने जाग्या झाल्या म्हणजे आपापल्या क्रोधादी स्थूलरूप वृत्तीला निर्माण करतात. कोणीतरी विनाकारण आपला अपराध केला म्हणजे त्याविषयीं आपणास क्रोध येतो. हा क्रोध वासनेपासून नसून त्यानी केलेल्या अपराधापासून होतो. परंतु वर्तमानकाली अपराध नसतानाही पूर्वी केलेल्या अपराधाच्या स्मरणाने क्रोधाचा संस्कार जागृत होऊन जो क्रोधनामक वृत्ती निर्माण करतो त्या संस्काराचे नांव वासना आहे. क्रोधाचे फल हिंसा व त्याचे कारण अपकार. या उभयतांचा म्हणजे पूर्व व पर यांचा संबंध नसताच उगीच पूर्वीच्या अपराधाच्या स्मरणाने जागृत झालेली जी क्रोधाची वासना किंवा संस्कार त्यापासून जो चित्तात क्रोध निर्माण होतो त्याला कारण जो संस्कार त्याला वासना असे "पूर्वापरपरामर्शमंतरेण क्रोधादि वृत्तिविशेषस्य हे-तुश्चित्तगत संस्कार विशेषोवासना" असे याचे व्याख्यान शास्त्राकारांनी केले आहे. येथे पूर्व म्हणजे कारण अपकारादि व अपर म्हणजे कार्य हिंसादि घेतले पाहिजे. उगीचच बसल्याबसल्या कारण व कार्य यांच्या स्मरणाने क्रोधादि वृत्ती निर्माण करणारा पदार्थ म्हणजे वासना असा या वासना शब्दाचा स्पष्टार्थ झाला. या वासनेचा क्षय करण्याचा उपाय म्हणजे विवेकाने चित्तात प्रशम स्थितीच्या वासना दृढ करणे हाच आहे. चंचलपाणी स्थिर ठेवण्याच्या अभ्यासाचे संस्कार दृढ करीत

गेले म्हणजे ते संस्कार विपरीत म्हणजे विक्षेप संस्काराला जसे दबवितात तसे प्रशम संस्कार क्रोधादि विक्षेप संस्काराला दडपून टाकतात. त्यामुळे क्रोध उत्पन्न करणारे अपकार, अपराध वगैरे असताना देखील क्रोधादिवृत्ती उत्पन्न होणे हे या वासनाक्षयाचे स्वरूप व फल आहे असे समजावे. त्यात तत्त्वज्ञानाचे साधन श्रवण मननादि मनोनाशाचे साधन योगाभ्यास व वासनाक्षयाचे साधन विपरीत वासनोत्पादन असा येथे विवेक समजावा. तत्त्वज्ञान, मनोनाश व वासनाक्षय हे परस्परालाही कारण होतात. म्हणजे तत्त्वज्ञानानी व मनोनाशाने तत्त्वज्ञान इत्यादि प्रकारही अनेक येथे होऊ शकतात. परंतु याचा विस्तार योगवासिष्ठादि ग्रंथात केला आहे. तरी अधिक जिज्ञासूने तेथेंच तो पाहावा. विस्तार-भयास्तव येथे देत नाही. या जीवन्मुक्तीच्या साधनाच्या अभ्यासाने प्राप्त झालेल्या जीवन्मुक्तीची पाच फले या प्रार्थनेत मुमुक्षू याचकांनी सद्‌गुरुपाशी मागितली आहेत. त्यात पहिले फल ‘ ज्ञानरक्षा ’ हे आहे. प्रमाणाने उत्पन्न झालेल्या ज्ञानाचे रक्षण करण्याची काय गरज आहे अशी शंका करू नये. जीवन्मुक्तिरूप चित्ताची विश्रांति नसल्याने पूर्वी प्रभुरामचंद्र व परमश्रेष्ठ शुकाचार्य यांना संशय होऊन ज्ञान होऊन सुद्धा ते नसल्यासारखे झाले व निदाघ नावाच्या ऋषीला विपरीत भावनारूप विपर्यय होऊन तत्त्वज्ञानानंतरही समाधान लाभले नाही. विश्वामित्रानी प्रभुरामचंद्राला, जनकानी शुकाचार्याला व ऋभुऋषीनी निदाघाला चित्ताची विश्रांती किंवा जीवनमुक्तीचा अनुभव करवून त्यांच्या ज्ञानाचे रक्षण केले आहे. पेटलेला अग्निसुद्धा मणिमंत्र व औषधिरूप प्रतिबंधक असता दाह करू शकत नाही तसे प्रमाणजन्य ज्ञानही संशय विपर्ययरूप प्रतिबंध असता अविद्यानिवृत्यादि कार्य करू शकत नाहीत. म्हणून जीवन्मुक्तीचे प्रयोजन ‘ ज्ञानरक्षा ’ हे आहे.

‘ तपश्चर्या ’ हे जीवन्मुक्तीचे दुसरे फल आहे. तपश्चर्येने सर्व साध्य आहे. त्या जीवन्मुक्ताला देवही होता येते. ‘ कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं ’ असेही सामर्थ्य जीवन्मुक्ताला येते व जीवन्मुक्ती ही मोठी तपश्चर्या आहे. मन व इंद्रियांचा निग्रह हे परम तप आहे असे शास्त्रकार सांगतात. संतांना अद्‌भुत चमत्कार जे दाखविता येतात ते या जीवन्मुक्तीरूप तपाच्या प्रभावानेच आहेत. संतांचे चमत्कार प्रमाणरूपनेत्र उघडून जिज्ञासूने पाहावे. एकदमच हे सर्व थोतांड आहे असा शेरा अज्ञानाने या चमत्कारावर पोरकटपणाने मारू नये. डोळे उघडून संतांची चरित्रे वाचावी. आपल्या किमतीने त्याचा अर्थ लावण्याच्या भानगडीत शाहणा म्हणविणाराने पडू नये. असो तपश्चर्या हे दुसरे प्रयोजन जीवन्मुक्तीचे

सांगितले. जीवन्मुक्तीचे तिसरे प्रयोजन प्रार्थनेत विद्यारण्यांनी ‘ सर्वसमत्वं ’ असे लिहिले आहे व जीवन्मुक्तिविवेक ग्रंथात त्यांनी ‘ विसंवादाभाव ’ असे तिसरे प्रयोजन लिहिले आहे. दोन्हीही योग्यच आहेत. आपला अपकार करणारे व उपकार करणारे या दोहोविषयी आपलेपणाने समभाव ठेवणे हे जीवन्मुक्ताचे स्वरूपच आहे. नदीत मळ टाकणाऱ्यालाही नदी पाणी देते व तिची पूजा नमस्कार करणारालाही ती पाणी देते. दोन्ही माझीच लेकरे आहेत असा नदीचा भाव असतो. तसा जीवन्मुक्ताचाही भाव उपकारी व अपकारी यांच्याविषयी सम असतो. ‘ हें विश्वचि माझें ’ असा त्यांचा निर्धार असतो. संताची चरित्रे या दृष्टीने पाहिल्यास एकनाथ, समर्थ, तुकाराम इत्यादि जीवन्मुक्त पुरुषांची आपणाला कल्पना येईल. हा आपला व हा परका असा भिन्न भाव यांच्या चित्तात असतच नाही. या हातातील पैसे दुसऱ्या हातात घेतले तर ते आपल्या जवळच असतात. तसे आपले द्रव्य दुसऱ्यांनी घेतले तर ते आपल्याजवळच आहे असे जे समजतात त्यांनाच सर्व समत्व प्राप्त झाले असे समजावे. असे सर्वसमत्व किंवा ‘ द्रव्याद्वैत ’ हे जीवन्मुक्तीचे तिसरे फल आहे.

‘ आता विसंवादाभाव ’ हें तिसरे प्रयोजन जीवन्मुक्ती ग्रंथात सांगितले आहे. विसंवाद शब्दाचे दोन प्रकार आहेत. एक अज्ञानी म्हणजे शास्त्राध्ययन न केलेल्याशी विसंवाद व दुसरा शास्त्राध्ययन केलेल्याशी विसंवाद. शास्त्राध्ययन न केलेल्याशी जो विसंवाद त्याला लौकिक विसंवाद म्हणतात. त्याचे दोन प्रकार आहेत. एक त्याच्याशी भांडणे व दुसरा त्याची निंदा करणे. त्यापैकी क्रोधादि दोषाने रहित असणाऱ्या योग्याबरोबर कोण भांडण करण्यास येणार व कोणी आलाच तर योगी सहनशील असल्याने भागवतातील भिक्षुप्रमाणे तो सर्व सहन करीत असल्याने जमिनीवर पडलेला अग्नी जसा आपणच विझून जातो. योग्याबरोबर भांडण करणारा स्वतःच भांडण करण्याचे सोडून देतो. म्हणून योग्याबरोबर लौकिक कलह होऊ शकत नाही. दुसरा निंदारूप विसंवाद ही लौकिक योग्याविषयी होऊ शकत नाही. यांचे स्वरूप कोणालाच कळत नसल्याने हा योगी निंद्य आहे की अनिंद्य आहे असा त्याचे बद्दल निंदेचाही प्रसंग येत नाही व योगी हा अंतर्मुख असल्याने बाहेरचे सर्व व्यापार त्याचे नष्ट झाले असल्याने दुसऱ्याशी भांडण किंवा दुसऱ्याची निंदा याच्याकडून होतच नाही. शास्त्रीलोकाबरोबरही योग्यांचा विसंवाद होऊ शकत नाही. कारण प्रतिवाद्यासमोर योगी आपल्या शास्त्राचे प्रमेय सिद्ध करण्यास जातच नाही. व त्याच्या शास्त्राचे प्रमेय हा दूषित करीत नाही. मग शास्त्रज्ञाशीही याचा विसंवाद घडू शकत नाही. योग्याच्या चरित्राबद्दलही

कोणी शास्त्रज्ञ विसंवाद करू शकत नाही. कारण योग्याचे चरित्र म्हणजे यमनियम आसन प्राणायामादि सर्वच शास्त्रकारानी मान्य केले असल्याने त्याच्या चरित्राबद्दल कोणीही त्याच्याशी विसंवाद करू शकत नाही. चार्वाक शास्त्रकार कदाचित योग्याशी विसंवाद करण्यास तयार होईल. परंतु योगी कोणाशीच वाद करीत नसल्याने त्याच्याशी हा विसंवादाचा प्रसंग योग्याशी नाही. म्हणून विसंवादाभावरूप जीवन्मुक्तीतील तिसरे प्रयोजन ही योग्यास संभवते. आता दुःखःनाश व स्वरूपसुखाविर्भाव ही दोन फले जीवन्मुक्तीची आहेत. परंतु जीवन्मुक्त ज्ञानी असल्याने ज्ञान झाल्याबरोबरच ही फले सिद्ध असल्याने जीवन्मुक्ती अवस्थेत त्या दोन प्रयोजनाचे अखंड रक्षण होते म्हणून ही जीवन्मुक्तीची फले आहेत असे वर्णिले आहे. ज्या प्रमाणे तत्त्वज्ञान हे जीवन्मुक्तीत सुरक्षित होते म्हणून 'ज्ञानरक्षा' हे जीवन्मुक्तीचे फल मानले. त्याप्रमाणेच दुःख निवृत्ती व सुखाविर्भाव ही दोन्ही फले जीवन्मुक्तीची मानली आहेत.

अशी साधनसहित व दंभफलरहित जीवन्मुक्ती मला होवो अशी प्रार्थना आपल्या सारख्या सत्पुरुषांच्या चरणी माझी आहे. आपली कृपा अगाध व विलक्षण सामर्थ्यशाली असल्याने ती कृपा सर्व करू शकेल. प्रार्थना ऐकून सर्व संत तसेच तुला होवो असे त्रिवार म्हणाले.

# श्रीमद्विद्यारण्यस्वामीविरचितसार्थसद्गुरुप्रार्थना

लेखक—ब्रह्मश्री पंडित आत्मारामशास्त्री जेरे

## प्रार्थना बारावी

**मैत्री करुणा मुदितोपेक्षेति सद्वासना पाटवेन रागादि दुर्वासनाक्षयः सम्यग्भूयादितिभवन्तो महान्तोऽनुगृह्णन्तु तथास्तु तथास्तु तथास्तु ॥ २ ॥**

मैत्री-करुणा-मुदिता- व उपेक्षा अशा चार चित्ताच्या वृत्ती फारच चांगल्या आहेत. म्हणून या वृत्तींना ' सद्वासना ' असे नाव आहे योगशास्त्रात या वृत्तीना ' परिकर्म ' असे म्हटले आहे. राग-द्वेष-ईर्ष्या- असूया-क्रोध व पापादी वृत्ती चित्ताला कलुषित म्हणजे गढूळ करतात. जसे पावसाळ्यात नदीचे पाणी माती वगैरे पदार्थांनी गढूळ होते तसे हे सत्त्वगुणात्मक चित्त रागद्वेषादिवृत्तीने गढूळ होते. पाण्याचा गढूळपणा काढण्यासाठी जसे निवळीचे बीज उगाळून पाण्यात तो भाग टाकला म्हणजे पाणी स्वच्छ होते तसे निवळीच्या बीजाच्या उगाळलेल्या भागाप्रमाणे म्हणजे त्याच्या रपट्याप्रमाणे चित्ताच्या सत्त्वगुणरूप पाण्यातील रागद्वेषादी गढूळपणा काढण्याकरिता मैत्री-करुणादी चार वृत्ती निवळीच्या बीजाच्या रपट्याप्रमाणे गढूळपणा काढण्यात अत्यंत उपयुक्त आहेत. म्हणून या चार वृत्ती अभ्यासाने खूप वाढविल्या पाहिजेत. म्हणजे रागद्वेषादी दुर्वासनांचा समूळ नाश या सद्वासनारूप चार वृत्ती करतात. रागद्वेषादी वृत्तींना ' दुर्वासना ' असे नांव शास्त्रकारांनी दिले आहे. कारण या वृत्ती मनुष्याला स्थावरपर्यंत अधोगतीला पोचवितात.

जगातील सुखी लोक पाहून ते आपले मित्र आहेत अशी भावना ठेवावी म्हणजे मित्राचे सुख पाहून जसा आपणास आनंद वाटतो तसा शत्रूचे सुख पाहून सुद्धा आपणाला आनंदच वाटेल. मग इतरांबद्दल आनंद वाटेल यात संशय नाही.

जगातील दुःखी लोकांना पाहून त्यांच्या दुःखाचा समूळ नाश व्हावा अशी उत्कट इच्छा म्हणजेच ' करुणा ' होय. आपल्या स्वकीय पुत्रादिकांना दुःख झाले म्हणजे ते दुःख लवकर व समूळ नष्ट व्हावे असे जसे आपणास वाटते, त्यात काही इतर आपला लाभ असत नाही, म्हणजे ही आपल्या माणसाच्या दुःखनिवृत्तीची इच्छा जशी लाभ, कीर्ती, पूजा वगैरे उपाधींने नसते म्हणजे निरुपाधी असते, स्वार्थमूलक नसते. तशीच दुसऱ्याच्या दुःखनिवृत्तीची इच्छा निरुपाधी असणे म्हणजेच तिला ' करुणा ' असे म्हणतात. स्वार्थमूलक दुसऱ्याच्या दुःखनिवृत्तीच्या इच्छेला ' करुणा ' हे नांव शोभत नाही व असत नाही.

जगातील पुण्यशाली व नीतीने वागणारे जे लोक असतील त्यांच्याकडे पाहून त्यांच्याविषयी आपल्या चित्तात उत्कट प्रेम निर्माण होणे या वृत्तीला ' मुदिता ' असे म्हणतात. ही वृत्ती निर्माण झाली म्हणजे आपणही त्यांच्याप्रमाणे पुण्यशील व नीतिमान् व्हावे असे आपोआप वाटू लागते व त्याबद्दल तसा प्रयत्न त्यांच्याकडून अवश्य होतो. म्हणून ' मुदिता 'रूपी सद्वासनेची अत्यंत आवश्यकता आहे. येथे पुण्यशब्दाने ' अभयं सत्त्वसशुद्धिः ' इत्यादी दैवी संपत्ती ' अमानित्व-मदंभित्वं ' इत्यादी ज्ञानसाधनेसाठी जीवन्मुक्त-स्थितप्रज्ञ-भगवद्‌भक्त-गुणातीत इत्यादीकांची जी लक्षणे भगवद्गीतेत सांगितली आहेत. ती सर्व येथे घेतली पाहिजेत असे तात्पर्य आहे.

जगातील अपुण्य म्हणजे पुण्यरहित पापी लोकांना पाहून उपेक्षा म्हणजे उदासीनता धारण करावी म्हणजे निन्दा वगैरे त्यांची न करता स्वस्थ असणे शक्य असल्यास त्यांना पापापासून निवृत्त करणे याला उपेक्षा असे म्हणतात. अशी उपेक्षा चित्तात बाणली असता तो स्वतः पापापासून अवश्यच दूर राहील. जो दुसऱ्याला पापापासून निवृत्त करण्यास उद्युक्त असतो तो स्वतः पापाचरण करणारच नाही. नाहीतर तो दंभ होईल ही चार ' परिकर्म ' आहेत. ही रोज अभ्यास करून मनुष्यानी संपादन केली पाहिजेत. ही कर्मे चित्ताच्या एकाग्रतेला कारण जो चित्तसंस्कार आहे तत्स्वरूप असल्याने योगाच्या मुख्य साधनात यांचा अंतर्भाव आहे. दुर्वासनेने होणारे चित्ताचे चांचल्य नाहीसे करून चित्तस्थैर्य या मैत्रीकरुणा-मुदितोपेक्षेने होत असल्याने या मैत्रीकरुणा इत्यादी सद्वासना नैपुण्याने चित्तातील रागादी दुर्वासनांचा समूळ क्षय होवो असा आशीर्वाद आपण संत-साधू-महात्म्यांनी मला चांगल्या प्रकारे द्यावा अशी माझी आपल्या चरणी प्रार्थना आहे. ती ऐकून तुला मैत्री इत्यादी सद्वासना नैपुण्य मिळो असे त्रिवार म्हणून संतांनी आशीर्वाद दिला.

## प्रार्थना तेरावी

**निरंतरं स्वात्मानुसंधान वशान्मनसोवृत्तिरूपपरिणाम परित्यागेन निरुद्धता-कारेण परिणामो दृढीभूयादिति भवन्तो महान्तोऽनुगृह्णन्तु। तथास्तु० ३ ॥१३॥**

अन्तःकरण हे निश्चल जलाप्रमाणे आहे. वारा वगैरे बाहेरच्या कारणाने
पाणी हालू लागले म्हणजे ते चंचल होते. त्याप्रमाणेच धर्म अधर्म इत्यादी
कारणाने त्या अंतः करणात वृत्ती उत्पन्न झाल्या म्हणजे ते चंचल होते. योगशास्त्रात
प्रमाण– विपर्यय–विकल्प–निद्रा व स्मृती-अशा पांच वृत्ती अन्तःकरणाच्या
सांगितल्या आहेत. या पाच वृत्तींमध्ये इतर सर्व वृत्तींचा अंतर्भाव केला आहे. अन्तः
करणालाच संशयवृत्ती झाली म्हणजे मन म्हणतात. निश्चयवृत्तीने बुद्धी म्हणतात.
गर्व किंवा अहंकार वृत्तीने अहंकार म्हणतात व स्मरणवृत्तीने चित्त म्हणतात. हे
अन्तःकारण वृत्तीरहित झाले म्हणजे त्याला अन्तःकरण अशी संज्ञा येते ‘ मनोबुध्यहकार
चित्तानिनाहं ’ असे भगवत्पादांचे निर्वाणषट्क नावाचे स्तोत्र आहे त्यात म्हटले
आहे. भरलेल्या घागरीत पाणी वगैरे इतर पदार्थ व आकाश असे दोन्ही असतात.
त्यात आकाश हे स्वाभाविकच असते. घट उत्पन्न झाला की त्या बरोबर आकाश हे
असतेच. आकाश घागरीत भरण्याकरता घागर निर्माण करणे एवढाच प्रयत्न
पुरेसा आहे. दुसऱ्या प्रयत्नाची गरज नाही. पाणी तांदूळ इत्यादी त्यात भरण्याचे
असल्यास दुसऱ्या प्रयत्नाने ते भरावे लागते. त्याचप्रमाणे चित्त उत्पन्न झाले की
त्यात आत्मा भरलेलाच असतो. म्हणजे आत्माकारवृत्ती अंतःकरणामध्ये स्वभावतःच
आहे. प्रमाणविपर्यय वगैरे वृत्ती निर्माण करण्यात त्या त्या वृत्तींची साधने जम-
विण्याचा प्रयत्न करावा लागतो. आत्माकारवृत्तिप्रमाणे इतर वृत्ती स्वभावतःच
अंतःकरणात नसतात परंतु अनादी कालापासून अनात्माकार अन्तःकरणवृत्ती
निर्माण करण्याचा प्रयत्न जीवाचा सर्वदाच चालू आहे. त्यामुळे अनात्माकारवृत्ती
करा असा उपदेश त्याला करण्याची आवश्यकता नाही. उपदेशाशिवाय
अनादी संस्कारामुळे जीव सहजच अनात्माकारवृत्ती करण्यात गढून गेला आहे.
आत्माकारवृत्ती करा असाही उपदेश त्याला करणे योग्य नाही कारण अन्तःकरण
आत्माकारवृत्तीशिवाय राहूच शकत नाही म्हणून ‘ योगाश्चित्तवृत्तिनिरोधः ’ असे
सांगितले आहे. याचा अर्थ अनात्माकार चित्तवृत्ती बंद करा असा आहे. अनात्मा-
कार चित्तवृत्ती अनादिकालापासून व अनेक असल्याने त्यांचे प्राबल्य आहे. त्यामुळे
आत्माकार चित्तवृत्ती जरी अनादिकालापासून असली तरी ती एकटी आहे. त्यामुळे
ती दुर्बल आहे. अनात्माकारवृत्तीचा सर्वस्वी नाश झाल्याशिवाय तिला प्राबल्य
येणार नाही व प्राबल्याशिवाय तिला अज्ञाननाश करण्याचे सामर्थ्य येणार नाही.
अनात्माकारवृत्ती हटविण्याचे साधन ‘ सकलमिदमहंच वासुदेवः ’ हे सर्व दृश्य जग व
मी वासुदेवस्वरूप आहे असे निरंतर चिंतन करणे हे आहे. याकरताच गीतेच्या
सहाव्या अध्यायात ‘ आत्मसंस्थं मनः कृत्वा न किंचिदपिचिन्तयेत् ’ असे भगवन्तानी
म्हटले आहे. येथे ‘ न किंचिदपि चिन्तयेत् ’ याचा अर्थ मी व जगत वासुदेवाहून
वेगळे आहे असे चिंतन करू नये असा आहे. अनादिकालापासून जगत् व मी हे
वासुदेवापासून वेगळे आहे असे चिंतन सर्वांचे चालू आहे व हा भ्रम आहे. तो

अज्ञानमूलक आहे. 'सर्वमात्मानंपश्यति' सर्वच वासुदेवस्वरूप आहे. हे तत्त्वज्ञान आहे. येथे पश्यति 'या श्रुतीचा अर्थ पश्येत् असा आहे व हेच तत्त्व 'आत्मसंस्थं' इत्यादी वाक्याने भगवंतांनी सांगितले आहे. मी व जग वासुदेवाहून भिन्न आहे हा भ्रम अधोगतीला म्हणजे जन्ममरणादी परंपरेला कारण आहे. मी व जग वासुदेव आहे हे तत्त्वज्ञान जीवाच्या उद्धाराला म्हणजे मोक्षाला कारण आहे. यालाच स्वस्वरूपानुसंधान असे म्हटले आहे व भगवत्पूज्यपादांनीं विवेक चूडामणी ग्रंथात 'स्वस्वरूपानुसंधानं भक्तिरित्यभिधीयते' म्हणजे स्वस्वरुपानुसंधान म्हणजेच भक्ती आहे असे म्हटले आहे. 'सर्वाभूतीभगवद्भावो' असे एकनाथादी सर्व श्रेष्ठ संतानी हेच सांगितले आहे. हा पंथराज म्हणजे श्रेष्ठ मार्ग आहे असे सर्व संत एकमुखाने प्रतिपादन करतात व याचाच उपदेश अहर्निश ते करीत आलेले आहेत. हे साधन जाता-येता बसता उठता सर्वदा करता येते. यालाच शास्त्रात 'अन्वयाभ्यास' असे म्हटले आहे. जग व मी यांचा अत्यंताभाव असून एक वासुदेवच आहे हा 'व्यतिरेकाभ्यास' आहे. 'अन्वयव्यतिरेकाभ्याम्' असे दोन्ही अभ्यासशास्त्रात सांगितले आहेत. 'व्यतिरेकाभ्यास' एकान्तात बसून करावा व 'अन्वयाभ्यास' जाता येताही करता येतो असे आहे. प. प. वासुदेवानंद सरस्वती पूज्यपादांनी 'सर्व व्यवहार सोडून स्वात्मानुसंधान करी तू' असा उपदेश आत्मानात्मविवेक ग्रंथात केला आहे. या प्रार्थनेत निरन्तर स्वात्मानुसंधानरूपसाधनाने अनात्मवृत्तिरूप चित्ताच्या परिणामाचा परित्याग होऊन निरुद्धताकार म्हणजे सर्व वासुदेव आहेत असा चित्ताचापरिणाम म्हणजे स्वस्वरूपानुसंधान दृढ म्हणजे पक्के व्हावे असा आशीर्वाद आपण संतश्रेष्ठ महात्मे यानी मला द्यावा अशी आपल्या संताच्या चरणी माझी प्रार्थना आहे. ती ऐकून तुझ्या इच्छेप्रमाणे होवो असा त्यांनी तीन वेळा आशीर्वाद दिला ॥ १३ ॥

## प्रार्थना चौदावी

शमदिपूर्वकं श्रवण-मनन-निदिध्यासाभ्यासबलात् विषयासक्तिः - प्रज्ञामांद्यं-कुतर्को-विपर्यय दुराग्रहश्चेति वर्तमान प्रतिबन्धचतुष्टय निवृत्तिद्वाराऽप्रतिबद्धापरोक्ष ब्रह्मसाक्षात्कारोभूयादिति भवन्तो महान्तोऽनु-गृह्णन्तु ॥ १४ ॥ तथास्तु तथास्तु तथास्तु ॥

'श्रद्धावान् लभते ज्ञानं तत्परः संयतेन्द्रियः' असे भगवान् भगवद्गीतेत सांगतात. मी ब्रह्म आहे असे श्रुतिस्मृती निश्चयाने एकमुखाने सांगतात. मी ब्रह्म नाही असे सांगणारी एकही श्रुती किंवा स्मृती नाही. असे असताना मी ब्रह्म आहे असे परोक्षज्ञान सुद्धा जीवाला होत नाही. मग अपरोक्षज्ञान दूरच राहिले. याला कारण जीवाजवळ श्रद्धा नाही हेच आहे. श्रद्धेचे माहात्म्य फारच आहे. प्रत्येक कामात श्रद्धा पाहिजे. गुरू व शास्त्र यांनी सांगितलेल्या वाक्यावर मला जरी ते खरे वाटत

नसले तरी ते अगदी खरे आहे असा दृढ विश्वास म्हणजे श्रद्धा. ही श्रद्धा जर साधकाजवळ नसेल तर त्या वाक्यापासून कार्यक्षम ज्ञान उत्पन्न होत नाही. म्हणून परोक्षज्ञानाला सुद्धा अश्रद्धा प्रतिबंधक आहे. म्हणूनच ‘ श्रद्धावान् लभते ज्ञानं ’ असे भगवद्वाक्य आहे. श्रद्धेने अश्रद्धेचा नाश झाला म्हणजे एकदाच गुरू व शास्त्र यांचे वाक्य ऐकून परोक्षज्ञान उत्पन्न होते. अपरोक्षज्ञान होण्याकरता विचारांची आवश्यकता आहे. साधकाजवळ जर विचार नसला तर त्याला अविचार म्हणतात. हा अविचार अपरोक्ष म्हणजे मी ब्रह्म आहे अशा प्रत्यक्ष ज्ञानाला प्रतिबंधक असतो. म्हणून साधकांनी विचाराने अविचाराचा नाश करून अपरोक्ष ज्ञान होईपर्यंत पुनः पुनः मी ब्रह्म आहे याचा विचार करीत राहावे. मरेपर्यंत विचार करूनसुद्धा जर या जन्मी ब्रह्मज्ञान झाले नाही तर प्रतिबंधकांतर आहे. म्हणजे दुसरेही काही प्रतिबंधक आहे असे समजून त्या प्रतिबंधकाच्या नाशाकरिता ब्रह्मविचार करीत राहाणे हाच उपाय आहे. प्रतिबंधक तीन प्रकारचे आहेत. काही प्रतिबंधक भूत-कालातील असते. काही प्रतिबंधक भविष्यकालातील असते व काही वर्तमान-कालातील असते. एका साधकाला पूर्वाश्रमातील म्हशीचा स्नेह होता. तो संन्यासा-नंतरही तसाच राहिल्याने ब्रह्मचिंतन करीत असता म्हैसच लक्षात येऊ लागली. हे गुरूने जाणून महिषीब्रह्माचे तत्त्व सांगितले. त्यामुळे महिषीचा स्नेह नाहीसा होऊन तो त्या तत्त्वज्ञानानी मुक्त झाला, अशी लौकिक कथा आहे. याला भूत म्हणजे पूर्वीचा प्रतिबंध असे म्हणतात. वामदेवऋषींनी पूर्वीच्या जन्मात मरेपर्यंत विचार केला. परंतु त्या जन्मात त्यांना ज्ञान झाले नाही कारण त्यांना दुसऱ्या जन्मात ज्ञान होणार होते. म्हणून दुसऱ्या जन्माला कारण असणारे प्रारब्धकर्म हे आड आले. याला भावी प्रतिबंध असे म्हणतात. अवश्य होणाऱ्या भावी जन्माला कारण जे अदृष्ट त्याला भाविप्रतिबंध म्हणतात. जड भरताला प्रथम राजाचा जन्म, दुसरा हरिणाचा जन्म व तिसरा जडभरताचा जन्म असे तीन जन्म देणारे अदृष्ट प्रतिबंधक झाले. त्यामुळे त्यांना तिसऱ्या जन्मात ज्ञान झाले. हाही भावी प्रतिबंधच आहे. बंध नसेल तर याच जन्मी ब्रह्मसाक्षात्कार होतो असे ‘ ऐहिक-मपि अप्रस्तुत प्रतिबंधेतद्दर्शनात् ’ या सूत्रात सांगितले आहे. म्हणजे काही प्रतिबंध नसेल तर विचाराने या जन्मातही तत्त्वसाक्षात्कार होतो. विचार करून याच जन्मात तत्त्वज्ञानी झालेले दिसतात, असे ‘ तद्दर्शनात् ’ या वाक्याने सांगितले आहे. म्हणजे ब्रह्मसाक्षात्कार याच जन्मी होईल असा नियम नाही. प्रतिबंध असला तर भावी जन्मातही तो होणे शक्य आहे. परंतु विचाराने तत्त्वसाक्षात्कार होतो यात शंका नाही. प्रकृत चौदाव्या प्रार्थनेत वर्तमानप्रतिबंधाचा नाश होऊन ब्रह्म साक्षात्कार व्हावा अशी इच्छा साधकांनी दाखविली आहे. भावी किंवा भूत प्रति-बंधाचे आम्हास ज्ञान नाही. या जन्मात आम्हास ज्ञात असणाऱ्या विषयासक्ती प्रज्ञामांद्य, कुतर्क व विपर्यय दुराग्रह या चार वर्तमानप्रतिबंधाची निवृत्ती होऊन

प्रतिबंधरहित झालेले प्रत्यक्ष ब्रह्मसाक्षात्काररूप ज्ञान आम्हास व्हावे अशी याचना येथे करण्याची आहे. भूत व भावी प्रतिबंध आपल्यासारख्या महान संतांनाच कळण्यासारखे आहेत व त्यांचा नाश करण्याचे सामर्थ्यही आपणास आहे तरी तेही प्रतिबंध आपल्याकृपेने दूर व्हावे अशी प्रार्थनाही या प्रार्थनेत अंतर्भूत आहे.

वर्तमान चार प्रतिबंधात पहिला प्रतिबंध विषयासक्ती हा आहे. स्त्री, अन्नपान, कीर्ती, धन आयुरारोग्य इत्यादी सुखांची साधने आहेत अशी भ्रमात्मक कल्पना सर्वांना आहे. वस्तुत: हे पदार्थ सुख साधन नसून दु:खाचेच साधन आहेत. आजपर्यंत या पदार्थापासून कोणालाच सुख झाले नाही. उलट सुख हे आत्मस्वरूप असून ते नित्य आहे व ते सर्वदा आपल्याजवळच आहे, इतकेच नव्हे तर ते सुख आपले स्वरूपच आहे. असे असता अज्ञानामुळे ते आपले स्वरूप नसून विषयापासून ते सुख उत्पन्न होते व ते विषयाधीन आहे असा भ्रम अनादी कालापासून चालत आला आहे व त्या भ्रमामुळे विषयामध्ये अत्यंत आसक्ती झाली आहे. म्हणजे ते विषय नाहीसे झाले तर माझे सर्व सुखच नष्ट होईल अशी दृढ बुद्धी होऊन ते मला सर्वदा असावे असे वाटते. हा पहिला प्रतिबंध आहे. प्रज्ञामांद्य हा दुसरा प्रतिबंध आहे. प्रज्ञामांद्य म्हणजे बुद्धी तीक्ष्ण नसणे. अंत:करणातील सत्त्वगुण वाढला म्हणजे बुद्धीला तीक्ष्णता येते म्हणजे बुद्धी कुशाग्र होते. बुद्धीतील तमोगुण व रजोगुण नाहीसे झाले म्हणजे सत्त्वगुण वाढतो व त्यामुळे बुद्धीला तीक्ष्णता येते व सर्व पदार्थांचे यथार्थ ज्ञान होऊ लागते. बुद्धीवर आलेले आवरण नाहीसे होते. सूर्यावर आलेले मेघाचे आवरण नाहीसे झाले म्हणजे जसा स्पष्ट प्रकाश दृग्गोचर होतो व त्यामुळे सर्व पदार्थ स्पष्ट दिसतात तशी अवस्था बुद्धीची होते. याच्या उलट कोणतेही तत्त्व स्पष्ट न कळणे म्हणजे रजोगुण व तमोगुण यांचाच प्रभाव अधिक असणे हे प्रज्ञामांद्य आहे. हा दुसरा प्रतिबंध आहे.

कुतर्क हा तिसरा प्रतिबंध आहे तर्क हा प्रमाणावर अनुग्रह करणारा असतो. 'प्रमाणानुग्राहकस्तर्क:' असे म्हटले आहे. तर्क असल्याशिवाय प्रमाणावर आलेले अप्रामाण्य संशय व अप्रामाण्य निश्चय हे दूर होत नाहीत. ते दूर न झाले तर प्रमाण असूनही ते नसल्यासारखे होते. एवढा अप्रामाण्य संशय व अप्रामाण्य निश्चय यांचा प्रभाव आहे. सूर्य मेघांनी आच्छादित झाला म्हणजे तो असून नसल्यासारखा आहे. स्पष्ट प्रकाशरूप आपले कार्य तो करू शकत नाही. तद्वत अप्रामाण्यसंशय किंवा निश्चय या मेघांनी प्रमाणरूप सूर्य आच्छादित झाला म्हणजे प्रमाणसूर्य मनुष्याची तत्त्वज्ञानाविषयी प्रवृत्ती करण्यास समर्थ होत नाही. म्हणजे प्रमाणज्ञान इच्छाद्वारा प्रवृत्ती म्हणजे प्रयत्न करण्यास समर्थ होत नाही. प्रमाणाचे फल प्रवृत्त करणे किंवा निवृत्त करणे असे दोन प्रकारचे आहे. हे दोन प्रकारचे फळ तर्करहित प्रमाण ज्ञान करू शकत नाही. अर्थात तर्काची अत्यंत आवश्यकता प्रमाणाला आहे. इतके तर्काचे महत्त्व आहे. तर्क म्हणजे प्रमाण नव्हे तर प्रमाणावर अनुग्रह

करणारा पदार्थ आहे. प्रमाणावर येणाऱ्या सर्व शंका घालविणारा आहे. तर्काचे दोन प्रकार आहेत. एक सुतर्क व एक कुतर्क. ज्या तर्काला श्रुतीची संमती आहे त्याला सुतर्क म्हणतात व ज्या तर्काला श्रुती विरुद्ध आहे त्याला कुतर्क किंवा शुष्कतर्क असे म्हणतात. कुतर्क अधःपात करणारा व सुतर्क म्हणजे कल्याण करणारा असा आहे. कुतर्क करणारे विद्वान श्रुतीचा अर्थ विपरीत लावतात ते कुतर्कालाच प्राधान्य देतात. अनादिसिद्ध सुतर्कांनी निश्चित झालेला श्रुत्यर्थ तुच्छ समजतात व आपणच नवीन कल्पिलेला अर्थ खरा मानतात. पूर्व संचित पापामुळे कुतर्क करण्याकडेच त्यांची बुद्धी तत्पर असते. श्रुती व साधुसंतांच्या वाक्यावर यांची प्रामाण्य बुद्धी नसते. श्रुतीसंमत तर्कच सुतर्क असतो. म्हणूनच भगवत्पूज्य-पादांनी ' श्रुतिमतस्तर्कोऽनुसंधीयताम् ' असे बजावून सांगितले आहे. हा कुतर्क तत्त्वज्ञानाचा तिसरा प्रतिबंध आहे

चौथा प्रतिबंध ' विपर्यय दुराग्रह ' हा आहे. विपर्यय म्हणजे मिथ्याज्ञान किंवा भ्रम. आत्मा कर्ता व भोक्ता आहे असा भ्रम अनादिकालापासून सर्वांना आहे. श्रुतीनी आत्मा अकर्ता, अभोक्ता म्हणजे काहीही न करणारा व सुखदुःख नसणारा असे वर्णन केले आहे व युक्ती देऊन अनुमानानीही ते सिद्ध झाले आहे. परंतु सर्व प्राण्यांचा अनुभव मात्र याच्या अगदी उलट आहे. सर्वजण मी कर्ता व सुखदुःख भोक्ता असे ठाम समजतात. हा माझा समज भ्रमात्मक आहे असे श्रुती व युक्तीने सांगितले तरी ते लक्षात न घेता आपला अनुभवच खरा आहे असा दुराग्रह ते धरतात. कावीळ झालेल्या माणसाला शंख पिवळा दिसतो तो पिवळा नसून पांढरा स्वच्छ आहे असे किती जरी आवर्जून सांगितले तरी तो आपला अनुभव खोटा आहे असे कबूल करीत नाही. उलट शंख पांढरास्वच्छ आहे असे सांगणाऱ्या आप्त माणसालाच तो वेड्यात काढतो. त्यालाच भ्रम झाला आहे असे समजतो. कदाचित् शंख पांढरा आहे असे म्हणणारा माणूस आप्त आहे म्हणजे दोषरहित व खरे बोलणारा आहे असे समजले तरी त्याच्या ' शंख पांढरा आहे ' या वाक्याचा वेगळाच अर्थ आपल्या अनुभवास धक्का न लावता तो करतो. आपल्या अनुभवास खोटे म्हणणे त्याला आवडत नाही. यालाच विपर्यय दुराग्रह म्हणतात. या दुराग्रहाने त्याला खरे तत्त्व कधीच कळणार नाही. हा विपर्यय दुराग्रह फारच मोठा प्रतिबंध आहे. यामुळे त्याचा अधःपातच होणार व याच्या संगतीला असलेल्या लोकांचाही अधःपातच होणार. कारण हा फार शहाणा आहे असे सर्वजण समजत असतात व असे काही बाबतीत याला शहाणपणही असतेच. परंतु यामुळे सर्व बाबतीत हा शहाणा असतो असे मात्र मानता येत नाही. सर्व बाबतीत शहाणपणा सर्वज्ञालाच असतो. श्रुती अतिंद्रिय पदार्थ सांगणारी असल्याने ती सर्वज्ञ आहे. शहाण्यांनी श्रुतीसंमतच सिद्धान्त स्वीकारून स्वतःच्या अनुभवास गौणत्व दिले पाहिजे. कारण याला अतिन्द्रिय पदार्थ जाणण्याची योग्यता नसते.

आंधळा माणूस रूपाविषयी जसा अप्रमाण आहे तसाच श्रुतिसिद्धांताविषयी कोणताही मनुष्य अप्रमाणच आहे कारण तो सदोष आहे व श्रुतिनिर्दोष आहे. तरी श्रुतिविरुद्ध विपर्यय किंवा भ्रम याबद्दल दुराग्रह धरू नये.

हे चार वर्तमान प्रतिबंध फार घातक आहेत. हे सोडून द्या असे सांगितले असताही शहाणी माणसेही ते सोडीत नाहीत. म्हणून हे प्रतिबंध समूळ नष्ट करण्यासाठी उपदेशाशिवाय दुसरेही काही उपाय केले पाहिजेत. ते उपाय म्हणजे मनोनिग्रह, इंद्रियनिग्रह, विधिपूर्वक सर्व कर्मांचा संन्यास, दुःखे झाली तरी त्याबद्दल सहनशीलता व एकाग्रतेचा निरंतर अभ्यास अशी साधने 'शांतोदान्तः' इत्यादी श्रुतीने सांगितली आहेत. श्रवण, मनन व निदिध्यासन अशी साधनेही श्रुतीने सांगितली आहेत. श्रद्धापूर्वक या साधनांचे अनुष्ठान केल्यास ते ते प्रतिबंध नाहीसे होतात असा अनादी परंपरेने साधकांना अनुभव असल्याने श्रवणादी शान्तोदान्त इत्यादी साधनांचे अनुष्ठान माझ्याकडून घडून वर्तमान प्रतिबंध चतुष्टयाची निवृत्ती होऊन प्रतिबंधरहित असा अहं ब्रह्मास्मि या वाक्यार्थाचा साक्षात्कार आपल्यासारख्या महात्म्यांच्या कृपेनें मला होवो असा आशीर्वाद मला द्यावा अशी अन्तःकरणपूर्वक केलेली प्रार्थना संतांनी ऐकून घेतली व कृपादृष्टी माझ्यावर करून तुला तसा प्रतिबंधरहित ब्रह्मसाक्षात्कार होवो असे संतमहात्मे त्रिवार म्हणाले ॥ १४ ॥

## – श्रीमद्विद्यारण्यस्वामीविरचितसार्थसद्गुरुप्रार्थना –

लेखक – पंडित आत्मारामशास्त्री जेरे, ठाणे.

### प्रार्थना पंधरावी

उपक्रमादिषड्विधलिंगैरशेषवेदान्तानामद्वैतेब्रह्मणितात्पर्यावधारणं
भूयादितिभवन्तोमहान्तोऽनगृह्णन्तु ॥ १५ ॥ तथास्तु तथास्तु तथास्तु ॥

विवरण :– सर्व उपनिषदें म्हणजेच वेदान्त. या संपूर्ण वेदान्ताचे तात्पर्य कोणत्या अर्थात आहे हें प्रथम समजलें पाहिजे. वाक्याचें तात्पर्य समजल्याशिवाय म्हणजे वक्त्याला काय सांगायचे आहे हें श्रोत्याला समजल्याशिवाय केलेलें सर्व श्रवण फुकटच जातें. म्हणून तात्पर्य ज्ञान हें आकांक्षा, आसक्ती, योग्यता, शक्ती

याप्रमाणे शाब्दबोधाला कारण आहे. वक्त्याचे तात्पर्य कोणत्या अर्थात आहे हे कळल्याशिवाय शाब्दबोध बरोबर होत नाही व त्यामुळे वक्ता व श्रोता या उभयतांनाही समाधान नाही. ज्या वाक्याचे अनेक अर्थ होण्याचा संभव आहे तेथे तरी वक्त्याचे कोणत्या अर्थात तात्पर्य आहे हे अवश्य कळले पाहिजे. जेथे वक्ता प्रत्यक्षच आहे तेथे माझ्या वाक्याचे तात्पर्य अमुक अर्थात आहे हे तो प्रत्यक्ष सांगू शकेल. परंतु ज्या ठिकाणी वक्ता प्रत्यक्ष नसेल व नुसते ग्रंथच आमच्या पुढे असतील तर त्या ग्रंथांचे तात्पर्य कोणत्या अर्थात आहे हे ठरविणारे प्रमाण अनुमानच आहे. जेथे प्रत्यक्ष प्रमाण नसेल व त्या अर्थाची अत्यंत आवश्यकता असेल तेथे त्या ग्रंथाचे तात्पर्य अनुमानानेच ठरवावे लागते. या अनुमानालाच 'लिङ्ग' अशी संज्ञा पूर्वाचार्यांनी दिली आहे. वेदवाक्ये प्रत्यक्ष अनुमान वगैरे इतर प्रमाणांनी काहीतरी अर्थ जाणून तो प्रकट करण्याकरिता रचलेली आहेत. म्हणजे महाभारतादी ग्रंथांप्रमाणे पौरुषेय आहेत असे नसून ईश्वर, जीव, अविद्या, ब्रह्म, जीवेश्वरभेद, अविद्या व ब्रह्म यांचा संबंध, हे सहा अर्थ जसे अनादी आहेत, तसे आनुपूर्वी विशिष्ट वेद हे गंगाप्रवाहाप्रमाणे प्रवाहानादी आहेत. ईश्वर ब्रह्मदेवांना निर्माण करून त्यांना पूर्वीच असलेले वेद समर्पण करतो. '**योब्रह्माणंविदधातिपूर्वम्योवैवेदांश्चप्रहिणोतितस्मै**' असे वेदातच वर्णन आहे. 'प्रहिणोति' म्हणजे पाठवितो किंवा पोचवितो असा याचा अर्थ आहे. तात्पर्य हे वाक्य मी निर्माण केले आहे व यात माझा अभिप्राय असा आहे असे वेदाच्या बाबतीत ईश्वरही म्हणू शकत नाही. कारण वेद हे निःश्वासाप्रमाणे ईश्वरापासून झाले आहेत. ईश्वराने बुद्धिपूर्वक रचलेले नाहीत असे वेदच म्हणतात. उपक्रम व उपसंहार १, अभ्यास २, अपूर्वता ३, फल ४, अर्थवाद ५ व उपपत्ती ६, अशी सहालिंगे म्हणजे ६ अनुमाने वाक्याचा अर्थ काय आहे हे निश्चित करू शकतात. एखाद्या लिंगाने म्हणजे अनुमानानेसुद्धा वाक्य तात्पर्य निर्णय होतो. मग सहा अनुमाने एकाच तात्पर्याकरिता जर एकवाक्यतेने प्रयत्न करीत असली तर या वाक्याचा हाच अर्थ आहे असे ठरविणे सहजच शक्य आहे. ही सहा अनुमाने वा लिंगे वाक्यार्थ ठाम ठरविण्यास प्रमाण आहेत असे अनादी परंपरेने निश्चित झाले आहे. यात कोणाचेही दुमत नाही. 'ईश्वराला वेदाचा अर्थ हाच आहे असे जरी प्रत्यक्ष माहीत असले तरी ही 'सहालिंगे' या अर्थाचे हे वाक्य आहे. याबद्दल प्रमाण आहेत म्हणून या वाक्याचा अर्थ हा आहे असेच तो विचारणाऱ्याला उत्तर देईल. म्हणून अनादी परंपरेने हीच सहा लिंगे अर्थ निर्णायक आहेत असे ठरले आहे व हा सिद्धांत सर्व सम्मत आहे.

आता तात्पर्यनिर्णायक सहालिंगाचे स्वरूप काय आहे हे पाहू. उपक्रम व उपसंहार हे दोन मिळून पहिले लिंग आहे. 'उपक्रम' म्हणजे ग्रंथाचा आरंभ कोणती वस्तू सांगण्या करिता झाला हे पाहाणे व 'उपसंहार' म्हणजे शेवटी ग्रंथाचे

पर्यवसान कोणत्या वस्तूत झाले हे पाहाणे. उपक्रम व उपसंहार या दोन्ही ठिकाणी एकाच वस्तूचे जर प्रतिपादन असेल तर या ग्रंथात उपक्रमउपसंहाराने ही वस्तू प्रतिपादिली आहे असे ठाम ठरते. पदविचारात ज्याप्रमाणे पाणिन्यादी व्याकरणकार परम आप्त आहेत किंवा प्रमाणविचारात नैय्यायिकांना जसे आप्त मानतात तसे वाक्यविचारात मीमांसकांना आप्त म्हटले आहे. आप्त म्हणजे यथार्थ वक्ता. मीमांसक जितके वाक्यविचारात आप्त आहेत तितके वैय्याकरण किंवा नैय्यायिक तेथे आप्त नाहीत. त्यांचा मुख्य विषय तो नाही. मीमांसकात सुद्धा पूर्वमीमांसक जैमिन्यादी पूर्वमीमांसेमध्ये म्हणजे जैमिनीप्रणीत द्वादशाध्याय व संकर्षकांड चार अध्याय मिळून सोळा अध्यायात जसे आप्त आहेत म्हणजे प्रमाणभूत आहेत तसेच उत्तरमीमांसक म्हणजे वेदव्यास प्रभृती वेदान्तशास्त्रकार उत्तरमीमांसेत प्रमाणभूत मानले आहेत. महर्षी व्यास प्रभृती प्रणीत उत्तरमीमांसा तत्त्वज्ञानप्रधान उपनिषदांचा यथायोग्य विचार करीत असल्याने व तत्त्वज्ञान हेच सर्वात मुख्य असल्याने उत्तर-मीमांसा जगातील सर्व शास्त्रापेक्षा अतिश्रेष्ठ शास्त्र आहे. त्याच्या परिशीलनाने मनुष्य स्वस्वरूपाची प्राप्ती करून घेऊन कृतकृत्य होतो. इतर सर्व शास्त्रे उत्तर-मीमांसा शास्त्राला सहाय्यभूत आहेत. जीव सच्चिदानन्दघन परब्रह्मस्वरूप असूनही अविद्येने दुःखप्रद व सुखहानिकर अशा जीवभावाला तो प्राप्त होऊन अनादि-कालापासून त्रिविधतापतप्त व त्रस्त झाला आहे. त्याचे त्रिविध ताप व त्रास नष्ट करून त्याला सच्चिदानन्दरूप साम्राज्यपदावर आरूढ करण्याकरिता उत्तरमीमांसा प्रवृत्त झाली आहे. या उत्तरमीमांसेत एकमेवाद्वितीयसच्चिदानन्दघनरूप असे जीव-स्वरूप आहे. हे उपनिषत्स्वरूप वेदान्ताने सांगितले आहे. असे षड्विधलिंगाने सिद्ध होते. असे वर्णन केले आहे. हे नमुन्याकरता एखादे उपनिषत् घेऊन दाखविले म्हणजे इतर उपनिषदातही अशीच षड्विधलिंगे आहेत असे त्याला आपल्या विचाराने किंवा विद्वानाच्या साहाय्याने ठरविता येईल. उदाहरणार्थ छांदोग्य उपनिषत् घेऊन षड्विधलिंगाने वेदान्ताचे तात्पर्य एकमेवाद्वितीयसच्चिदानन्दघनब्रह्म हे जीव स्वरूप कसे आहे हे पाहू.

छान्दोग्य उपनिषदात षष्ठ प्रपाठकात ( ६–१–१ ) या भागात किंवा प्रकरणात 'सत्' या शब्दाने सच्चिदानन्दरूप ब्रह्माचा उपक्रम केला आहे. जो पदार्थ सत् असतो तो त्रिकालाबाधित असतो व जो त्रिकालाबाधित असतो तो ज्ञानरूप व आनन्दरूप असलाच पाहिजे इत्यादी सहज विचार येथे करण्याचे हे स्थळ नव्हे. फक्त सिद्धान्त येथे सांगून प्रार्थना करण्याचे हे स्थळ आहे. या सर्वांचा विचार अधिक जिज्ञासूने इतरत्र पाहावा. उपक्रमात 'सदेवसोम्येदमग्र आसीत्' म्हणजे अरुणाचा मुलगा श्वेतकेतु याला त्याचा पिता अरुण असे म्हणाला, हे सत्त्व गुणी मुला, हे सर्व जगत् उत्पत्तीच्या पूर्वी म्हणजे 'अग्र' सद्रूपच होते व ते 'सत्'

एकमेवाद्वितीयं' म्हणजे सजातीय विजातीय स्वगत अशा भेदत्रयाने रहित असे होते असा उपक्रम केला आहे. उपक्रम म्हणजे प्रकरणाचा आरंभ असे समजावे व प्रकरणाच्या शेवटी म्हणजे उपसंहारात 'ऐतदात्म्यमिदसर्वं' असे म्हटले आहे. एतत् आत्मा यस्य तत् एतदात्म तस्य भावः ऐतदात्म्यं' म्हणजे पूर्वी उपक्रमात सांगितलेले जे 'सत्' आहे ते ज्या जगाचा आत्मा म्हणजे सार आहे. एरवी त्यात अधिष्ठानरूप आत्मा जर नसेल तर सर्व जग निःसार आहे. टरफलात जर दाणा नसेल तर त्या टरफलाला विशेष किंमत नसते. त्यातील दाण्याने त्याला किंमत येते. त्याप्रमाणे जगाला आत्म्याने सत्ता आली आहे. 'येथे श्रुतीत ऐतदात्म्य असा भावार्थीय' प्रत्यय घातला आहे. परंतु 'चातुर्वर्ण्य' या शब्दात जसा 'य' प्रत्यय भावार्थी नसून चार वर्ण एवढाच अर्थ दाखविणारा आहे तसाच या ठिकाणीही 'एतदात्म' एवढाच अर्थ 'य' प्रत्यय असूनही घेतला पाहिजे. मी चार वर्ण निर्माण केले असेच भगवंताचे म्हणणे आहे. 'चार वर्णत्व' निर्माण केले असे त्यांना अभिप्रेत नाही. तसेच हे सर्व जग 'ऐतदात्म्य' म्हणजे एतदात्मत्व आहे असे श्रुतीला सांगायचे नसून आत्मसार जग आहे म्हणजे आत्मा हेच या जगाचे सार आहे असे सांगायचे आहे. उपक्रमात सर्व जग आत्मस्वरूप जे सत् तद्रूप आहे असे सांगितले व उपसंहारात सद्रूप आत्मसार आहे असे सांगितले. यावरून उपक्रम व उपसंहार यात एक सद्रूप आत्मतत्त्वच सांगितले असल्याने व 'सत्' व 'आत्मा' एकच आहे असे स्पष्ट झाल्याने उपक्रम व उपसंहार या सहा पैकी एका अनुमानाने सद्रूप आत्मतत्त्व श्रुतितात्पर्य विषय आहे असे सिद्ध झाले.

आता अभ्यास म्हणजे वारंवार निरनिराळ्या दृष्टान्ताने तीच गोष्ट सांगणे हे तात्पर्य दाखविणारे दुसरे अनुमान किंवा हेतू आहे याचा विचार करू.' स आत्मा तत्त्वमसि श्वेतकेतो' म्हणजे ते सद्रूपच आत्मा आहे व तू तो सद्रूप आत्मा आहेस तत्त्वमसि श्वेतकेतो' म्हणजे ते सद्रूप आत्मतत्त्व तू आहेस असे सांगितले आहे. येथे 'सदेव' असे नऊ वेळा ते सद्रूप आत्मतत्त्व तू आहेस असे सांगितले आहे. येथे 'सदेव' असे नपुसकलिंगाने सद्रूप ब्रह्माचा निर्देश करून नंतर त्यालाच 'सः' अशा पुल्लिंगाने सांगितले आहे. परंतु विधान आत्म्याचे करण्याचे असल्याने व आत्म शब्द पुल्लिंगी असल्याने विधेयाचे लिंग सः या पुल्लिंगाने दाखविले आहे. 'शैत्यं हि यत् सा प्रकृतिर्जलस्य' येथे प्रकृती या अर्थाचे विधान असल्याने शैत्य शब्द नपुसकलिंगी असूनही 'सा' या स्त्रीलिंगी शब्दाने शैत्य दाखविले आहे. तद्वत् हे समजावे. याप्रमाणे नऊ वेळा ते ब्रह्म तू आहेस, ते ब्रह्म तू आहेस असे सांगितले असल्याने अभ्यास हे दुसरे लिंगब्रह्म व आत्मा हे एक आहेत या विषयी प्रमाण झाले.

अपूर्वता म्हणजे जो अर्थ पूर्वी आपणाला न कळलेला असतो तो अर्थ 'अपूर्व' असतो. जीव व ब्रह्म हे एक आहेत असे श्रुतीहून इतर कोणत्याही

प्रमाणाने निश्चित समजू शकत नाही. म्हणून असा एखादा अर्थ ग्रंथात असल्यास अपूर्वता या लिंगाने त्या ग्रंथाचे तेथे तात्पर्य आहे असे ओळखता येते. जो अर्थ इतर प्रमाणाने कळला तोच येथे सांगितला तर तो ग्रंथ किंवा ते वाक्य ज्ञात अर्थाला ज्ञापक असल्याने त्यात नावीन्य काही नाही म्हणून ते अनुवादक होतील. जसे 'अग्निर्हिमस्य भेषजम्' हे वाक्य वेदात आहे. हे अपूर्व अर्थाला प्रतिपादक नाही. अग्नी थंडी जाण्याचे औषध आहे हे वेदांनी सांगण्याचे कारण नाही. प्रत्यक्ष प्रमाणानेच आपणास ते माहीत आहे. म्हणून त्या अर्थात वाक्याचे तात्पर्य नसते. प्रतिपाद्य अर्थ प्रमाणान्तराने न कळलेला पाहिजे. नाहीतर श्रोता त्या अर्थाच्या श्रवणास कंटाळा करील. म्हणून 'अपूर्वता' म्हणजे प्रमाणान्तरागम्यता हे तात्पर्य काढण्याचे एक मोठेच 'लिंग' आहे. छांदोग्यात ब्रह्मात्म्यैक्य प्रमाणान्तराला अगम्य आहे असे स्पष्ट दाखविले नाही. परंतु श्रद्धत्स्व असे वारंवार म्हटले असल्याने त्यावरून 'अपूर्वता' दाखविली जाते. नाहीतर इतर प्रमाणाने जर तो अर्थ समजत असेल तर श्रद्धा ठेव असे सांगण्याचे कारणच नाही. जेवल्यानंतर पोट भरले हे प्रत्यक्ष माहीत असता पोट भरले यावर श्रद्धा ठेव असे कोणीही म्हणत नाही. अननुभूत अशा अर्थाविषयी जे ज्ञान तेच खरे की खोटे असा संशय येतो व आप्त पुरुष त्याला यावर श्रद्धा ठेव असेच सांगत असतो कारण त्यांनी त्या अर्थाचा अनुभव घेतलेला असतो. म्हणून श्रद्धा ठेव असे ज्या अर्थी वक्ता वारंवार सांगतो त्याअर्थी तो अर्थ श्रोत्याला अपूर्वच आहे. म्हणून वक्त्याचे त्या अर्थात तात्पर्य आहे असे सिद्ध करणारे 'अपूर्वता' हे लिंग आहे. शिवाय 'औपनिषदं पुरुषं पृच्छामि' असे बृहदारण्यकात म्हटले आहे. औपनिषद म्हणजे उपनिषत् प्रमाणांनीच कळणारा असा अर्थ घेतला पाहिजे. नाहीतर जो अर्थ इतर प्रमाणांनीही कळतो त्याला उपनिषत् हे विशेषण देणे चुकीचे. रूप हे चक्षूंचाच विषय असे म्हणण्यात इतर कोणत्याही इंद्रियांचा तो विषय नाही हे जसे सिद्ध होते तद्वतच येथे 'औपनिषद' या पदाचा अर्थही ब्रह्मात्म्यैक्य श्रुती तर कोणत्याही प्रमाणाचा विषय नाही ही अपूर्वता बृहदारण्यकाने स्पष्टपणे सांगितली आहे म्हणून छांदोग्यात सुद्धा अपूर्वता दर्शविली आहे याला दुजोरा येतो.

आता चौथे लिंग 'फल' हे आहे. ज्याच्यापासून लोकांना काही फायदा होईल अशा अर्थातच ग्रंथाचे तात्पर्य असते. नाहीतर 'प्रयोजनमनुद्दिश्य न मन्दोऽपि प्रवर्तते', म्हणजे गांवढळ माणूसही कांही फायद्याशिवाय प्रवृत्त होत नाही. मग ज्यापासून काहीच फायदा नाही असा ग्रंथ साधारण ग्रंथकारसुद्धा करण्यास धजत नाही. मग सर्वश्रेष्ठ असणारी श्रुती प्रयोजनाशिवाय असणारा विषय काय म्हणून प्रतिपादन करील. म्हणून जेथे प्रयोजन किंवा 'फल' दाखविले असेल तो अर्थ त्या वक्त्याला किंवा वाक्याला अभिप्रेत असला पाहिजे. प्रकृतश्रुतीत 'येनाश्रुतंश्रुतंभवति

अश्रुतंश्रुत (भवति) अमतंमत (भवति) अविज्ञातंविज्ञातं (भवति) म्हणजे ज्या ब्रह्मात्मैक्याच्या ज्ञानाने न ऐकलेल्या गोष्टी सहज कळतात, न विचार केलेल्या गोष्टी सहज विचारात येतात व न जाणलेल्या गोष्टी सहज जाणल्या जातात असे या ज्ञानाचे फल दाखविले आहे. अर्थात् 'फल' या लिंगाने या वाक्याचे तात्पर्य या अर्थात् आहे. म्हणून चौथे लिंग वक्त्याचे तात्पर्य कोणत्या अर्थात आहे हे दाखविणारे आहे. खऱ्या ब्रह्मज्ञाला सर्व काही कळत असते असे त्याचे सामर्थ्य सर्व लोकातही प्रसिद्ध आहे. खरा ब्रह्म-निष्ठ ईश्वर स्वरूपच झालेला असतो. म्हणून त्याला सर्व काही कळत असते. म्हणून जे जाणल्याने सर्व कळते ते सद्रूप ब्रह्म आहे.

पाचवे लिंग 'अर्थवाद' हे आहे. छांदोग्य षष्ठाध्याय जीव ब्रह्मैक्यरूप निर्गुण ब्रह्म प्रतिपादक असल्याने व यात असलेले अर्थवाद स्वतः प्रयोजन शून्य असल्याने त्यांना अर्थवाद असे नाव पडले. जीवब्रह्मैक्याला दाखवून देणारे 'तत्त्वमसि' वाक्य हे अज्ञातज्ञापक आहे म्हणून ते विधिसारखेच आहे. त्या तत्त्वमसी वाक्यार्थाला पुष्ट करणारे हे अर्थवाद वेदान्ताचे अंगभूत आहेत. यामुळे अर्थवादही अज्ञात अशा मुख्य अर्थाला म्हणजे जीवब्रह्मैक्याला ज्ञापक म्हणजे लिंग किंवा हेतू आहेत. हे अर्थवाद पाच प्रकारचे आहेत. म्हणजे सृष्टि-स्थिती-लय-नियमन-व प्रवेश अशा अर्थाला सांगणारे आहेत 'तदैक्षत बहुस्यांप्रजायेय तत्तेजोऽसृजत' म्हणजे त्या सृष्टीपूर्वी असलेल्या सद्रूप ब्रह्माने मी पुष्कळ व्हावे असा विचार केला. त्याकरिता अनेक रूपे मी धारण करावी असे ठरविले व मग आकाश, वायू याला उत्पन्न करून त्याने तेज जल व अन्न इत्यादी सृष्टी केली. हा सृष्टीरूप अर्थवाद झाला. 'सन्मूलाःसोम्येमाःसर्वाःप्रजाःसदायतनाःसत्प्रतिष्ठाः' म्हणजे सर्व उत्पन्न होणारे आकाशादी पदार्थ सन्मूल म्हणजे सद्ब्रह्मापासून झालेले, सद्ब्रह्मात राहाणारे व त्यालाच अधिष्ठानत्व देणारे आहेत. या अर्थवादाने 'स्थिती' व 'लय' दाखविला. 'तेजःपरस्यांदेवतायां' म्हणजे आकाश, वायू, तेज वगैरे सृष्टी सद्ब्रह्मरूप परदेवतेत लीन होते. या वाक्याने प्रलयरूप अर्थवाद दाखविले 'प्राणबन्धनंहि सोम्यमनः' या वाक्याने 'नियमन' म्हणजे नियंत्रण आपला ताबा मन वगैरे पदार्थावर आहे असे दाखविले आहे. 'प्राणबन्धनं' या पदात प्राणाच्या आधीन मन वगैरे पदार्थ आहेत असे म्हटले आहे. परंतु येथे 'प्राण' शब्दाचा अर्थ सद्रूप ब्रह्मच आहे असा शांकर भाष्यात अर्थ केला आहे. अर्थात ब्रह्मच प्राणोपाधी घेऊन नियमन करीत असते असे सिद्ध झाले. हा नियमनरूप अर्थवाद झाला 'सेयंदेवतैक्षत हन्ताहमिमास्तिस्रो-देवता अनेन जीवेनात्मनानुप्रविश्य नामरूपे व्याकरवाणीति'। म्हणजे ही सद्ब्रह्मरूप देवता असे म्हणाली की या तीन म्हणजे तेज, जल व पृथ्वी या देवतेत जीवरूपाने प्रविष्ट होऊन मी जगाची नामे व रूपे पृथक पृथक करीन. या छांदोग्य श्रुतीत तीनच देवता धरल्या आहेत. आकाश व वायू देवता सोडल्या आहेत. परंतु इतर

उपनिषदात आकाश व वायू यांच्या सृष्टीनंतर तेज वगैरे सृष्टी सांगितली असल्याने भाष्यादिकात आकाशादी पाच देवता धरल्या आहेत. एकंदरीत सद्-ब्रह्मरूपदेवता आकाशादी पाच देवतेमध्ये जीवरूपाने प्रविष्ट झाली. हा प्रवेशरूप अर्थवाद झाला. या पाच अर्थवादाने म्हणजे पाच अर्थवादरूपलिंगाने अज्ञात जीव ब्रह्मैक्यरूप अर्थ निश्चित होतो. त्यापैकी सृष्टी, स्थिती व लय ब्रह्मापासून होतो. या म्हणण्यावरून ब्रह्म हे प्रपंचाहून वेगळे नाही. कारणाहून कार्य व कार्याहून कारण वेगळे नसते. जसे घटाहून माती व मातीहून घट वेगळा नसतो. ‘नियमन’ या अर्थवादाने कार्याला ताब्यात ठेवणारे कारण चेतन आहे असे दाखविले आहे. जगात अचेतन पदार्थ दुसऱ्याचे नियमन करू शकत नाही. नियमनास चैतन्याची गरज आहे. ब्रह्मच आकाशादी देवतारूप कार्यात प्रविष्ट झाल्याने कार्यात दिसून येणारा जीव ब्रह्मरूपच आहे असे प्रवेशरूप अर्थवादाने सिद्ध झाले हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. यामुळे ‘तत्त्वमसि’ या वाक्यास पुष्टी येते म्हणून अर्थवाद हे पाचवे लिंग आहे.

आता ‘उपपत्ती’ म्हणजे ‘युक्ती’ हे सहावे लिंग आहे. ‘यथा सोम्यैकेन मृत्पिण्डेन सर्वं मृण्मयं विज्ञातं स्याद्वाचारंभणं विकारोनामधेयं मृत्तिकेत्येवसत्यम्’ म्हणजे एका मृत्पिंडरूप मातीच्या विकाराचे तत्त्व समजले म्हणजे सर्व विकाराचे ज्ञान होते. ते असे की विकार हे सर्व काल्पनिक असून त्यांच्या उत्पत्ति स्थिती व लय या तीनही अवस्थेत एकरूप असणारी माती हीच सत्य आहे. बाकी सर्व विकार खोटे व केवळ नाममात्र आहेत. त्याचप्रमाणे सर्व जगत्स्वरूप ब्रह्माचे कार्य नाममात्र व मिथ्या असून एक ब्रह्मतत्त्वच कालत्रयामधे राहाणारे खरे आहे असे युक्तीने सिद्ध होते. हे सहावे लिंग झाले. अशा सहा लिंगाने छांदोग्यउपनिषदाचा जीवब्रह्मैक्यरूप अर्थ जसा निश्चित झाला तसा इतर उपनिषदांचाही अर्थ निश्चित होऊन उपक्रमादी षड्विधलिंगाने सर्ववेदान्ताचे अद्वैत ब्रह्माचे ठिकाणीच तात्पर्य आहे असा निश्चय माझ्या अंतःकरणात व्हावा अशी आपल्या सर्व संतांच्या चरणी अनन्य भावाने प्रार्थना आहे. ती ऐकून तुला तसा दृढ निश्चय होवो असे सर्व सन्तमहात्मे तथास्तु असे त्रिवार म्हणाले. ॥ १५ ॥

## — श्रीमद्‌विद्यारण्यस्वामीविरचितसार्थसद्‌गुरुप्रार्थना —

लेखक– पंडित आत्मारामशास्त्री जेरे, ठाणे.

### प्रार्थना सोळावी

गुरुमुखाच्छ्रुतस्याद्वितीयवस्तुनो वेदान्तानुगुणयुक्तिभिरनवरतमनुचिन्तनं भूयादितिभवन्तो महन्तोऽनुगृह्णन्तु ॥१६॥ तथास्तु तथास्तु तथास्तु ॥

**विवरण** – "आजीवितं त्रयःसेव्या वेदान्तोगुरुरीश्वरः । आदौज्ञानाप्तये पश्चात्कृतघ्नत्वनिवृत्तये ॥" असे शास्त्र सांगते. साधकजनसाच्या जीविताचे दोन भाग आहेत. एक ब्रह्मज्ञानोत्पत्तीच्या पूर्वीचा भाग व दुसरा ज्ञानोत्पत्तीनंतरचा भाग. या दोन्हीही भागात वेदान्त, गुरू व ईश्वर या तिघांची सेवाशुश्रूषा करण्यास वरील श्लोकात्मक शास्त्र सांगते. यात 'पाठक्रम' वेदान्त, गुरू व ईश्वर असा आहे. परंतु वेदान्त श्रवणादी गुरूशिवाय होऊ शकत नाही व ईश्वरोपासनेशिवाय गुरूची प्राप्ती होत नाही, असे निश्चित झाले आहे, म्हणून येथे 'अर्थक्रम' स्वीकारून ईश्वर साक्षात्कारापर्यंत कर्माने शुद्धचित्त झालेल्या साधकाने ईश्वरोपासना करावी. उपासनेने प्रसन्न झालेला ईश्वर सद्‌गुरूची भेट करून देतो व सद्‌गुरूच्या अनुग्रहाने श्रवण मनन निदिध्यासनाने अद्वितीय सच्चिदानंदब्रह्म व जीव यांच्या एकात्मतेचा साक्षात्कार होऊन साधक कृतकृत्य होतो. अर्थातच ब्रह्मसाक्षात्कार होण्यापूर्वी ईश्वर, गुरू व वेदान्त यांची सेवा आवश्यकच आहे. ब्रह्मसाक्षात्कार झाल्यावर साधक जरी कृतकृत्य झाला असला तरी तुर्यारूप सप्तमभूमिका प्राप्त होईपर्यंत स्वतः किंवा परतोव्युत्थानरूप देहभान साधकाला असल्याने त्याने ब्रह्मसाक्षात्कारानंतरही कृतघ्नतादोष निवृत्तीकरिता वेदान्तादित्रयाची सेवा केली पाहिजे. ज्या त्रयीने आपणास कृतकृत्यता आली त्यांना विसरणे कृतघ्नतादोष संपादक आहे. 'कृतघ्नता' ह्या फार मोठा दोष आहे. **'कृतघ्नेनास्तिनिष्कृतिः'** म्हणजे कृतघ्नतादोषाला काही प्रायश्चित्त असूच शकत नाही. इतर सर्व पातकांना प्रायश्चित्त आहे. या विचारावरून तत्त्वसाक्षात्कारापूर्वी व नंतरही वेदान्त, गुरू व ईश्वर यांची उपासनारूप सेवा केली पाहिजे. हे सर्व लक्षात घेऊन ब्रह्मसाक्षात्कारी 'विद्यारण्य' स्वामीमहाराज या सोळाव्या प्रार्थनेत या सेवेची याचना करीत आहेत. ते म्हणतात, हे महाभागवत परमश्रेष्ठ संतमहाराज ! आपल्याच कृपाशीर्वादाने अनेक काळपर्यंत कर्मानुष्ठान करून मी शुद्ध चित्त झालो म्हणजे पाप व त्याचे फलरूप कामक्रोधादी सर्व दोष माझ्या चित्तातून गेले व मला ईश्वर भजनाची आवड निर्माण झाली. परमकृपाळू ईश्वराने मला सद्‌गुरू म्हणजे ब्रह्मात्म्यैक्यरूपतत्त्वाचे आवरण दूर करणारे गुरू दाखविले. **"गुं-अविद्यां रुणद्धि"** म्हणजे अविद्येचा रोध किंवा नाश करणारे असे गुरू म्हणजेच ब्रह्मात्मैक्यरूप जे सत्तत्त्व त्याच्या आवरणाचा नाश करणारे सद्‌गुरू दाखविले. मी

पं....४

त्यांच्या सेवेत तत्पर झालो व त्यांच्या कृपेने त्यांच्या श्रीमुखातून आलेल्या अनुभवपूर्ण तत्त्वमस्यादी वेदान्तवाक्याच्या श्रवणाने व गुरुमहाराजांच्या प्रभावाने मला अद्वितीय ब्रह्मात्मैक्य वस्तूचा अपरोक्ष साक्षात्कार झाला व मी खरोखर कृतकृत्य झालो. आता गुरुमुखातून ऐकलेल्या व वेदान्तशास्त्राला अनुकूल म्हणजे वेदांतशास्त्रात सांगितलेल्या ज्या अद्वितीय ब्रह्मात्मैक्याला सिद्ध करून देणाऱ्या अनेक युक्ती आहेत. त्या युक्तींनी निरंतर म्हणजे प्रारब्धानुसार देहपात होईपर्यंत म्हणजे देहभान असेपर्यंत एकसारखे अद्वितीय ब्रह्मात्मैक्याचेच अनुसंधान **'तच्चिंतनंतत्कथनमन्योन्यंतत्प्रबोधनम् । एतदेकपरत्वंच ब्रह्माभ्यासंविदुर्बुधाः'**॥ या वाक्याप्रमाणे सर्वदा सतत स्मरण मला होवो अशी आपण कृपा करा. ज्यामुळे माझे व माझ्या संगतीत असणारे इतर साधक महात्मे यांचेही परम कल्याण होईल व उभयतांचाही कृतघ्नतादोष निवृत्त होईल. आळी स्वरूपतः भुंगा नसून त्याच्या दंशाच्या भयानें ती भ्रमरध्यास करून काही काळाने भ्रमर होते. मग मी तर पूर्वीपासूनच सच्चिदानंदब्रह्मरूप आहे. अविद्येनेच जीवभाव मला झाला आहे. तरी या अनवरत चिंतनाने माझे व माझ्या संगतीस असणारे इतर साधक यांचे जीवब्रह्मात्मैक्यरूपकल्याण व कृतघ्नता निवृत्ती का होणार नाही? अवश्यच होईल. तरी ते परमकल्याण आपल्या कृपेने अवश्य होवो अशी आपल्या चरणी माझी अनन्यभावाने प्रार्थना आहे. ती ऐकून तुला तसेच होवो असे त्रिवार संत म्हणाले. ॥ १६ ॥

### प्रार्थना सतरावी

**विजातीयदेहादिप्रत्ययानन्तरितसजातीयसच्चिदानन्दात्मप्रत्ययप्रवाहो निरन्तरं भूयादितिभवन्तो महान्तोऽनुगृण्हन्तु ॥१७॥ तथास्तु तथास्तु तथास्तु॥**

**विवरण :**—अनादीकालापासून प्राणिमात्राला देह, इंद्रिय, मन, बुद्धी अहंकार, प्राण वगैरे जे अनात्म म्हणजे आत्मभिन्न पदार्थ यांच्या मध्येच तादात्म्यप्रत्यय म्हणजे मी मनुष्य किंवा पशू किंवा देवदैत्यादी आहे, तसेच मी संकल्प किंवा विकल्पयुक्त आहे, मला भूक, तहान आहे, मला अमुक गोष्टीचा निश्चय आहे किंवा मी मोठा विद्वान् किंवा श्रीमान् आहे इत्यादी प्रत्ययच त्याला आजपर्यंत आहेत. शास्त्राने सांगितल्याप्रमाणे मी सच्चिदानंदब्रह्मरूप आहे, असा खरा विश्वासयुक्त प्रत्यय कधीच नाही. खरा विश्वासयुक्त म्हणण्याचे कारण कदाचित् आत्मनिरूपण काली तो तसे म्हणतही असेल. परंतु ते तात्पुरतेच असते. त्यावर त्याचा दृढविश्वास नाही. मी मनुष्य आहे, पुरुष आहे किंवा स्त्री आहे या अनुभवावर जसा दृढ विश्वास आहे, तसा दृढ विश्व.स मी परब्रह्मरूप आहे, या अनुभवावर नाही. मी मनुष्य, पुरुष किंवा स्त्री आहे हे तो सर्वदा काही घोकत नसतो. परंतु अनादी काल या अनुभवाचीच आवृत्ती होत असल्याने त्या अनुभवाचे संस्कार इतके दृढ झालेले आहेत की तो चुकून सुद्धा पुरुष असला तर मी स्त्री आहे व स्त्री असली तर मी पुरुष आहे असे म्हणणार नाही. प्रसंग आल्याबरोबर स्त्री किंवा पुरुष या

अनुभवाचे संस्कार जागृत होऊन तो त्याप्रमाणे व्यवहार करीत असतो कारण हे संस्कार फार दिवसाचे आहेत. परंतु ते अविद्येने निर्माण केले असल्याने विद्याजन्य अहंब्रह्मास्मि या संस्कारापेक्षा दुर्बल आहेत. कारण विद्याजन्य संस्कार प्रमाणजन्य आहेत म्हणून ते प्रभावशाली आहेत. विद्या व अविद्या यामध्ये विद्येचाच प्रभाव जोरदार असतो म्हणून त्या संस्काराने अविद्या संस्कार अभिभूत होऊन आपले कार्य करण्याला ते समर्थ होत नाहीत. विद्याजन्य संस्काराला प्रमाणाचे बल असल्याने त्याच्यापुढे अविद्याजन्य संस्कार अनादी कालापासून असले तरी ते फिक्के पडतात. पण विद्याजन्य संस्कार दृढ होण्याकरिता निदिध्यासनाची अत्यंत आवश्यकता आहे. कारण विद्याजन्य संस्कार प्रमाणजन्य असल्याने प्रभावी असले तरी कोवळे बाभळीचे किंवा बेलाचे काटे मृदू अवस्थेत टोचण्याचे व अंगातून रक्त काढण्याचे काम न करता उलट खाण्यास उपयोगी होतात. तसे न व्हावे व त्यांनी दुसऱ्या संस्काराचा म्हणजे विजातीय संस्काराचा अभिभव म्हणजे पराभव करावा अशी इच्छा असल्यास विद्याजन्यसंस्कारांना नैरंतर्य आदर व सत्कार याने बळकट केले पाहिजे. म्हणजे एकसारखे विजातीय अनात्म प्रत्यय न येऊ देता सजातीय अहंब्रह्मास्मि हे प्रत्ययच चालू ठेवले पाहिजेत. यासाठी 'आत्मानात्मविचार' रूप ग्रंथात परमपूज्य दत्तावतार टेंबेमहाराजांनी व इतर सर्व संतांनी सर्व व्यवहार सोडून तू स्वरूपानुसंधान करीत जा असे व स्वस्वरूपानुसंधान म्हणजे भक्ती आहे असे विवेकचूडामणी ग्रंथात भगवत्पूज्यपादांनी म्हटले आहे. विद्यारण्यमहाराजही या सतराव्या प्रार्थनेत विजातीय अनात्मप्रत्ययांनीरहित सजातीय **"मी सच्चिदानन्द परब्रह्मरूप आहे"** अशा प्रत्ययाचा म्हणजे वृत्तीचा प्रवाह तैलधारेप्रमाणे अखंड होवो अशी प्रार्थना म्हणजे मागणी संतांच्या जवळ करतात. ती ऐकून संतकृपेने तुला तसाच सच्चिदानन्दब्रह्म मी आहे असा वृत्तिप्रवाह निरंतर होवो असे त्रिवार म्हणाले. ॥ १७ ॥

## प्रार्थना अठरावी

**असंगोहं चिदात्माहमिति प्रत्यगात्मनि निवेशिते वृत्तिरहिते संस्कारमात्र शेषतया सूक्ष्मरूपेणावस्थिते चित्ते आत्मनः स्वरूपभूतपरमानंदो निरन्तरं सम्यगाविर्भूयादितिभवन्तो महान्तोऽनुगृण्हन्तु ॥ १८ ॥**

**तथास्तु तथास्तु तथास्तु ।**

**विवरण :–** मी असंग आहे म्हणजे अविद्याप्रभृती अनात्मपदार्थांच्या संगाने म्हणजे संबंधाने रहित आहे. शुक्ती जशी भ्रमकाली, भ्रमाच्या पूर्वी व भ्रमाच्या नाशानंतर म्हणजे कालत्रयात रजताच्या संबंधाने रहित आहे तसा मी सुद्धा अविद्यादी अनात्म्यांच्या भ्रमकाली, भ्रमणापूर्वी व तत्त्वज्ञानाने भ्रमाचा नाश झाल्यावरही अविद्यादी अनात्मपदार्थांच्या संबंधाने रहित आहे. म्हणजे माझा व अनात्म्यांचा कालत्रयात कधी संबंधच झाला नाही, म्हणजे मी असंग आहे. संसारवृक्षाच्या म्हणजे भ्रमाच्या नाशाकरिता सांगितलेले '**असंगशस्त्रेण दृढेन छित्वा**' यात

वर्णन केलेले जे असंग शस्त्र आहे ते वर सांगितल्याप्रमाणे मी असंग आहे असे जे दृढचिंतन हेच ते शस्त्र आहे व मी सच्चिदानन्दरूप आत्मा आहे असे दुसरे चिंतन. ही दोन्ही चिंतने सतत प्रवाहाप्रमाणे राहून कालांतराने सूक्ष्म होतात. म्हणजे हे दोन वृत्तीरूप तरंग टाकून अन्तःकरण निर्विकल्प अवस्थेस म्हणजे तरंगरहित सागराच्या अवस्थेप्रमाणे वृत्तिरहित अन्तःकरणरूप निर्विकल्प अवस्थेस प्राप्त होते. यालाच '**योगश्चित्तवृत्तिनिरोधः**' असे भगवान् पतंजली 'योग' असे नाव देतात. व हा योगच एक असलेल्या जीवब्रह्माचा भ्रमाने केलेला वियोग व त्यामुळे झालेला दुःख संयोगाचा वियोग म्हणजे नाश करणारा आहे. म्हणूनच भगवन्तानी '**दुःख-संयोगवियोगं योगसंज्ञितं**' असे याला म्हटले आहे. या अवस्थेत सच्चिदानंद परमात्मा व अन्तःकरण हे जवळ जवळ सारखेच असतात. जवळ जवळ म्हणण्याचे कारण एवढेच की परमात्मा सर्वदाच वृत्तिरहित असतो व चित्त या अवस्थेतच क्लिष्ट व अक्लिष्ट अशा उभयरूपवृत्तीनेरहित असते. या अवस्थेलाच संस्कारमात्र शेष अवस्था किंवा सूक्ष्म अवस्था असे म्हणतात. या अवस्थेत चित्तात प्रथमपासूनच भरून असलेला आत्मस्वरूपभूत परमानंद प्रगट होतो. ज्याप्रमाणे विहीर खणत असताना जेवढी माती काढावी तेवढ्या जागेत पूर्वी असलेलेच आकाश प्रगट होते. सर्वच माती काढली तर आरपार भोक पडून सर्व आकाशच आकाश होते तद्वतच येथे समजावे. येथे वृत्ती या मातीच्या जागी व आत्मानंद हा आकाशाच्या जागी दृष्टांताने समजावयाचा आहे. जसा माती काढण्याचा प्रयत्न आकाशास प्रकट करणारा होतो तसा वृत्तिनिरोधाचा प्रयत्न स्वरूपानंद प्रकट करणारा आहे एवढेच येथे दृष्टान्त व दार्ष्टान्तिकात साम्य घ्यायचे आहे. तरी या सूक्ष्म झालेल्या चित्तात किंवा अन्तःकरणात स्वरूपभूत परमानंद निरंतर व सम्यक् म्हणजे स्पष्टरूपाने आविर्भूत होवो अशी सर्व संतचरणाजवळ माझी प्रार्थना आहे. ती ऐकून संत-महात्मे हा तुझा स्वतःचाच असलेला परंतु वृत्तीने अदृश्यतेला पावलेला तुझा स्वरूपभूत आनंद निरंतर स्पष्ट रूपाने प्रकाशित होवो असा आमचा आशीर्वाद तुला आहे, असे त्रिवार तसेच होवो, असे तथास्तु या शब्दाने म्हणाले. ॥१८॥

## प्रार्थना एकोणीसावी

**अहमात्मा साक्षी केवलचिन्मात्र स्वरूपो नाज्ञानं तत्कार्यं च किंतु नित्यशुद्ध-बुद्ध-मुक्त-सत्य-परमानन्दा-द्वयं ब्रह्मैवास्मीत्यभेदेनावस्थानं समाधिः, अन्तःसमाधिना दृग्दृश्य विवेके, बहिःसमाधिना ब्रह्मसर्ग विवेके च दृढे जाते तेन विवेकद्वयेनायं गलितदेहाभिमानी विज्ञातपरमात्मतत्त्वश्च भूयादितिभवन्तो महान्तोऽनुगृह्णन्तु ॥१९॥ तथास्तु तथास्तु तथास्तु ॥**

**विवरण** – मी आत्मा आहे असे समजणारे लोक जगात फारच थोडे आहेत. हजारो लाखो माणसात एखादाच माणूस मी आत्मा आहे असे ओळखणारा असतो. '**मनुष्याणांसहस्त्रेषुकश्चित्**' असे उगीच म्हटले नाही. इतर सर्व अनात्मा

व आत्मा यांच्या मिश्रणालाच मी आहे असे समजत असतात. **'आप्नोतीत्यात्मा'** म्हणजे जागृतीत इंद्रियादी साधनाने रूपरसादी सर्व विषयाला व्यापून टाकणारा म्हणजे त्यांचा उपभोग घेणारा आत्मा असा एक अर्थ म्हणजे जागृतीरूप अवस्था विशिष्ट आत्मा म्हणजे सोपाधिकच आत्मा झाला. दुसरा अर्थ **'आदत्ते इत्यात्मा'** म्हणजे जागृदवस्थेत घेतलेल्या अनुभवाच्या वासना म्हणजे अनुभवांची सूक्ष्मरूपे घेऊन स्वप्नातील सूक्ष्म विषयांचा अनुभव घेणारा आत्मा म्हणजे स्वप्नरूप उपाधि-विशिष्ट आत्मा हाही सोपाधिकच आत्मा. हा आत्मशब्दाचा दुसरा अर्थ झाला. तिसरा अर्थ 'अत्ति' इत्यात्मा म्हणजे सर्व द्वैताचे भक्षण करून सुषुप्ती अवस्थेत निद्राकाली जागृदवस्था व स्वप्नावस्था या अवस्थेतील सर्व दृश्यांचे भक्षण करून म्हणजेच लय करून अज्ञानरूप कारणोपाधियुक्त होऊन राहाणारा म्हणजे सुषुप्ती अवस्था विशिष्ट आत्मा हा आत्मशब्दाचा तिसरा अर्थ आहे. हे तीन्ही अर्थ सोपाधिक आत्माच दाखविणारे आहेत. 'यच्चाप्नोति, यदादत्ते, यच्चात्तिविषयानिह अशा शब्दाने या श्लोकात जागृत्-स्वप्न व सुषुप्ती अशा अवस्थांनी युक्त तीन आत्मे उपाधिभेदाने भिन्न असे दाखवून **'यच्चास्यसंततोभावस्तस्मादात्मेतिगीयते'** अशा दुसऱ्या अर्ध उत्तर श्लोकात म्हणजे श्लोकाच्या उत्तरार्धात् शुद्ध आत्म्याचे निरूपण केले आहे. या उत्तरार्धाचा अर्थ सतत ज्ञानरूप, सतत आनंदरूप व सर्वदा अबाधित हा सच्चिदानंदरूप खरा व मुख्य जो आत्म शब्दाचा अर्थ तो दाखविला आहे व हेच आत्म्याचे स्वरूप लक्षण आहे. जगाची उत्पत्तीस्थितीलय करणारा व जाग्रत्स्वप्नसुषुप्तीयुक्त असा आत्मा हे आत्म्याचे तटस्थ लक्षण आहे. तटस्थ लक्षण सर्वदा असत नाही. मुक्तिकाळी आत्म्याला जगदुत्पत्तिस्थितीलय कर्तृत्व व जाग्र-स्वप्नसुषुप्ती अवस्थायुक्तत्व असत नाही. परंतु हे आत्म्याहून इतर जड वर्गाला संभवत नसल्याने हे आत्म्याचे 'तटस्थ' लक्षण आहे. म्हणूनच मी आत्मा आहे म्हणजे आत्म शब्दाचा खरा अर्थ जे सच्चिदानन्दस्वरूप ते मी आहे असे कोणीच समजत नाहीत. याचे कारण जागृती, स्वप्न व सुषुप्ती या अवस्था सच्चिदानन्द आत्मा आहे अशा ज्ञानाला अनुकूल नाहीत. उलट प्रतिकूलच आहेत. हे स्वरूप समजण्यास शास्त्रकारांनी 'समाधी' अवस्थेचा अवलंब करण्यास सांगितले आहे. समाधी अवस्थेत जागृती नसते. म्हणजे इंद्रियांनी इंद्रियार्थांचे ज्ञान होत नाही. तेथे स्वप्नही नसते. म्हणजे जागृतीमधील अनुभवाच्या सूक्ष्मरूपाने किंवा संस्काराने काल्पनिक जगाचा अनुभवही नसतो व सुषुप्ती म्हणजे झोप किंवा केवलाज्ञानाचा अनुभवही नसतो म्हणजे समाधी अवस्थेत द्वैत भानही नसते व झोपही नसते. अशी ही विलक्षण समाधीरूप अवस्था आहे. यालाच 'योग' असे म्हटले आहे. **'योगश्चित्त-वृत्तिनिरोधः'** असे लक्षण पतंजलीमहर्षी प्रभृती योगाचार्यांनी श्रुत्यनुसाराने केले आहे. कर्माचे, उपासनेचे किंवा ज्ञानोपायाचे अनुष्ठान जागृतीतच करता येते. स्वप्न व सुषुप्ती या अवस्था साधनानुष्ठानाला अयोग्य आहेत. म्हणून जागृतीतच समाधीचा

अभ्यास केला पाहिजे व या करिताच जाग्रदवस्था जीवाला दिली आहे. त्या जागृतीचा उपयोग कर्म-उपासना व ज्ञानसाधन विचारादिकांहून इतरत्र केल्यास मनुष्य जन्म फुकट जातो व त्याची फार हानी होते, असे शास्त्रकार म्हणतात. आता समाधी या शब्दाचा अर्थ विद्यारण्य महाराज सांगतात, मी आत्मा आहे, म्हणजे अज्ञान व त्याचे कार्य किंवा परिणाम जे सर्व जगत् म्हणजे अनात्मा त्याहून मी वेगळा आहे. अज्ञान व तत्कार्यरूप मी नाही. मी अज्ञान व तत्कार्य याचा साक्षी आहे. साक्षी हा बोध व उदासीनता या अवस्थेनेच सदा युक्त असतो. अज्ञान व तत्कार्य यांचे काही बरे किंवा वाईट झाले तरी साक्षीला दोन्हीचा संबंध असत नाही. भांडणाऱ्या दोघांपैकी कोणाचा जय झाला तरी साक्षीला त्याबद्दल आनंद नाही व पराजय झाला तरी त्याबद्दल दु:ख नाही. अशी उदासीनता हे साक्षीचे स्वरूप आहे. हे नसेल तर तो साक्षीच नव्हे व बोध नसेल तरीही साक्षी नव्हे. '**औदासीन्यबोधाभ्यां साक्षित्वम्**' असे साक्षीचे लक्षण शास्त्रात केले आहे. नुसता उदासीन असेल तर तो 'जड' ठरेल. चेतन नव्हे. औदासीन्य नसेल तर साक्ष्य पदार्थात त्याचा अंतर्भाव होईल. म्हणजे तो जय किंवा पराजय यांनी युक्त होईल. तेव्हा मी आत्मा आहे व साक्षी आहे. म्हणजे केवळ चैतन्यमात्ररूप असून अज्ञान व तत्कार्य जे जग त्याला स्पर्श सुद्धा न करणारा असा आहे. म्हणजे जग अनित्य असले तरी मी नित्य आहे. जग अशुद्ध असले तरी मी शुद्ध आहे. जग जड असले तरी मी बोधरूप आहे. जग बद्ध असले तरी मी मुक्त आहे. जग असत्य असले तरी मी सत्य आहे. जग दु:खत्रयांनी युक्त असले तरी मी दु:खत्रयरहित परमानंदरूप आहे. जग द्वैतरूप असले तरी मी अद्वय ब्रह्मरूप आहे. अशा निश्चयाने म्हणजे नित्य-शुद्ध-बुद्ध-मुक्त-सत्य-परमानंद-अद्वयब्रह्मरूप मी आहे. अशा निश्चयासहित जेवढा वेळ सहाता राहील तेवढा वेळ राहणे याहून दुसरी वृत्ती मनात न आणणे याला 'समाधी' असे म्हणतात. समाधीत दोन प्रकार आहेत. एक अन्त:समाधी व दुसरी बहि:समाधी. समाधी शब्द संस्कृत भाषेत पुल्लिंगी आहे व मराठी भाषेत तो शब्द स्त्रीलिंगी वापरतात. समाधी लागला म्हणत नाहीत. समाधी लागली असे म्हणतात. हे भाषांतर मराठीत असल्याने येथे समाधीला स्त्रीलिंगीरूप दिले आहे असे समजावे. मी नित्य-शुद्ध इत्यादी आहे, अनित्य-अशुद्ध वगैरे नाही, अशा समाधीने द्रष्टा किंवा साक्षी व अज्ञान तत्कार्यरूप दृष्य यांचा विवेक होतो व बहि:समाधीने ब्रह्म व अज्ञान तत्कार्य जगत् यांचा विवेक होतो. एकंदरीत दोन्ही समाधीत 'चित्' व 'अचित्' यांचा विवेक होतो व त्या योगाने चित् व अचित् यांची अनेक काळ 'जी' गाठ बांधली गेली आहे ती सुटते. अज्ञान व तत्कार्य सर्व जगाचा लय करून केवल सच्चिदानन्दरूप मी आहे, याला व्यतिरेकपूर्वक समाधी असे म्हणतात व अज्ञान व तत्कार्य जगत् विद्यमान असताना हे सर्व ब्रह्मरूप आहे असा अभ्यास करणे याला अन्वय समाधी म्हणतात. अन्वय समाधी जातायेता बसताउठता सर्वकाळ करता,

येते व व्यतिरेक समाधी एकांतात आसनावर बसून पृथ्वी जलात लीन झाली, जल तेजात लीन झाले, या प्रकाराने सर्व कारण जे अज्ञान ते चेतन ब्रह्मात लीन झाले. आता केवळ नित्य-शुद्धादी ब्रह्मरूप मी आहे असे चिंतन करता येते. दोन्ही समाधी वारंवार करून अंत:समाधी व बहि:समाधी दृढ होतात व त्यामुळे आत्मा व अनात्मा ब्रह्म-अज्ञान व तत्कार्यरूप जगत् यांचा विवेक होऊन तिन्ही देहांचा अभिमान गलित होतो, म्हणजे नष्ट होतो. व परमात्मतत्त्व साक्षात्कार होतो. अशा समाधी अभ्यासाने देहात्माभिमान समूल नष्ट होऊन नित्य शुद्धादी परमात्मतत्त्वाचा साक्षात्कार मला आपल्या कृपेने व्हावा अशी माझी प्रार्थना सर्व संतमहात्मे यांच्या चरणी आहे. ती प्रार्थना ऐकून सर्व संतमहात्मे तुला विवेकद्वयपूर्वक तत्त्वसाक्षात्कार होवो असे त्रिवार म्हणाले. एकवार जरी संतांच्या मुखातून आशीर्वाद आला तरी याचक कृतार्थ होतो मग येथे तर त्रिवार संत तथास्तु असे म्हणाले. मग मला ते प्रार्थना फल प्राप्त होणारच हे निश्चित आहे. ।।१९।।

# श्रीमद्विद्यारण्यस्वामीविरचित सार्थ
# सद्गुरु–प्रार्थना

( लेखक — कै. पंडित आत्मारामशास्त्री जेरे, ठाणे )

## प्रार्थना विसावी

देहाद्बहिः सकलनामरूपात्मकेषुवस्तुष्वपि सर्पधारादिषु रज्जुरिव व्याप्तः सच्चिदानंदलक्षणोयः परमात्मा स एव पर शब्देनोच्यते, अंतरहमादिदृश्यविलक्षणोऽस्मत्प्रत्ययालंबनभूतः प्रत्यक् चिन्मात्र स्वरूपः साक्ष्याख्यो जीवात्मा स एवावरशब्देनोच्यते, परश्चासाववरश्चेति परावरः प्रत्यगभिन्नः परमात्मा तस्मिन्नेवमन्तर्बहिः पररूपेणावररूपेण चावस्थिते परमार्थतः परावरेब्रह्मणि "त्वंवाऽहमस्मि भगवो देवतेऽहं नैत्वमसीति" श्रुत्यनुसारेण 'अहंब्रह्मास्मि' 'ब्रह्मेवाहमस्मि' इतिव्यतिहारेणाखंडैकरसत्वेन साक्षात्कृते सति तेन परावरब्रह्मसाक्षात्कारेणास्य परावरब्रह्मसाक्षात्कारवतस्तव हृद्ग्रंथिभेदः सर्वसंशयनिवृत्तिः सर्वकर्मक्षयरूपः परमपुरुषार्थः सम्यक् भूयादिति भवन्तो महान्तोऽनुगृह्णन्तु ॥ २० ॥ तथास्तु तथास्तु तस्थास्तु ॥

[illegible] । [illegible]योपनिषदात 'भिद्यते हृदयग्रन्थिश्छिद्यंतेसर्वसंशयाः । [illegible] [illegible]कर्माणि तस्मिन् दृष्टे परावरे ' असा मंत्र आहे. याचा अर्थ त्या [illegible] [illegible] पाहिले असता हृदयग्रन्थी तुटून जाते. सर्व संशय नष्ट होतात. आणि [illegible] [illegible] [illegible] क्षीण होतात. म्हणजे परावर ब्रह्माला पाहाणारा प्राणी मुक्त होतो. हृदय-[illegible] [illegible] व [illegible] असणे म्हणजेच जीवाने बद्ध होणे आहे. हे तीन पाश नष्ट होणे [illegible] मुक्त होणे अशी वस्तुस्थिती आहे. खरे पाहिले असता जीवात्मा कधीच [illegible] [illegible] नाही व तो बद्ध नसल्याने मुक्त होणे हे ही संभवत नाही. बांधलेला मनुष्यच [illegible] [illegible] मुक्त होत असतो. जो बद्धच नाही तो मुक्त झाला हा व्यवहार खोटा आहे. जो कैदेत पडलाच नाही तो कैदेतून सुटला हे म्हणणे जितपत खोटे तितपतच [illegible] मुक्त झाला हेही म्हणणे खोटेच आहे. जीवात्मा नित्यमुक्त आहे, तशी [illegible] [illegible] आहे. म्हणूनच भगवंतानी एकादश स्कंधात '**बद्धो मुक्त इति [illegible] [illegible] मेनवस्तुतः**' असे उद्धवाला स्पष्ट सांगितले आहे. बद्ध-मुक्त हा [illegible] गौण आहे. मुख्य नाही. मुख्य व्यवहार बद्धही नाही व मुक्तही नाही असा आहे, परंतु गुणतः म्हणजे अज्ञानाने हा व्यवहार होत असतो. अज्ञानाने झालेल्या [illegible] नाश ज्ञानप्राप्ती शिवाय होत नाही. म्हणून परावररूप एकतत्त्वाच्या ज्ञानाची [illegible] अज्ञान्याला आहे. हे परावर एक तत्त्व समजून घेतले पाहिजे व हे समजून [illegible] अत्यंत श्रेष्ठ मनुष्यजन्म ईश्वराने जीवाला दिला आहे. मनुष्यजन्म [illegible] दुसरे काहीच प्रयोजन नाही. आता 'परावर' शब्दाचा काही लोक परे म्हणजे [illegible] [illegible] श्रेष्ठ, जे ब्रह्मविष्णुशंकरादी देव, ते सुद्धा ज्या ब्रह्मापेक्षा 'अवरे' म्हणजे [illegible] [illegible] आहेत म्हणजे सोपाधिक ब्रह्मविष्णू इत्यादी ब्रह्म निरुपाधिक ब्रह्मापेक्षा [illegible] [illegible] आहेत असा बहुव्रीही समास करतात व निर्विकल्प ब्रह्माला पाहिले [illegible] पाहणारा सर्व उपाधीतून मुक्त होतो असा अर्थ करतात. तोही अर्थ योग्यच आहे. परंतु विद्यारण्यांनी या प्रार्थनेत परश्चासौ अवरश्च म्हणजे पर व अवर हे दोनी [illegible] आहेत असा कर्मधारय समासच घेतला आहे. '**व्यतिहारो विशिंषंती ही [illegible] [illegible]**' या ब्रह्मसूत्रात व त्यावरील भगवत्पादांच्या भाष्यातही हाच अर्थ विवक्षित [illegible] [illegible] 'पर' म्हणजे उत्कृष्ट उपाधियुक्त ईश्वर म्हणजे सोपाधिक उत्कृष्ट ब्रह्म व निकृष्ट [illegible] [illegible] उपाधियुक्त जीव यांच्या परस्पर ऐक्याचे ध्यान हे व्यतिहाराने म्हणजे पर-[illegible] परस्पर विशेषण देऊन सांगले आहे व त्या योगाने जीव व ईश्वर या दोघांचे [illegible] [illegible] करून 'तत्त्वमसि' या वाक्यार्थाचा खुलासा केला आहे. एतरेय आरण्यकात [illegible] असलेल्या ईश्वररूप पुरुषाला उद्देशून जो मी तो तू आहेस व जो तू तो [illegible] [illegible] व जाबाल ऋषीसुद्धा आपल्या उपनिषदात "हे भगवती देवते ! जी तू [illegible] ती मी आहे व जो मी आहे ती तू आहेस," असे म्हणतात. आता जेथे [illegible] ऐक्य सांगितले असते तेथे विशेषणांचेही ऐक्य अर्थातच सिद्ध होते. [illegible] व उत्कृष्टोपाधी परस्पर अत्यंत भिन्न असल्याने त्यांचे ऐक्य संभवनीय

(31)

नाही म्हणून उत्कृष्टोपाधिउपलक्षित व निकृष्टोपाधिउपलक्षित विशेष्यभूत जे चैतन्य यांचेच ऐक्य येथे विवक्षित आहे. यालाच जहदजहल्लक्षणा असे म्हणतात. दोन्ही पदार्थापैकी विशेषणांश टाकून विशेष्यांशाचा परिग्रह करून दोहोतील विशेष्य जे चैतन्य यांच्या ऐक्याचे ध्यान येथे सांगितले आहे व या ध्यानामुळे एक तत्त्व ब्रह्माकार वृत्तीने त्या अद्वितीय ब्रह्माचा साक्षात्कार होऊन हृदयग्रंथीभेदादी कार्ये सिद्ध होतात व उपासक ब्रह्मरूप होऊन कृतकृत्य होतो. असा 'भिद्यते हृदयग्रंथिः' इत्यादी मांडुक्य मंत्राचा अर्थ आहे. तोच अर्थ या विसाव्या प्रार्थनेत विद्यारण्यांनी लिहिला आहे.

विद्यारण्य म्हणतात चैतन्याला देह हा उपाधी लावल्याबरोबर चैतन्याचे दोन भाग झाले. एक देहातील चैतन्य व एक देहाच्या बाहेरील चैतन्य. ज्याप्रमाणे उपाधी-रहित आकाश आतील व बाहेरील अशा भेदाने रहित आहे परंतु त्या आकाशाला घागर ही उपाधी लागल्याबरोबर घागरीतील आकाश व घागरीच्या बाहेरील आकाश असा आकाशात भेद होतो व घागर नष्ट झाली म्हणजे हा भेद नाहीसा होतो, तद्वतच चैतन्याला शरीर उपाधी लागली की आतील चैतन्य व बाहेरील चैतन्य असा व्यवहार होतो. देहाच्या बाहेर ज्या नाम व रूपात्मक घटपटादी वस्तू आहेत त्या सर्व चैतन्यावर अविद्येने कल्पित आहेत. ज्याप्रमाणे एकाच दोरीवर कुणाला साप असा भ्रम होतो, कुणाला ती काठी आहे असे वाटते व कुणाला ही पाण्याची धार आहे म्हणजे पाणी वाहात आहे असे वाटते. परंतु या तीन्ही कल्पना खोट्या असून दोरीच एक तीन्ही कल्पनेला आधार आहे. त्याप्रमाणे देहाच्या बाहेर असलेल्या घटपटादि सर्व वस्तूंच्य कल्पनेला आधार दोरीप्रमाणे चैतन्य आहे. घटाच्या बाहेरील वस्तूमध्ये जसे आकाश व्यापून आहे त्याप्रमाणे देहाच्या बाहेरील वस्तूत चैतन्यही व्यापून आहे. हे चैतन्य त्रिकाला बाधित आनंदरूप आहे. स्वप्रकाशरूप चैतन्य हेच त्रिकालामध्ये अबाधित म्हणजे 'सत्' व आनंदरूप आहे. आनंद, सत्य व ज्ञान यात भेद होऊच शकत नाही या शरीराच्या बाहेरच्या सच्चिदानंदरूप वस्तूलाच 'पर' असे म्हणतात. शरीरोपाधी घेतल्यामुळे बाहेर व आत असा चैतन्यात भेद झाला व बाहेरच्या चैतन्याला 'पर' असे नाव पडले. शरीराच्या आत असणारे जे चैतन्य ते शरीर, इंद्रिये, प्राण, मन, बुद्धी, अहंकार, चित्त वगैरे कल्पनेला आधार असल्याने दोरी जशी साप, जलधारा, काठी वगैरे भ्रमाला आधार झाली व ती दोरी भ्रमविषय पदार्थाहून अगदी वेगळी आहे त्याप्रमाणे शरीरादी दृश्य पदार्थाहून यांना पाहाणारा द्रष्टा जो जीवात्मा त्या पदार्थापेक्षा अत्यंत विलक्षण आहे. म्हणजे देहादी दृश्य पदार्थ 'इदं' या प्रत्ययाचे विषय आहे. अहं व इदं कधी एक होत नसतात. या अहं पदार्थाला प्रत्यक् म्हणजे कल्पित देहादिकापेक्षा उलट्या तऱ्हेने म्हणजे अहं या आकाराने भासणारा 'प्रतीपं' उलट्या तऱ्हेने म्हणजे 'इदं'पेक्षा उलट्या तऱ्हेने म्हणजे 'अहं' या रूपाने अंचित म्हणजे भासणारा म्हणजे प्रत्यक् असा याचा अर्थ आहे. हा सच्चिदानंदरूपच आहे.

ादिकांचा साक्षी आहे. हे जीवात्म्याचे खरे रूप आहे. या शरीराद्युपाधियुक्त
ा जीवात्मा असे म्हणतात. यालाच शरीरादी उपाधींमुळे 'अवर' म्हणजे लहान
शी संज्ञा आली आहे. वास्तविक दोन्ही उपाधी जर काढल्या म्हणजे शरीराच्या
सर्व पदार्थ व शरीर व त्याच्या आतील इंद्रियादी पदार्थ जर टाकून दिले तर
न परमात्मरूप आत व बाहेर व्यापून राहाणारे एकच सच्चिदानंदतत्त्वच केवळ
ाहाते व '**तदेकोऽवशिष्टः शिवःकेवलोहं**' असे भगवत्पादांनी आपल्या
म्हटले आहे ते याच तत्त्वाला उद्देशून आहे. याला परावर ब्रह्म असे म्हणतात.
ज्ञ उपाधी भेदाने पर व अवररूपाने जगात प्रकट आहे. हे भगवती देवते! तू
हे व मी तू आहेस अशा श्रुतीच्या आधाराने मी ब्रह्म आहे ब्रह्म मी आहे
परांना परस्परांचे विशेषण लावून अखंड एकरसत्वाने या एकतत्त्वाचे चिंतन
ऊन या अखंड तत्त्वाचा साक्षात्कार म्हणजे प्रत्यक्ष ज्ञान झाले असता या
ामुळे साक्षात्कारी झालेल्या तुला अज्ञानामुळे देहादी दृश्य पदार्थाची अनंत
डलेली जी गांठ म्हणजे मगरमिठी ती तुटून जावो, तुझ्या चित्तात आजपर्यंत
मी ब्रह्म आहे की नाही, मी मुक्त आहे की नाही, मला पुनः जन्ममरणादी
काय इत्यादी सर्व संशय निवृत्त होवोत व जन्ममरणादीकाला कारण असलेल्या
ण्यरूप कर्मांचा क्षय होवो व उत्तम प्रकारचा परम पुरुषार्थ म्हणजे बंध मोक्ष
असा आशीर्वादरूप अनुग्रह आपण माझ्यावर करा अशी प्रार्थना संतचरणी
असता ते भगवद्रूप झालेले संत तुला तसे होवो असे त्रिवार म्हणाले ॥२०॥

## प्रार्थना एकवीसावी

इंकारात्मनोरेकत्वभ्रमनिवृत्तिरूपो ग्रंथिभेदो दृढीभूयादितिभवन्तोमहान्तोऽ
२१ ॥ तथास्तु तथास्तु तथास्तु ॥

र्थ : पूर्वील प्रार्थनेत '**भिद्यतेहृदयग्रन्थिः**' असे म्हटले होते. त्या हृदय-
ष्टीकरण या प्रार्थनेत करून ग्रंथींचा नाश दृढ होवो अशी प्रार्थना येथे केली
तःकरण ही जीवाची मुख्य उपाधी आहे. यालाच लिंग शरीर असे म्हणतात.
थूल शरीराची निवृत्ती म्हणजे अभिमान नाहीसा होतो व झोपेचे काम स्थूल
अभिमान नाहीसा करणे हेच आहे. स्थूल शरीराचा अभिमान नाहीसा
ाय स्वप्न पडू शकत नाही. स्वप्नात अन्तःकरणाचाच सर्व कारभार चालू
अन्तःकरण निराळ्या म्हणजे जागृतीत असलेल्या स्थूल शरीराहून वेगळ्या
ाला व जागृतीमधील सृष्टीहून वेगळ्या सृष्टीला निर्माण करते व या स्वाप्निक
ग होईपर्यंत सर्व व्यवहार जागृतीतील सृष्टीप्रमाणेच चाललेला असतो. या
ालाच संशयात्मक चित्तवृत्तीच्याद्वारा 'मन' असे नाव प्राप्त होते.
वृत्तीच्याद्वारा यालाच 'बुद्धी' असे म्हणतात व अहंकार म्हणजे अभिमान
ा वृत्तीने यालाच अहंकार असे नाव आहे. स्मरणात्मक चित्तवृत्तीमुळे या

अन्तःकरणाला चित्त असे नाव प्राप्त होते. अहंकार हा सर्व व्यवहारात मुख्य आहे व तोच जीवाचा मित्र व शत्रूही आहे. सात्त्विक अहंकार हा जीवाचा मित्र आहे व राजस आणि तामस अहंकार जीवाचा शत्रू आहे. शरीरादीकांचे ठिकाणी जो अहंकार तो अत्यंत घोर व तामस आहे. तो भ्रम, आलस्य, तंद्रा वगैरे चित्तात निर्माण करतो. जीवाने त्याचा परित्याग करावा व क्रोध, लोभ काम इत्यादिकाने येथे पाप निर्माण करणारा प्रयत्नशील अहंकार राजस आहे. तोही जीवाच्या बंधाला कारण असल्याने तामस व राजस अहंकार म्हणजेच शत्रुरूप अहंकार टाकून देऊन ज्ञानोत्पत्ती होईपर्यंत सात्त्विक अहंकाराचा आश्रय करून पुढे तीनीही अहंकाराचा व आत्म्याचा एकत्व-पणारूप जी भ्रांती तिची दृढ निवृत्ती म्हणजे ती पुनः न उत्पन्न न होणारी अशी जी निवृत्ती म्हणजेच दृढ ग्रंथिभेद तो होवो अशी आपल्या संतांच्या चरणाजवळ माझी प्रार्थना आहे. ती ऐकून अहंकार व आत्मा यांच्या एकत्वाच्या भ्रमाची दृढ निवृत्ती तुला होवो असे संत त्रिवार म्हणाले. अहंकारा व आत्मा यांच्या दृढ ग्रंथींचे निर्वचन परमपूज्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वती स्वामिमहाराजांनी आपल्या ४०६ नंबरच्या चित्त-सद्बोधनक्षत्रमालेत केले आहे. ते अधिक जिज्ञासू साधकाने पाहावे.' ॥ २१ ॥

## प्रार्थना बावीसावी

आत्मादेहव्यतिरिक्तो न वा[1], व्यतिरिक्तत्वेऽपि कर्तृत्वादिधर्मयोगी न वा[2], अकर्तृत्वेऽपि तस्य ब्रह्मणोऽभेदोऽस्ति न वा[3], अभेदेऽपि तज्ज्ञानं कर्मादिसहितं मुक्ति-साधनं केवलं वा[4], आत्मासाक्षी कर्ता वा[5], साक्षित्वेऽपि अस्यब्रह्मत्वमस्ति न वा[6], ब्रह्मत्वेऽपि तबुद्ध्या वेत्तुं शक्यते न वा[7], शक्यत्वेऽपि तद्वेदनमात्रेण मुक्तिरस्ति न वा[8], मम परमार्थतो ब्रह्मत्वमस्ति न वा[9], ब्रह्मत्वेऽपि मम तादृग्रूपं साक्षात्कृतं न वा[10], साक्षात्कृतत्वेऽपीतःपरं कर्तव्यमस्ति न वा[11], कर्तव्याभावेऽपीदानीं मम जीवन्मुक्तत्वमस्ति न वा[12], जीवन्मुक्तत्वेपि वर्तमानदेहपातानंतरं भाविनी विदेहमुक्तिर्भविष्यति न वा[13] तत्प्राप्तावपि कालान्तरेषु पुनर्जन्म भविष्यति न[14] वेत्यादि सर्व संशय निर्वृत्तिर्भूयादिति भवन्तो महान्तोऽनुगृह्णन्तु ॥ २२ ॥ तथास्तु तथास्तु तथास्तु ॥

**अर्थ :** 'भिद्यतेहृदयग्रन्थिः' या वाक्याचे निरूपण व हृदयग्रन्थिभेदाविषयी प्रार्थना एकवीसाव्या प्रार्थनेत झाली. आता 'छिद्यन्ते सर्व संशयाः' या वाक्याचे व्याख्यान व प्रार्थना बावीसाव्या प्रार्थनेत करावयाची आहे. हे संशय चौदा प्रकारचे आहेत. याचे दिग्दर्शन करून त्याच्या निवृत्तीबद्दल येथे प्रार्थना आहे. 'संशयात्मा-विनश्यति' असे भगवान् श्रीकृष्णपरमात्मा अर्जुनाला म्हणतात. 'अज्ञ' 'अश्रद्धावान्' व 'संशयात्मा' अशा तिघांचा विशेषतः नाश होतो. त्या तिघात संशयात्मा अगदीच निकृष्ट आहे. त्याला हा मनुष्य लोक नाही, परलोक नाही व सुखही नाही असे याचे दुर्भाग्य वर्णिले आहे. तरी चित्तातील सर्व संशय पुढील प्रमाणे आहेत. पहिला संशय देहत्रयापैकी कोणत्या तरी देहाला आत्मा समजणारांच्या मताने आत्मा स्थूल देह आहे.

सूक्ष्मदेह व कारणदेह याहून भिन्न आहे की नाही असा आहे. पाच कोश जीवात्म्याला आहेत. त्यात अन्नमय कोश म्हणजे स्थूल देह आहे. सूक्ष्म देह म्हणजे अंतःकरण. त्यात प्राणमय, मनोमय व विज्ञानमय असे तीन कोश अन्तर्भूत होतात. व कारणदेह म्हणजे अज्ञान. ज्याचा अनुभव झोपेमध्ये पूर्णपणे जीवाला असतो. त्यात सुखाकार किंवा आनंदाकार अज्ञानवृत्ती असते. याला आनंदमय कोश असे म्हणतात. तीन देहांचा निरास म्हणजेच पंचकोशांचा निरास असे समजावे. समाधी अवस्थेत देहत्रयाचा किंवा पंचकोशांचा निरास असतो. संतांच्या वाङ्मयात देहचतुष्टयाच्या निरासाचे वर्णन आहे. 'अहंब्रह्मास्मि' या वृत्तीला चौथा देह म्हणावा अशी त्यांची व्याख्या आहे. आत्मा, ज्ञान व अज्ञान या दोन्हीहून पलीकडे आहे. 'जाणीव' व नेणीव असे दोन्ही जेथे नाहीत ते ब्रह्मस्वरूप असे त्यांचे म्हणणे असल्याने 'अहंब्रह्मास्मि' या तत्त्वज्ञानवृत्तिरूप चौथ्या देहाचाही निरास ब्रह्मस्वरूपात झाला पाहिजे. म्हणून संत 'देहचतुष्टय निरास' असे म्हणतात. हा एक अवांतर भेद आहे. प्रकृत प्रार्थनेत आत्मा किंवा ब्रह्म देहत्रयाहून अतिरिक्त आहे की नाही असा संशय गृहीत धरला आहे. ब्रह्माकार वृत्ती ही अंतःकरणाचा धर्म असल्याने तीन देहांच्या निरासाने ब्रह्माकार वृत्तीरूप चतुर्थ देहाचाही निरास झाला असे समजून येथे आत्मा देहत्रयाहून अतिरिक्त आहे की नाही असा संशय घेतला आहे. देहत्रय हे दृश्यकोटीत येत असल्याने व आत्मा स्वयंप्रकाशचैतन्यरूपसच्चिदानंदघन असल्याने तो देहत्रयातिरिक्त आहे. कारण द्रष्टा व दृश्य हे अत्यंत विलक्षण असल्याने अंधार व उजेड ज्याप्रमाणे एक होऊ शकत नाहीत त्याप्रमाणे अंधाररूपदेहत्रय व प्रकाशरूप आत्मा यांचे ऐक्य घडत नाही. याकरिता तो देहत्रयाहून अतिरिक्त आहे असा सिद्धान्त झाला. यामुळे सर्व संशयाला मूलभूत असणारा संशय देहत्रयातिरिक्त आत्मा आहे या निर्णयाने दूर झाला.

दुसरा संशय आत्मा देहत्रय किंवा पंचकोश याहून जरी वेगळा असला तरी तो आत्मा कर्ता व भोक्ता म्हणजे कर्तृत्व व भोक्तृत्वादी धर्मांने युक्त आहे की नाही असा आहे. कणाद व गौतम हे दोन शास्त्रकार म्हणजे वैशेषिक व नैयायिक हे आत्मा स्थूल शरीर, मनप्राण व इंद्रिये याहून अत्यंत भिन्न आहे असे मानतात. ज्ञान हा आत्म्याचा धर्म आहे. आत्मा ज्ञानस्वरूपही नाही. म्हणजे तो ज्ञानाहून भिन्न आहे. ज्ञान म्हणजे चेतन व ज्ञानाहून भिन्न म्हणजे 'जड' असे मानणाऱ्या सांख्ययोग व वेदान्ती यांच्या मताने नैयायिक वैशेषिक यांचा आत्मा 'जड' ठरतो. ज्ञानवान् म्हणजे चेतन अशी व्याख्या न्याय वैशेषिकांची असल्याने त्यांच्या मतात तो ज्ञानभिन्न असूनही चेतन आहे. झोपेत किंवा मूर्च्छा वगैरे अवस्थेत आत्म्याला ज्ञान नसल्याने त्या वेळी तो जड असला तरी जागृतीत त्याला ज्ञान असल्याने त्याला चेतन म्हणण्यास हरकत नाही. केव्हातरी ज्याला ज्ञान होते तो चेतन सर्वदा त्याला ज्ञान असावे असा काही नियम नाही. सर्वदा ज्ञान असणारा एक ईश्वरच आहे.

तो त्यांच्या मते सर्वदाच चेतन आहे. परंतु असला ईश्वर वेदान्ताच्या मताने जडच म्हटला पाहिजे. त्यांचे लक्षण ज्ञानास्वरूप म्हणजे चेतन असे आहे. झोपेत ज्ञानाचा अभाव न्यायवैशेषिक मानतात. या ज्ञानाच्या अभावालाच ते अज्ञान म्हणत असल्याने यांच्या मतात कारण शरीर नाहीच. घटपटादी अनात्म पदार्थाला कधीच ज्ञान होत नसल्याने ते आत्म्याहून भिन्न म्हणजे अनात्मे आहेत. आत्मा जसा ज्ञानवान् आहे तसा तो इच्छावान व कृतीमानही आहे. त्याला सुखदुःखेही होतात व त्यांचा अनुभवही त्याला आहे. या सर्व विचारावरून आत्मा कर्तृत्व, भोक्तृत्व इत्यादी धर्मयुक्त आहे असे यांचे मत आहे. धर्म व धर्मी यांचा समवाय संबंध न्यायवैशेषिक मानतात. भेदसमानाधिकरण, अभेदरूपतादात्म्यसंबंध धर्म व धर्मीयांचा नसल्याने धर्म नष्ट झाले तरी धर्मी निर्विकारच असतो. त्यामुळे आत्म्याच्या नित्यत्वाला व निर्विकारत्वाला काही बाध येत नाही असे हे म्हणतात. म्हणून आत्मा कर्तृत्वभोक्तृत्वादी धर्मयुक्त आहे असे न्यायवैशेषिकांचे मत झाले. वेदान्ती श्रुतिसंमत तर्कच खरा आहे असे मानत असल्याने व श्रुतीने '**सत्यंज्ञानमनन्तम्**' असे आत्म्याचे व आत्म्याहून अभिन्न असलेल्या ब्रह्माचे लक्षण केले असल्याने आत्मा किंवा ब्रह्म ज्ञानरूप आहे, ज्ञानवान् नव्हे. न्यायवैशेषिकांनी कर्तृत्व भोक्तृत्ववान् जो तो आत्मा असे मानले आहे त्याला वेदांती अंतःकरण असे म्हणतात. म्हणजे न्यायवैशेषिकांचा कर्ताभोक्ता आत्मा म्हणजे वेदान्ताच्या मते तो आत्मा नसून ते अन्तःकरणच आहे व अन्तःकरण हे लिंगशरीर असल्याने त्याहून अत्यंत विलक्षण आत्मा आहे व तो कर्ताही नाही व भोक्ताही नाहीं. अन्तःकरणाचे कर्तृत्व भोक्तृत्व त्याच्यावर अविद्येमुळे आरोपित आहे. म्हणून आत्मा अकर्ता व अभोक्ता असा असल्याने आत्मा कर्ता भोक्ता नाही हे सिद्ध झाले. म्हणून 'अकर्तृत्वेऽपि' हा तिसरा संशय उत्थित होत आहे.

सांख्य व योग यांच्यामते प्रकृतीचे धर्म कर्तृत्वादी आहेत. परंतु प्रकृती व पुरुष यांचा वेगळेपणा असूनही तो न कळल्याने प्रकृतीचे कर्तृत्व व भोक्तृत्व स्वप्रकाश ज्ञान स्वरूप उदासीन आत्म्यावर आरोपित होते. वस्तुतः तो कर्तृत्वभोक्तृत्वादिरहित आहे. न्यायवैशेषिक मताप्रमाणे तो वास्तविक कर्ताभोक्ता असा नाही. सांख्ययोगमतात स्वप्रकाश ज्ञानस्वरूप असा आत्मा असला तरी तो न्यायवैशेषिकमताप्रमाणे प्रत्येक देहात वेगवेगळा व सर्वव्यापक असा आहे व हा आत्म्यांचा भेद औपाधिक नसून वास्तविक आहे. वेदान्त्याच्या मतात आकाश एक असले तरी घटमठादिभेदाने आकाशाचा औपाधिक भेद होतो. परंतु वास्तविक भेद आकाशात नसल्याने एकच आकाश आहे. तसे सांख्ययोग मतात नाही. वस्तुतःच आत्मे परस्पर भिन्न आहेत. कपिल सांख्य ईश्वर म्हणून एक सर्वज्ञ सर्वशक्ती आत्मा जीवात्म्याहून वेगळा असे मानत नाहीत. योगी तसा ईश्वर मानतात परंतु तो ईश्वर जीवाहून अत्यंत भिन्न आहे. जीव व ईश्वर यांचा औपाधिकभेद नसून वास्तविकच भेद आहे. त्याच्याशी जीवाचे ऐक्य असणे संभवनीय नाही. सांख्ययोगमतात ब्रह्म नावाचे अद्वितीय परमतत्त्व नाही. म्हणजे जे तत्त्व निकृष्ट उपाधित प्रविष्ट

होऊन ईश्वर संज्ञेला प्राप्त होईल ते त्यांना मान्य नाही. सांख्ययोग मताने अद्वितीय ब्रह्माशी जीवांचा अभेद वास्तविक संभवनीयच नाही. कारण असे अद्वितीय ब्रह्मतत्त्वच त्यांना त्यांनी मानले नाही. त्यांच्या मतांपैकी योग्यांनी एक ईश्वर मानला परंतु ते जगत् व जीवात्मे वस्तुतः ईश्वराहून भिन्न असून सत्य आहेत. त्यामुळे अद्वितीय ब्रह्माशी त्यांचा अभेद संभवत नाही. 'तत्त्वमसि' 'नेहनानास्तिकिंचन' इत्यादी वेदान्त वाक्यावरून उपाधीमुळे भिन्न झालेल्या म्हणजे जीवभाव प्राप्त झालेल्या चेतनाशी ब्रह्माचा अत्यंत अभेद आहे, असे श्रुतीने व युक्तीनेही सिद्ध असल्याने सांख्य व योगी यांचे म्हणणे योग्य नाही. अर्थात् जीव व ब्रह्म यांचा वास्तविक अभेदच आहे हा सिद्धांत सिद्ध झाला. आता जीव व ब्रह्म यांच्या ऐक्याबद्दल शंका नाही.

जीव व ब्रह्म यांच्यात अत्यंत अभेद आहे असे निश्चित झाले. जीवब्रह्माचा अभेदाच्या किंवा ऐक्याच्या ज्ञानाने अज्ञान नष्ट होऊन जीव मुक्त होतो. असा ऐक्य-साक्षात्काराचा प्रभाव आहे. आकाशात उडणाऱ्या पक्ष्यांना उडण्याकरिता जशी दोन्ही पंखांची गरज आहे, तसेच मुक्तीला कर्म व ज्ञान या दोहोंची गरज आहे. केवळ कर्माने किंवा केवळ ज्ञानाने मुक्ती होत नाही. म्हणून कर्मसहित जीवब्रह्मात्मैक्यज्ञान मुक्तिसाधन आहे असे काही लोकांचे मत आहे. हे मत बरोबर आहे की, केवळ ज्ञानाने मुक्ती होते असा हा संशय आहे. कर्माधिकारी व ज्ञानाधिकारी भिन्नभिन्न असल्याने एकावेळी कर्म व ब्रह्मात्मैक्यज्ञान हे संभवत नाही म्हणून युगपत् म्हणजे एकावेळी ज्ञान व कर्म यांचा समुच्चय होऊ शकत नाही. प्रथम कर्म करून चित्त शुद्धी होते व मग तत्त्वज्ञान होते. असा क्रमाने समुच्चय वेदान्त्यांना इष्ट आहे. असे या संशयाबद्दल उत्तर आहे. आत्मा साक्षी आहे की कर्ता आहे अशा संशयाचे उत्तर आत्मासाक्षीच आहे, कर्ता नाही हे या पूर्वीच्या प्रार्थनेत आले आहे. आत्मा साक्षी असून सुद्धा ब्रह्माहून भिन्न आहे अशा मताचा निरास ब्रह्माहून आत्मा अत्यंताभिन्न आहे या सिद्धांताच्या निरूपणाने झाला आहे. आत्मा ब्रह्म असला तरी तो ब्रह्मभाव बुद्धीला कळू शकतो की नाही, हा संशय आहे व साधनानुष्ठाने तो कळू शकतो असे याचे उत्तर आहे. आत्म्याला आपला ब्रह्म-भाव कळल्याबरोबर मुक्ती होते की नाही, असा संशय आहे. 'ज्ञानदेवतुकैवल्यम्' या सिद्धांताने आपला ब्रह्मभाव कळल्याबरोबर मुक्ती होते. ब्रह्मभाव कळणे हेच मुक्तीचे साधन आहे. मी खरोखर आहे किंवा ज्ञानामुळे मला ब्रह्मभाव येतो असा संशय आहे. मुळातच जीव ब्रह्मरूप आहे. अज्ञानामुळे मी ब्रह्म नाही असे तो समजत असतो. ज्ञानाने ब्रह्मभाव उत्पन्न होत नसून तो पहिल्यापासूनच आहे. मी ब्रह्म नाही अशी अज्ञानाने झालेली समजूत भ्रमात्मक आहे. ती ज्ञानाने दूर होते. ब्रह्मज्ञान जीवाचे मूळचे रूप आहे. मी जरी वास्तविक ब्रह्मरूप असलो तरी ते रूप मी प्रत्यक्ष पाहिले की नाही असा संशय आहे. याचे उत्तर श्रवण, मनन व निदिध्यासनाने प्रमाणासंभावना, प्रमेयासंभावना व विपरीत भावना नष्ट झाल्यावर त्या स्वरूपाचा म्हणजे ब्रह्मात्मैक्याचा साक्षात्कार होतोच असे आहे. ब्रह्म साक्षात्कार झाल्यानंतर

जीवाचे काही कर्तव्य शिल्लक राहाते की नाही हा संशय साक्षात्कारानंतर त्याचे कर्तव्य काहीच शिल्लक राहात नाही, हे उत्तर. कर्तव्य काही शिल्लक नसले तरी मी जीवन्मुक्त आहे की नाही हा संशय आहे. जोपर्यंत प्रारब्ध कर्म आहे तोपर्यंत जीवन्मुक्त स्थितीत राहिले पाहिजे. ते टाळता येत नाही, हे उत्तर. जीवन्मुक्तस्थितीत देह विद्यमान असणार व त्याच्याकडून कर्मे घडणार म्हणून त्या कर्मांने पुनः देह प्राप्ती होणार काय ? व तसे झाल्यास विदेह मुक्ती कशी संभवते हा संशय आहे. ज्ञान झाल्यानंतरची घडणारी बरी वाईट कर्मे दग्धबीजाप्रमाणे असल्याने : दग्धबीजापासून जसा अंकुर उत्पन्न होत नाही तसा ज्ञानोत्तर कर्मापासून देहरूप अंकुरही होत नाही. म्हणून त्याला विदेहमुक्ती अवश्य होणार, हे त्याचे उत्तर आहे. ती विदेहमुक्ती प्राप्त झाल्यानंतर कालांतरात काही कारणामुळे तत्त्वज्ञान्याला पुन्हा देह ग्रहणरूप पुनर्जन्म आहे का ? असा संशय आहे. याचे उत्तर काम, कर्म व अविद्या इत्यादीक देहाची बीजे आहेत. तत्त्वज्ञानाने ती सर्व दग्ध झाली असल्याने व दग्धबीजापासून देहरूप अंकुर कधीच संभवत नसल्याने एकदा जीव ब्रह्मैक्य साक्षात्कार झाल्याबरोबर केव्हाही व कोठेही त्याचा पुनर्जन्म होऊ शकत नाही. त्यांनी अगदी निःसंशय व निश्चित असावे असे आहे. अर्थात वेदान्त शास्त्रात सर्व संशयांचा निरास केला आहे. तरी त्याप्रमाणे माझे आता सांगितलेले व आणखीही काही चुकून राहिलेले जे सर्व संशय आहेत यांची निवृत्ती आपल्या दिव्य चरणकमलांच्या प्रभावाने व्हावी अशी माझी आपल्या संतांच्या चरणाजवळ प्रार्थना आहे. तरी माझे सर्व संशय निवृत्त व्हावे. हे कळवळ्याचे वचन ऐकून तुझ्या सर्व संशयाची समूळ निवृत्ती होवो असे संत त्रिवार तथास्तु अशा आशीर्वचनाने म्हणाले. ॥ २२ ॥

■ ■ ■

# चैतन्य चक्रवर्ती

( प. प. श्रीलोकनाथतीर्थ स्वामीमहाराज चरित्र )

लेखक — **श्री. अच्युत सिद्धनाथ पोटभरे, एम्. ए.**

## — प्रसाद चिन्हानी पुरःफलानि —

होशंगाबादेच्या निवासस्थानात श्रीगुरुमहाराज खाली सतरंजीवर बसलेले आहेत. स्वामीजी नेहमीप्रमाणे पलंगावर बसलेले आहेत. ते एकदम उभे राहिले. त्यांनी खांद्यावरची छाटी एका फटकाऱ्यात सारखी केली आणि ते गुरुमहाराजांच्या रोखाने हळूहळू येऊ लागले. आज स्वामी आपल्याकडे असे का येत आहेत हे त्यांच्या लक्षात आले नाही. पण आज स्वामींची दृष्टी आणि मुद्रा अतीव प्रसन्न व अत्यंत तेजस्वी दिसत होती. मुखावरील ओज झळकत होते. भस्मांकित भालप्रदेशाची भव्यता आणि भगव्या वस्त्रांची अग्नितुल्य कान्ती आसमंतात स्वर्गीय दिव्यत्व निर्माण करीत होती. ह

प्रमाणे, श्मश्रू केलेले, भगवी वस्त्रे परिधान केलेले, दण्डधारण केलेले, पायी खडावा घातलेले मूर्तिमंत पावित्र्य असलेले गोस्वामी माझ्याकडे येत अत्यंत स्नेहाळ दृष्टीने आपल्या प्रफुल्ल नजरेने माझ्याकडे टक लावून पाहात आहेत. मी त्यांच्याजवळ जाताच ते पारिजातकाचे फूल मला दाखवीत म्हणाले – " बघ किती सुंदर आहे हे ! जणू गवतावर पसरलेला पांढरा गालिचा !

आजपर्यंत मी गोस्वामींच्या चरणकमलावर मस्तक ठेवून कधीही नमस्कार केलेला नव्हता. ( आजपर्यंत मी फक्त हात जोडून आणि मान हालवून त्यांचा केवळ आदर करीत आलो. ) या कृत्याला मी अत्यंत घोर वाईट संस्कार आणि मर्यादेचे दारुण उल्लंघन समजत आलो आहे. परंतु आज काय झाले ते कळलेही नाही. नमस्काराच्या त्या सवयीची आठवणही झाली नाही. आज मी त्यांच्याजवळ अक्षरश: रडत रडत गेलो आणि त्यांचे दोन्ही चरण हातांनी घट्ट पकडून मस्तक त्यावर ठेवून मी तेथेच पडून राहिलो. त्यावेळी मी त्यांना म्हटले, " आपण माझ्यावर दया करावी. "

गोस्मामीजी म्हणाले, " फार पूर्वीच यायला हवे होते. आता वेळ निघून गेली आहे. आता वाट पाहात राहा. "

(क्रमश: )

## श्रीमद्विद्यारण्यस्वामीविरचितसार्थ सद्गुरु-प्रार्थना

लेखक – श्री. वामन आत्माराम जेरे, वाई.

### प्रार्थना २३

**अनारब्धानामागामि जन्महेतूनामनेककोटीजन्मार्जितानां प्रारब्धातिरिक्तानां संचितकर्मणां निवृत्तिरूप: परमपुरुषार्थः सम्यग्भूयादिति भवंतो महान्तोऽनुगृण्हन्तु ॥ तथास्तु० ॥२३॥**

अर्थ – मागील तीन प्रार्थनांचे व्याख्यान करतेवेळी " **भिद्यतेहृदयग्रन्थिच्छिद्यन्ते सर्वसंशयाः । क्षीयन्ते चास्यकर्माणि तस्मिन् दृष्टे परावरे ॥** " या उपनिषद् वचनावरून हृदयग्रथीभेद व सर्व संशय निवृत्ती झाल्यानंतर २३ व्या प्रार्थनेत परम पुरुषार्थाचा लाभ होण्याबद्दल प्रार्थना केली आहे. शास्त्रामध्ये कर्माचा विचार करतेवेळी प्रारब्ध, संचित व क्रियमाण अशा कर्मांचे वर्णन केले आहे. मनुष्य किंवा सर्व प्राणी आपापल्या केलेल्या कर्मांची फळ भोगीत असतात. जीवाची प्रत्येक स्थिती त्याच्या कर्मानेच प्राप्त होत असते. श्रीमद् भागवतामध्ये भगवंताने नंदादी गोपांना असे सांगितले आहे की, " **कर्मणा जायते जन्तुः कर्मणैव विलीयते । सुखं दुःखं भयं क्षेमं कर्मणैवाभिपद्यते** " ( द. स्कं. पूर्वार्ध अ० २४ ) मनुष्य चांगली किंवा वाईट अशी जी कर्मे करतो ती कर्मे करतेवेळी त्या कर्मांना क्रियमाण अशी संज्ञा आहे. केलेल्या कर्माचे चांगले किंवा वाईट फळ पुढील जन्मामध्ये भोगण्या-

साठी जे शिल्लक राहाते त्यास संचित असे म्हटले आहे व मागील जन्मामध्ये केलेले कर्म चालू जन्मामध्ये त्याचे प्रत्यक्ष भोगत असलेले जे बरे वाईट फळ आहे त्यास प्रारब्ध असे म्हटले आहे. " **प्रारब्ध कर्मणां भोगादेव क्षय:** । अशा वचनावरून प्रारब्ध कर्म हे भोगूनच संपते. परंतु क्रियमाण व संचित अशा अनादी कालापासून केलेल्या अनेक जन्मांना कारणीभूत असलेल्या कर्मांचे फळ सद्गुरुकृपेने सर्वात्मभाव प्राप्त झालेल्या म्हणजेच चतुर्विध पुरुषार्थापैकी चवथा परमपुरुषार्थ प्राप्त झालेल्या मानवाला भोगावे लागत नाही. **यथैधांसि समिद्धोग्निर्भस्मसात्कुरुतेर्जुन । ज्ञानाग्नि: सर्वकर्माणि भस्मसात्कुरुतेर्जुन** ।। " या श्लोकाचे व्याख्यान न करता " प्रारब्ध फल भिन्नानि " अशी व्याख्या केली आहे. " **अनारब्ध कार्ये एव तु पूर्वे तदवधे:** ।। परमपुरुषार्थाने प्रारब्धेतर सर्वकर्मांची निवृत्ती या सूत्रात सांगितली. मात्र अशा ब्रह्मनिष्ठाला त्याचे प्रारब्ध फल हे भोगावे लागते. म्हणूनच परमपुरुषार्थ लाभ झाला तरी ब्रह्मनिष्ठ जेवढे प्रारब्ध भोगणे असेल तेवढे भोगूनच " जैशी स्थिती आहे तैशापरी राहे " अशा अवस्थेमध्ये तो असतो. म्हणून परमपुरुषार्थाला " प्रारब्धातिरिक्तानां संचित कर्मणां निवृत्तिरूप । " प्रारब्धाशिवाय संचित कर्मांची निवृत्ती नाश ज्यामध्ये आहे अशा परमपुरुषार्थाची प्राप्ती सम्यक् म्हणजे संशय विपर्यय रहित व्हावी अशी प्रार्थना केली आहे. भगवद्गीतेमध्ये फळाची इच्छा न करता केलेली कर्मे बंधनकारक होत नाहीत इत्यादी विचार केला आहे. परंतु तो विचार विस्तार भयात् या ठिकाणी करणे अशक्य आहे. " न मां कर्माणि लिम्पन्ति न मे कर्मफले स्पृहा । इति मां योऽभि जानाति कर्मभिर्न स बध्यते ।। " अशा वचनाने परमपुरुषार्थ प्राप्त झालेला कर्म निवृत्त असतो. " आप्तकामस्य का स्पृहा " या वचनानेही हेच तत्त्व प्रतिपादन केले आहे. " यस्त्वात्मरतिरेव स्यादात्मतृप्तश्च मानव: । आत्मन्येव च संतुष्टस्तस्य कार्यं न विद्यते ।। " अशा श्लोकाने सुद्धा सर्वकर्मनिवृत्तिरूप परमपुरुषार्थाचे वर्णन केले आहे. अशा प्रकारचा अनारब्ध आरंभ न केलेल्या व पुढील जन्माला कारणीभूत असलेल्या प्रारब्धातिरिक्त सर्व कर्मांची निवृत्ती ज्यामध्ये होते असा परमपुरुषार्थ लाभ व्हावा असा सर्व महात्म्यांनी आशीर्वाद द्यावा. ।। २३ ।।

## प्रार्थना २४

**य: पूर्णानंदैकबोधस्तद्ब्रह्माहमस्मीति ब्रह्मात्मानुभवमात्र पर्यवसाने बुद्धिर्निरंतरं भूयादिति भवंतो महांतोनुगृण्हन्तु तथास्तु ० ।। २४ ।।**

अर्थ – तैत्तरीय उपनिषदात ब्रह्मवल्ली प्रकरणामध्ये अन्न ब्रह्मापासून उत्तरोत्तर प्राण, विज्ञान असे अधिकारी श्रेष्ठत्वाने वर्णन करीत आत्म्याचे आनंद स्वरूप आहे असे वर्णन पंचम अनुवाकामध्ये " आनंद आत्मा " अशा मंत्राने केले आहे. " अयमात्मा ब्रह्म " अशा उपनिषद् वाक्याने आनंद स्वरूप आत्मा म्हणजेच

सच्चिदानंदस्वरूप ब्रह्म आहे. हा जो आनंदस्वरूप आत्मा आहे तो पूर्णानंदस्वरूप आहे. असा जो पूर्णानंदस्वरूप आत्मा म्हणजेच ब्रह्म ते मीच आहे. म्हणजेच माझे वास्तविक स्वरूप पूर्णाआनंदस्वरूपच आहे. जीवाला अज्ञानामुळे जो विषयापासून मिळणारा आनंद वाटतो तो सापेक्ष असल्यामुळे अपूर्ण आनंद आहे. ब्रह्मानंदाच्या एका मात्रेने अतिसूक्ष्म अंशाने अज्ञानी जीव आनंदी आहे असे समजत असतो. परंतु तो आनंद अपूर्ण आहे असेही तैत्तरीयामध्ये वर्णन केले आहे. वास्तविक पाहता आत्मा हा आनंदस्वरूप असून उपाधी घेऊन तो आनंद शोधत असतो व ज्या ज्या वेळेस रूपरसगंध स्पर्शात्मक विषय इंद्रियांना प्राप्त होतात त्यावेळी तो जीव मला आनंद प्राप्त झाला असे म्हणत असतो व ते विषय नाहीसे झाले म्हणजे आनंद नष्ट झाला असे तो जीव समजत असतो. आनंद हा येणाराही नाही व जाणाराही नाही. सदा सर्वदा नित्यच आहे. स्वभावतः सर्वच आनंद निसर्ग सुंदर म्हणूनच तो स्वात्मरूप आणि अतिशय प्रियतम असाच आहे. प्रत्येकाला स्वात्मा हा अतिशय प्रिय आहे. याचे कारण सुद्धा तो अनुकूल वेदनीय सुख ( आनंद ) स्वरूप आहे हेच आहे. " आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति। " म्हणजे जगातील सर्व प्रिय वस्तु आपल्या आनंदाला अनुकूल होतात म्हणूनच आपल्याला त्या आवडतात. परंतु आपण आपल्या स्वतःला जे आवडतो ते मात्र आपण म्हणून, म्हणजे आनंदस्वरूप म्हणून, अत्यंत दुःखकाळी किंवा संकटकाळी, आत्महत्या म्हणजे अत्यंत प्रिय मानलेल्या शरीराचा त्याग करण्यास उत्सुक झालेल्या माणसास तरी दुःखदायक शरीर त्यागाने आपला निर्भेळ आनंद आपणास मिळेल अशीच कल्पना असते व ती तत्त्वतः योग्यच आहे. परंतु केवळ आत्महत्या केल्याने असा निर्भेळ आनंद मिळेल ही त्याची कल्पना चुकीची असल्याने शास्त्र व लोकदृष्ट्या आत्महत्या करणारा निंद्य व पापी समजला जातो एवढेच.

जागृतीत, स्वप्नात, निद्रेत किंवा सविकल्प वा निर्विकल्प समाधीत एकापेक्षा एक अधिक असे आनंद जीवाला अनुभवाला येतात ते सारे आनंद अभ्युदय कोटीतच गणले जातात कारण त्या त्या अवस्थेचा नाश झाल्याबरोबर ते ते आनंदही नाहीसे होतात. मनुष्यानंदापासून तो हिरण्यगर्भानंदापर्यंतच्या आनंद मीमांसेत ज्या आनंदाचे वर्णन आले आहे ते सर्व आनंद शरीरेंद्रियादी उपाधीसापेक्ष तारतम्ययुक्त व विनश्वर असेच आहेत. आरशात पडलेल्या सूर्याच्या प्रतिबिंबाप्रमाणे हा अनेक उपाधीत प्रकट झालेला सोपाधिक आनंद स्वरूपानंदाचा आभास आहे. आकाशातील सूर्याप्रमाणे मूळस्वरूपानंद (सत्) म्हणजे त्रिकालाबाधित व चित् म्हणजे स्वयंप्रकाशमान ज्ञानमय आहे. म्हणूनच आत्म्याचे (सच्चिदानन्द) असे लक्षण श्रुत्यादी प्रमाणांनी सांगितले आहे. हा स्वरूपानंद नित्य, निरंतर, सर्वोत्तम व साधन निरपेक्ष सहजसिद्ध निजस्वरूप असा आहे. प्रत्येक प्राणिमात्राचा आत्मा म्हणजे आनंद-

स्वरूप आहे. परंतु अनादिकालापासून चालत आलेल्या या अबोधाच्या साम्राज्यात तो स्वतःचा आनन्दच स्वतःला पारखा झाला आहे व औपाधिक आनन्दासच आनन्द म्हणण्याची वहिवाट पडली आहे. सूर्यकांत मण्यातून लाकडावर पडलेल्या सूर्यकिरणांना अग्नी अशी संज्ञा व्यवहारात रूढ झाली व त्याचे स्तोम सर्वत्र माजले. बिचाऱ्या सूर्यास अग्नी म्हणावयास कोणी तयार नाही. उलट विरोधच आहे. परंतु तत्त्वतः सूर्यच अग्नीचे मूळ स्वरूप आहे व ते निरपेक्ष नित्य असे अग्नीचे स्वरूप आहे इकडे कोणाचेही लक्ष नाही. हा अबोध साम्राज्यातील सर्व प्रकार होय. अशा प्रकारचा अबोध जाऊन पूर्णानन्द स्वरूप मी ब्रह्म आहे असा बोध होऊन त्याचा अनुभव सतत व्हावा असा निश्चय राहावा हा आशीर्वाद पूर्णानन्द अनुभवणाऱ्या महात्म्यांनी द्यावा हीच त्यांचे चरणी प्रार्थना २४ व्या प्रार्थनेत केली आहे. ॥ २४ ॥

# श्रीमद् विद्यारण्यस्वामी विरचित सार्थ सद्गुरु-प्रार्थना

लेखक – श्री. वामन आतमाराम जेरे, वाई

## प्रार्थना २५ वी

" यस्मिन्काले द्वैतभानं नास्ति निद्रापि नागच्छति तस्मिन्काले उपलभ्यमानं यत्सुखमस्ति स ब्रह्मानन्द इति ब्रह्मानुभवसिद्धिर्निरन्तरं भूयादिति भवन्तो महान्तो नुगृण्हन्तु " ॥ तथास्तु० ॥ २५ ॥

विवरण — चोवीसाव्या प्रार्थनेमध्ये ब्रह्म निरतिशय आनंदस्वरूप आहे या बद्दल निरूपण आहे. ह्या प्रार्थनेमध्ये सुखस्वरूप ब्रह्म आहे याबद्दल वर्णन केले आहे. ज्याप्रमाणे आनंद सातिशय व निरतिशय असतो त्याप्रमाणे सुख सुद्धा सातिशय व निरतिशय असे आहे. त्रिकालाबाधित जे सुख ते निरतिशय सुख व विषयांपासून मिळणारे सुख ते सापेक्ष सुख होय असे शास्त्रकारांनी वर्णन केले आहे. जोपर्यंत अज्ञान निवृत्ती झाली नसते त्यावेळी जे काही ज्ञात होते त्यास " द्वैतभान " जाणणारा, जाणणे व जाणण्यास योग्य असा पदार्थ अशा त्रिपुटीसह ज्ञान होत असते. त्यास द्वैतभान असे म्हणता येईल. अशा द्वैतभानाचे वेळी म्हणजे अपरोक्षानुभव होण्यापूर्वी विषयेंद्रिय संयोगापासून झालेले जे सुख ते व्यावहारिक सुख अर्थात् ते नश्वर सुख असे म्हटले आहे. यापेक्षा विलक्षण जे सुख असते त्यात द्वैतभान नसते. ज्ञाता, ज्ञान, ज्ञेय अशी त्रिपुटी रहित जी अवस्था ती द्वैतभानरहित सुखावस्था ब्रह्मस्वरूप स्थिती होय अशा आशयानेच " यस्मिन् काले "–सदगुरुप्रसादाने प्राप्त झालेल्या अद्वैत अवस्थेच्या काळात जे सुख असते ते सुख म्हणजेच सच्चिदानंदघन ब्रह्म होय. छांदोग्य उपनिषदामध्ये ( अध्याय ४ खंड १० मंत्र ५ ) " यद्वाव कं तदेव खं यदेव खं तदेव कम् " असा मंत्र आहे. उपकोसलास तीन अग्नींनी जे क म्हणजे सुख तेच ख म्हणजे ब्रह्म व जे ख म्हणजे ब्रह्म तेच क म्हणजे सुख असे प्रतिपादन केले आहे. त्या ठिकाणी ब्रह्म हे सुखस्वरूप आहे असेच सांगितले आहे. मनुष्याला " सुखं मे स्यात् दुःखं माऽभूत् " । सुख मला असावे दुःख असू नये असे जे वाटते ते सर्व सामान्य मानव द्वैतभानातूनच म्हणत असतो. द्वैताचे भानच नसते अशावेळी सुख हे अनुभवणे येवढीच अवस्था राहाते. त्यावेळी असावे नसावे इत्यादी कल्पनाच उरत नाही. म्हणून श्रीमद् विद्यारण्यांनी द्वैतभान नसते अशा वेळच्या सुखाचेच वर्णन केले आहे. श्रीमद् भगवत्पाद आचार्य आपल्या स्तोत्रामध्ये सुद्धा " एकांते सुखमास्यताम् " अशा वाक्याने एकांते म्हणजे सर्व द्वैत सोडून स्वात्मस्थिती अनुभवतेवेळी सुखाचा अनुभव घेत बसावे असेच सांगतात. श्रीमद्भगवद्गीतेमध्ये सुखाचे त्रैविध्य सांगतेवेळी अ. १८ श्लो. ३७, ३८, ३९ मध्ये " यत्तदग्रे विषमिव परिणामेऽमृतोपमम् । तत्सुखं सात्त्विकं प्रोक्तं आत्मबुद्धि प्रसादजम् ॥ "

ह्या श्लोकात आरंभी म्हणजे ज्ञान, वैराग्य, ध्यान व समाधी यांच्या आरंभाचे वेळी अती कष्टाने मनःसंयम करून सुखप्राप्ती होत असल्यामुळे ते विषप्रमाणे वाटते पण अभ्यास व अपरोक्षज्ञान प्राप्ती झाल्यानंतर ते सुख अमृतरूपच भासते. अनात्मबुद्धी जाऊन आत्मबुद्धीने निर्माण झालेले ते समाधी सुख म्हणजे सात्त्विक सुख होय व तेच नित्य सुख आहे. प्रत्येक मानव सुखाची अपेक्षा करीत असतो परंतु विषयेंद्रिय संयोगापासून मिळणाऱ्या सुखाच्या मागेच धावत असतो ते मिळविण्यासाठी दुःखाचे डोंगर ओलांडून कदाचित् थोडे सुख मिळाले तर तो सुखाभासच होय म्हणूनच "सुख पाहता जवापाडे दुःख पर्वता एवढे" असे तुकोबारायांनी म्हटले आहे विषयेंद्रियसंयोगापासून मिळणारे क्षणिक सुख परिणामी विषच आहे असेही गीतेमध्ये अ. १८ श्लो. ३८ मध्ये वर्णन केले आहे. हा सर्व आशय लक्षात घेऊन प्रार्थनेत द्वैतभान नसते अशा वेळच्या सुखाची इच्छा केली आहे. कदाचित कोणी अशी शंका करू शकेल की जागृतीमध्ये द्वैतभान असणे शक्य आहे. पण निद्रावस्थेत द्वैतभान नसते व सुखानुभूती होते. मग निद्राकालातील सुख असावे अशी इच्छा का करू नये ? पण अशा सुखाचा सुद्धा त्याग करणे "निद्रापि नागच्छति" झोप सुद्धा नसते अशा शब्दाने सुचविले आहे. निद्रा म्हणजे एक अज्ञान वृत्ती आहे असे योगसूत्रात वर्णन केले आहे. "वृत्तयः पंचतय्यः क्लिष्टाऽक्लिष्टाः" "प्रमाण विपर्यय विकल्प निद्रा स्मृतयः" अशी दोन सूत्रे प्रथम समाधी-पादामध्ये आहेत. यामध्ये निद्रा ही एक वृत्ती चित्ताचा परिणाम आहे व गीता अ. १८ श्लो. ३९ "यदग्रे चानुबंधेच सुखं मोहनमात्मनः। निद्रालस्य प्रमादोत्थं तत्तामसमुदाहृतम् ॥" या श्लोकामध्ये आरंभी व परिणामी मोह उत्पन्न करणारे निद्रा, आळस व मनोराज्यापासून उत्पन्न होणारे सुख असे वर्णन केले आहे. म्हणूनच श्रीविद्यारण्यांनी निद्रा नसते अशा वेळचे सुख इच्छिले आहे. निद्रावस्थेमध्ये आत्म-सुख असते पण ते अज्ञानाने झाकून गेल्याने त्या सुखाचा अनुभव त्यावेळी नसतो. निद्रा ही अभावालंबना म्हणजे विषयेंद्रिय संयोगजन्य ज्ञानाभाव वृत्ती आहे. पूर्वी मी झोपलो होतो व आता जागा झालो. एवढा काळ मी सुखाने झोपलो. काही दुसरे समजू शकलो नाही. असे जे ज्ञान होते ते इंद्रियांचा विषयांशी संबंध नसल्याने व दुःखाचे भान नसल्याने मी सुखाने झोपलो असे जीव म्हणत असतो. म्हणून अशी जी निद्रावृत्ती ती नसते अशा वेळी जे नित्य निरतिशय स्वात्मसुख म्हणजेच ब्रह्मानंद तो ब्रह्मरूप आनंद सदासर्वदा सद्‌गुरुकृपेने असावा हीच प्रार्थना आहे. त्याचप्रमाणे मनुष्य मनोव्यापार म्हणजे मनोराज्य करतो. त्यावेळी पण सुख वाटत असते. त्या सुद्धा सुखाचा त्याग करून शुद्ध सुख असावे अशी प्रार्थना श्रुती-प्रमाणे आहे.

## प्रार्थना २६

**मनोव्यापाराभावसमये यत्सुखं भासते तत्सुखमात्मरूपमित्यात्मनिश्चयः सम्यग्भूयादिति भवंतो महांतोनुगृण्हन्तु ॥ तथास्तु०॥ २६ ॥**

**विवरण** – मनोव्यापार समजण्यासाठी मन म्हणजे काय व त्याचे व्यापार काय असतात याचा थोडा विचार करणे प्राप्त आहे. शास्त्रकार म्हणतात की – अंतःकरणाचेच वृत्तिभेदाने मन, बद्धी, अहंकार व चित्त असे चार प्रकार आहेत. त्यांचे कार्य म्हणजे क्रमशः संशय, निश्चय, गर्व व स्मरण असे आहे. मन हे अणु-रूप असून अतिशय चंचल अशा प्रकारचे आहे. जीवाला अनेक जन्म-मरणाच्या फेऱ्यात फिरविण्यास हे मनच कारणीभूत आहे. मागे ११ व्या प्रार्थनेमध्ये मनो-नाशासंबंधी स्पष्टीकरण आले आहेच. येथे मनोव्यापाराचा व मनाचा विचार करावयाचा आहे. शास्त्रामध्ये ह्या मनास परमाणुरूप मानले आहे व विषयज्ञाना-मधील तो एक प्रमुख दुवा आहे असेही मानले आहे. जीवात्मा मनाशी एकरूप होतो. मन इंद्रियांशी व इंद्रिये अर्थांशी संलग्न होतात. त्यानंतर विषयाचे प्रत्यक्ष ज्ञान होते असे न्यायशास्त्रात वर्णन केले आहे. तेव्हा असे हे अणुरूप मन असून-सुद्धा परमार्थ मार्गात विषयाच्या गोडीने अतिशय अडथळे निर्माण करणारे आहे. परमात्म चिंतन किंवा भगवद्ध्यान अथवा सद्ग्रंथवाचनास बसल्यानंतर हे मनाजी-पंत चंचल स्वभावाने कोठल्या कोठे फिरवून आणतात व प्रत्यक्षात मात्र पोथीचे अध्यायाच्या अध्याय सरकत असतात. मन ठिकाणावर आल्यावर हे अध्याय वाचले किंवा नाही याचाच संशय येऊ लागतो. असा हा मनोव्यापार निरर्थक चालत असतो. हे सर्व विदितच आहे. म्हणून योगशास्त्रात प्रथम जर काही सांगितले असेल तर "चित्तवृत्ति निरोधः" म्हणजे अंतःकरणाचा हा जो व्यापार चालतो तोच नष्ट करून टाकणे असे सांगितले आहे. भगवद्गीतेमध्ये तर चंचल मनाचा निग्रह करणे म्हणजे वाऱ्याला आवरून धरण्याप्रमाणे अत्यंत कठीण आहे असे वर्णन केले आहे. मन आवरणे असे कठीण असूनसुद्धा मदोन्मत्त हत्ती अंकुशाने वश करावा त्याप्रमाणे अध्यात्मविद्याभ्यासाने किंवा वैराग्याने त्या मनास वृत्तिशून्य म्हणजेच व्यापार शून्य करता येते. अशा मनाला वृत्तिशून्य करण्याचा अभ्यास योगसूत्रात "तत्र स्थितौ यत्नोअभ्यासः ॥ म्हणजे शुद्ध चिदात्म्याचे ठिकाणी वृत्तिरहित निश्चल स्थितीसाठी प्रयत्न करणे म्हणजे अभ्यास. असा हा अभ्यास कंटाळा न करता पुष्कळ काळपर्यंत खंड न पडता आदराने व अतिशय श्रद्धायुक्त होऊन केला तर विषयसुखाच्या वासनेकडून डळमळीत होऊ शकत नाही असे योगसूत्रात वर्णन केले आहे. योगभाष्यामध्येही मन किंवा चित्तरूपी नदी पापाकडे व पुण्याकडे दोन्ही बाजूस वाहाणारी नदी आहे असे वर्णन केले आहे. त्यातील विचारपूर्वक कैवल्याकडे चिंतन करणारी ती कल्याणकारी व जी विषयचिंतन द्वारा संसाराकडे

वाहाणारी असते ती पापास कारणीभूत असते. म्हणून श्रीविद्यारण्यांनी मनोव्यापार शून्य अवस्थेवेळी जे सुख भासते तेच आत्मरूप होय व असा आत्मनिश्चय चांगल्या प्रकारे व्हावा अशी सर्व संतांनी कृपा करावी अशी प्रार्थना केली आहे यावर सर्व संतांनी त्रिवार तथास्तु म्हणून आशीर्वाद दिला

## प्रार्थना २७ वी

**स्वस्वप्नः स्वातिरेकेण यथा नास्ति तथैव स्वजाग्रदपि स्वातिरेकेण नास्ति तेन अद्वितीयात्मानुभवः सम्यग्भूयादिति भवन्तो महान्तोऽनुगृण्हन्तु ॥ तथास्तु०॥२७॥**

**विवरण** – जीवाच्या जागृती स्वप्न व सुषुप्ती अशा तीन अवस्था आहेत. त्या पैकी स्वप्नसृष्टी ही एक जीवाचीच अवस्था आहे. या वेळी सर्व इंद्रियांचे व्यवहार बंद असले तरी जागृतीमध्ये अनुभवलेले विषय मायामय असे त्यावेळी निर्माण केलेले असतात. म्हणून स्वतःचे स्वप्न स्वस्वरूपच असते. स्वप्नांचे अनेक प्रकार पाहावयास व वाचावयास मिळतात. काही स्वप्नांमध्ये सद्गुरुप्रसाद मिळतो. तो जागेपणी खरा झालेला असतो. प. पू. सद्गुरु महाराजांच्या मातोश्रींना स्वप्नात मिळालेल्या चांदीच्या पादुका आजही श्रीवासुदेव निवासात प्रत्यक्ष आहेत व त्रिकाळ पूजा अर्चा घेत आहेत. किंवा नरसोबावाडीस सेवा करीत असताना एकसंबे गावच्या बाईला दुपारच्या वेळी स्वप्नात येऊन श्रीदत्त महाराजांनी ८० वर्षापूर्वी दिलेला नारळ आजही एकसंबे गावी आहे. अशा प्रकारची जी सद्गुरुकृपा ईश्वरकृपारूप असते ती स्वप्नकाळात स्व म्हणजे आत्मरूप असली तरी परिणामी म्हणजे जागृत अवस्थेमध्ये त्याचा परिणाम व्यावहारिक सत्य असतो. परंतु सर्व सामान्य स्वप्न हे मिथ्याच असते. पण स्वप्नकाळात दिसणारे पदार्थ स्वकल्पित व स्वस्वरूपच असतात. योगसूत्रामध्ये "स्वप्न निद्रा ज्ञानालंबनं वा" या सूत्रात चित्त हे स्वप्नाचे आश्रयस्थान असते असे वर्णन केले आहे व या सूत्राच्या व्याख्येमध्ये विवृतीकारानी बाह्येंद्रिय वृत्तीशून्य मनोमात्रानेच आत्म्याचे भोक्तृत्व म्हणजे स्वप्न अशी व्याख्या केली आहे. अर्थात् स्वप्न ही एक आत्म्याचीच अवस्था आहे. ब्रह्मसूत्र भाष्यामध्ये संध्ये सृष्टि राह हि" या सूत्राचे भाष्य करताना पू. आचार्यांनी स्वप्नसृष्टी स्वकल्पित असून मिथ्या आहे याचे प्रतिपादन केले आहे. एवंच आत्मा स्वप्नावस्थेमध्येही अखंड अनुस्यूत आहे फक्त त्यावेळचे विषय हेच मायामय असतात. जागेपणी ते सर्व मिथ्याच प्रतित होतात. पंचपक्वान्नांचे भोजन करून झोपलेला राजा स्वप्नामध्ये भूक भागविण्यासाठी चांडाळाच्या घरी शिळी भाकरी मागून खातो व गटारातील पाणी पिऊन तहान भागवितो व पुन्हा जागा होऊन पाहिलेले स्वप्न खोटे आहे असे म्हणतो. अशा वेळी दोन्ही अवस्थेतील राजा एकच. त्याप्रमाणे ही जाग्रदवस्था सुद्धा महास्वप्नच आहे व ह्या स्वप्नातून जागे होणे म्हणजे ब्रह्मज्ञान प्राप्त होणे. त्यावेळी हे मोठे स्वप्न खोटेच वाटते. ज्याप्रमाणे

आपले स्वप्न आपण निर्माण केलेले असते त्याप्रमाणे ही जाग्रदवस्था सुद्धा अज्ञानामुळे आपणच निर्माण केलेली आहे व ती अवस्थाही स्वतःचीच आहे. ह्या अवस्थेमध्ये अखंडात्मा हाच नित्य आनंदरूप आहे. अशा तीन्ही अवस्थेमध्ये एकच अखंड आत्मा आहे व ह्या सर्व अवस्था नाश पावणाऱ्या आहेत. असा बोध नेहमी सद्गुरुकृपेने असला म्हणजे दुःखच शिल्लक राहात नाही. संसारात जीवाला आपण अनेक दुःखांनी दुःखित झालो असे वाटत असते व दुःख निवृत्तीसाठी सद्गुरूंना शरण गेल्यावर सद्गुरू त्या अज्ञानी जीवाला असाच बोध करतात की तू तीन्ही अवस्थेमध्ये अखंड असून स्वप्न स्वतः व्यतिरिक्त नाही, जाग्रदवस्था स्वतःव्यतिरिक्त नाही व निद्रा स्वतःव्यतिरिक्त नाही. तीन्ही अवस्थेमध्ये तू अखंड सच्चिदानंदरूप आहेस. अशा प्रकारचा जो बोध आहे तो सर्वदा असावा अशी सद्गुरूंचे चरणी प्रार्थना केल्यावर महात्म्यांनी त्रिवार तथास्तु म्हणून आशीर्वाद दिला ।। २७ ।।

## प्रार्थना २८

**वासनाक्षयमनोनाशाभ्यां निर्वासने वृत्तिशून्ये चित्ते संशयविपर्यय दोषद्वयाऽभावेन प्रतिबंधाभावादुत्पन्नं ज्ञानमबाधेन सुरक्षितं भूयादिति भवंतो महांतोनुगृण्हन्तु ।। तथास्तु ।। २८ ।।**

**बिवरण** – श्रीमद्विद्यारण्यांनी जीवन्मुक्ती ग्रंथामध्ये वासनाक्षय व मनोनाश याबद्दल विस्ताराने वर्णन केले आहे. त्यातील संक्षेपरूमाने येथे विचार असा आहे. दृढ संस्काराने पूर्वापार विचार न करता पदार्थाचे जे ग्रहण त्याला वासना म्हणतात. तीव्र संयोगाने जो जे चिंतितो तो स्वतः तत्काल तद्रूपी बनतो व इतर पदार्थांचा त्याला विसर पडतो. तसा बनलेला पुरुष वासना परतंत्र जेव्हा त्या वस्तूकडे पाहातो तेव्हा ती वस्तू असत् असूनही ती सत् आहे असा त्यास मोह होतो. वासना वेगाच्या स्वाधीन होऊन मूळचे स्वरूप सोडून दुष्ट दृष्टीचा असा तो मदोन्मत्त पुरुषाप्रमाणे सर्व पदार्थ भ्रांतिमय पाहातो. वासनेचे शुद्ध व मलीन असे दोन प्रकार आहेत. मलीन वासना पुनर्जन्माला कारण आहे व शुद्धवासना ज्ञानद्वारा जन्मनाशक असते. शहाणे लोक सांगतात की मलीन वासना अज्ञानाने घट्ट आकार धारण करणारी व दृढ अहंकाराने युक्त व जन्ममृत्यू देणारी अशी आहे. शुद्ध वासना पुनर्जन्माचा अंकुर टाकून भाजलेल्या बियांप्रमाणे काही वेळ देह धारणासाठी उपयोगी पडते व जिच्यात ज्ञेयाचे ज्ञान होते अशी आहे. अशुद्ध वासनेचे तीन प्रकार आहेत. १ लोकवासना २ शास्त्रवासना ३ देहवासना. सर्व लोक माझी स्तुती करतील, निंदा करणार नाहीत असाच मी सर्वदा वागेन असा मनाचा आग्रह असणे म्हणजे लोकवासना होय. लोकवासनेत मी वागतो ते निंद्य अशी भावना असल्यामुळे त्यास मलीन असे म्हटले आहे. शास्त्रवासनेचेही तीन प्रकार आहेत. १ पाठ व्यसन, २ पुष्कळ शास्त्रांच्या अध्ययनाचे व्यसन व ३ अनुष्ठान व्यसन. ह्या तीन्ही प्रकारांमध्ये

पाठ, अनुष्ठान व अध्ययन हे सर्वांपेक्षा चांगले असावे इकडेच लक्ष असते. आत्मस्वरूपाकडे लक्ष नसते. म्हणून ही वासना पण मलीन आहे असे वर्णन केले आहे. आता देहवासना राहिली. ही पण तीन प्रकारची आहे. १ आत्मत्वभ्रांती, २ गुणाधानभ्रांती व ३ दोषापनयन भ्रांती. त्यापैकी चार्वाक मताप्रमाणे चैतन्य विशिष्ट देह म्हणजे आत्मा अशी कल्पना म्हणजे आत्मत्वभ्रांती. दुसरी गुणाधानभ्रांती. ही दोन प्रकारची आहे. १ लौकीक, २ शास्त्रीय. आपला आवाज वगैरे उत्तम होण्याकरिता जे संस्कार करतात ते पहिले व आपला आवाज गोड असावा म्हणून त्याला अनुकूल पदार्थांचे सेवन करणे किंवा आपण चांगले दिसावे म्हणून शरीर प्रसाधन करणे. ह्या सर्व गोष्टी मलीन वासनेचेच प्रकार होत. देहवासनेतील तिसरा प्रकार दोषापनयन भ्रांती. ही वासना म्हणजे वैद्यकीय शास्त्राप्रमाणे औषध वगैरे सेवन करून देह चांगला ठेवण्याच्या मागेच लागणे होय. सारांश प्राण्याला लोकवासनेने, शास्त्रवासनेने व देहवासनेने यथायोग्य आत्मसाक्षात्कार उत्पन्न होत नाही व दंभ, दर्प वगैरे प्राप्त होऊन नरकाला कारण असल्याने मलीन असे म्हटले आहे म्हणून या वासनांचा नाश करण्यास सांगितले आहे. प्रार्थनेत अशा वासनांचा त्याग व मनाच्या सर्व वृत्ती टाकून चित्त स्थिर झाले म्हणजे अनेक प्रकारचे संशय व विपरीत भावना हे दोन दोष नाहीसे झाल्यामुळे ब्रह्मज्ञानाला अडथळाच उत्पन्न होत नाही व शुद्ध आत्मज्ञानाचा अनुभव येतो. अशा प्रकारचे तत्त्वज्ञान सतत असावे अशी सद्गुरू व महात्म्यांचे चरणी प्रार्थना केल्यावर सर्व महात्म्यांनी तथास्तु म्हणून त्रिवार आशीर्वाद दिला.

## ॥ श्रीललितासहस्रनामस्तोत्रम् ॥

## पूर्वभागः द्वितीयोध्यायः लेखांक ९ वा

लेखक : श्री. मुरलीधर माधव घाणेकर, एम्. ए.

परमपूजनीय योगीराज श्रीसंत गुळवणी महाराजांच्या शुभ आशीर्वादेकरून मागील वर्षीच्या अखेरच्या अंकात श्रीललितासहस्रनामातील १११ नामांचे विवरण संपले. आता नवीन वर्षाच्या पहिल्या अंकात श्रीदेवीच्या ११२ व्या नामापासून आरंभ होत आहे. महाभारत, इक्षुदंड, सिंधू आणि इंदू यांच्या संबंधी एका कवीने म्हटले आहे की या चारही स्थळात प्रत्येक पर्वापर्वात रसोदय आढळतो. तसेच काहीसे ललितासहस्रनामाविषयीही म्हणता येईल. तेथे कवीने 'प्रतिपर्व रसोदयः' असे म्हटले तर तेथे 'प्रतिनाम रसोदयः' असे म्हणता येईल. याची प्रतीती "प्रकोष्ठे धृतस्य परिहार्यस्य निवेदने किं आदर्शस्य प्रयोजनम्" या न्यायाने पूर्वी आली आहे. आता येत असणाऱ्या देवीनामातही आहे व यापुढे येणाऱ्या नामातही आढळून येईल.

# श्रीमद् विद्यारण्यस्वामी विरचित सार्थ सद्गुरु-प्रार्थना

लेखक – श्री. वामन आत्माराम जेरे, वाई

## प्रार्थना २९ वी

पंचम्यादि भूमित्रयरूपायां जीवन्मुक्तौ संपाद्यमानायां द्वैतभासाभावेन संशय विपर्ययप्रसंगाभावादुत्पन्नं तत्त्वज्ञानमबाधेन सुरक्षितं भूयादितिभवंतो महांतोनुगृण्हन्तु ॥ तथास्तु० ॥ २९ ।

**विवरण** – मागील प्रार्थनेमध्ये वासना व वासनाक्षयाचे निरूपण झाले. वासनाक्षय झाल्यानंतर प्राप्त झालेल्या अवस्थेस "जीवन्मुक्त अवस्था" असे म्हणतात. अशा जीवन्मुक्ताचे व ज्ञानाच्या सात भूमिकांचे वर्णन चालू २९ व्या प्रार्थनेत केले आहे. शास्त्रश्रवण, संतसंगती व भगवद्भक्ती केल्याने मानवाला जगाची नश्वरता व दोषदृष्टी प्राप्त होते. संसाराबद्दल तीव्र वैराग्य प्राप्त होऊन स्वस्वरूपाच्या प्राप्तीसाठी जो मानव प्रयत्न करीत असतो त्यास साधक म्हटले आहे. असा साधक साधना करू लागला म्हणजे सद्गुरुकृपेने ज्या एकेक अवस्था त्याला प्राप्त होत असतात त्या अवस्थांना भूमिका असे म्हटले आहे. जीव पूर्ण ब्रह्मस्वरूपच आहे परंतु अज्ञानाने आपण कोण आहो हे तो विसरतो व पुनः ती पूर्णावस्था प्राप्त होईपर्यंत त्याला सात मजले चढावे लागतात. त्या एकेक मजल्यावर गेल्यावर त्याची कशी स्थिती असते हे योगवसिष्ठामध्ये वर्णन केले आहे. त्या सात भूमिकांची नावे अशी आहेत. १ शुभेच्छा, २ विचारणा, ३ तनुमानसा, ४ सत्त्वापत्ती, ५ असंसक्ती, ६ पदार्थभाविनी, ७ तुर्यगा. त्यापैकी १ शुभेच्छा म्हणजे मी मूर्खासारखा स्वस्थ काय बसलो. शास्त्रांची व सज्जनांची संगती धरावी व जगाचे निरीक्षण करावे. अशी वैराग्य व शुभविषक जी इच्छा ती शुभेच्छा. ही पहिली भूमिका. २ शास्त्रांची आणि सज्जनांची संगती करून प्राप्त झालेल्या वैराग्याने सद्विचाराकडे म्हणजेच आत्मविचाराची प्रवृत्ती होणे ही विचारणा नावाची दुसरी भूमिका होय. ३ शुभेच्छा व विचारणा या दोन भूमिकांमुळे इंद्रियांना प्रवृत्त करणाऱ्या विषयांकडे ओढ नसणे किंवा ती ओढ कमी कमी होत जाणे या तिसऱ्या भूमिकेला तनुमानसा असे म्हणतात. ४ वर वर्णन केलेल्या तीन भूमिकांच्या सतत अभ्यासाने चित्तात सतत जगाविषयी वैराग्य उत्पन्न झाल्याने शुद्ध सत्त्वस्वरूपामध्ये, मनाची जी स्थिती तिला सत्त्वापत्ती असे म्हणतात. ही

चौथी भूमिका होय. पहिल्या तीन भूमिकात जाग्रत म्हणजे भेदभावाने जगताचे भान साधकाला होत असते. पण चौथ्या भूमिकेला मात्र स्वप्नावस्था म्हणजे सर्व जगत् स्वप्नाप्रमाणे तो पाहात असतो. ह्या भूमिकेत वेदान्त वाक्याने निर्विकल्प ब्रह्मात्मैक्य साक्षात्काररूपी सत्त्व प्राप्ती होऊन सर्व जगत मिथ्या म्हणून पाहू लागतो व द्वैत भावना नाहीशी होते. ह्या अवस्थेतील साधकाला ब्रह्मविद् असे म्हटले आहे. पुढे पांचवी सहावी व सातवी अशा ज्या तीन भूमिका आहेत. त्यांना सुषुप्ती अशी संज्ञा आहे. ह्या शेवटच्या तीन भूमिका म्हणजे जीवन्मुक्तीचेच अवांतर भेद मानले आहेत. पाचव्या भूमिकेत सविकल्प समाधीच्या अभ्यासाने निर्विकल्प समाधी प्राप्त होते व त्यावेळी तिला असंसक्ती किंवा सुषुप्ती असे म्हणतात. आपण सुषुप्तीमध्ये असलो म्हणजे ब्रह्मस्वरूपच असतो व पंचभूमिकेतील योगीसुद्धा जगाचे अभान असल्यामुळे सुषुप्ती अवस्थेमध्येच असतो. परंतु सांसरिक जीव झोपला असता झोपेनंतर भासणाऱ्या द्वैतरूप जगाची बीजे शिल्लक असतात व योग्याची ती द्वैतभानाची बीजे शिल्लक नसतात. हा फरक दोघांच्या सुषुप्तीमध्ये असतो. अशा पंचम भूमिकेस प्राप्त झालेल्या योग्यास "ब्रह्मविद्वर" असे म्हणतात. असा ब्रह्मविद्वर सुषुप्तीतून स्वतःहून भानावर येतो. परंतु पंचम भूमिकेच्या अभ्यासाच्या परिणामाने जेव्हा गाढ व बराच काळ निद्रावस्थेप्रमाणे अवस्था प्राप्त झाली असता कोणत्याच बाह्य पदार्थाचे भान होत नाही तेव्हा त्या अवस्थेला गाढ सुषुप्ती असे म्हणतात. त्यावेळी स्वतोव्युत्थान न होता दुसऱ्याकडून त्यास देह भानावर आणावा लागतो. ही सहावी पदार्थाभाविनी भूमिका प्राप्त झालेल्या योग्यास "ब्रह्मविद्वरीयान्" असे म्हणतात.

सातव्या तुर्यगा नावाच्या भूमिकेत समाधी अवस्था प्राप्त झाली असता त्या योग्याचे स्वतोव्युत्थान किंवा परतोव्युत्थान होत नाही. "ब्रह्मानंदी लागली टाळी कोण देहाते सांभाळी" अशी अवस्था प्राप्त होते. कोणताच भेद दिसत नसल्याने तो सर्वदा ब्रह्ममय अवस्थेत असल्याने स्वतः प्रयत्न न करता परमेश्वराने प्रेरणा केल्या जाणाऱ्या प्रयत्नाने प्राणवायू चालत असतो. इतर लोकांकडूनच त्याचा नित्य व्यवहार चालत असतो व सर्वदा तो परिपूर्ण परमानंदघन अवस्थेतच राहात असतो. अशा अवस्थेतील ज्ञान्याला "ब्रह्मविद्वरिष्ठ" असे म्हणतात व तोच जीवन्मुक्त असे म्हटले जाते. देवहूती, शुक्राचार्य, सदाशिव ब्रह्मेंद्र इत्यादी अनेक महात्मे अशा कोटीला प्राप्त झाले होते. या सातांपैकी पहिल्या तीन भूमिका ब्रह्मज्ञानाचे साधनच आहे. त्यांचा जीवन्मुक्तांमध्ये समावेश होत नाही कारण त्या तीन भूमिकांमध्ये भेद दर्शन असते. चौथ्या भूमिकेत; द्वैत लयाला गेले, अद्वैत स्थिर झाले असा जगताचा स्वप्नवत् विचार ज्ञानी करतो. परंतु पाचव्या भूमिकेपासून संशय किंवा विपरीत बुद्धी असल्याने अध्यात्मज्ञान अबाधितपणाने असते. तेच

तत्त्वज्ञान सदैव राहावे अशी प्रार्थना येथे केली आहे. अशा अवस्थेतील जीवन्मुक्तांची काही लक्षणें पुढीलप्रमाणे दिसून येतात. जीवन्मुक्ताला जग जिथल्या तेथे असून चिदाकाश स्वरूपाने भासते. त्याचे सर्व व्यवहार आत्मदर्शनपूर्वक होतात. मानसन्मान वगैरे आनंदाचे प्रसंग आले किंवा अपमानजनक दुःखाचे प्रसंग आले तरी त्याची स्वतःची आनंदावस्था सदैव एकरूप असते. अभ्यासाने समाधी दृढ झाल्यामुळे जीवन्मुक्ताला माला चंदन वगैरेची प्रचीतीच होत नाही. जीवन्मुक्त सुषुप्तीत असून जागा असतो व त्याचे ज्ञान कामादिवासनारूपी बुद्धिदोषाने रहित असते. भोजनादिकाबद्दल प्रेम, नास्तिकादिकाबद्दल द्वेष सर्पादिकापासून भय व स्वतःप्रमाणे जीवन्मुक्त अवस्थेला प्राप्त झालेल्या कोटीच्या लोकांबद्दल मत्सर ह्या वृत्ती जीवन्मुक्तामध्ये कधीच नसतात. तो लोकाना कंटाळत नाही व लोक त्याचा कंटाळा करीत नाहीत. त्याच्या अंगी अनेक कला असून त्याबद्दल त्याला अभिमान नसतो. अंतःकरण असून त्यावर वृत्ती उत्पन्न होत नाहीत. दुसऱ्याच्या घरी आनंददायक घटना झाली असता आनंद व दुःखाची घटना झाली असता व्यावहारिक, दुःख व दुःखामध्ये समभागी होऊन स्वतःचा मूळ आनंद विचलित न होणारा असजीवन्मुक्त असतो. अशा जीवन्मुक्तस्थितीतील आनंद अवस्था सतत टिकून राहाण्याचा आशीर्वाद महात्म्यांनी द्यावा अशी प्रार्थना श्रीमद्विद्यारण्यांनी २९ व्या प्रार्थनेत केल्यावर महात्म्यांनी त्रिवार तसेच असो असा आशीर्वाद दिला. ।। २९ ।।

## प्रार्थना ३० वी

स्वप्ने स्थूल शरीराभाने सुप्तौ लिंग शरीराभाने समाधौ कारण शरीराभाने च जाग्रदाद्यवस्था चतुष्टये यश्चिदात्मा मणिषु सूत्रमिवानुस्यूततया निरंतरं भासते स चिद्रूपात्मैवाहमस्मीत्यन्वयव्यतिरेकाभ्यां शरीरत्रयस्य व्यावृत्तिं तत्साक्षिचैतन्यस्यानुवृत्तिं च पश्यतो मम शरीरत्रय व्यतिरिक्तात्मानुभवसिद्धिर्भूयादिति भवंतो महन्तोऽनुगृण्हन्तु । तथास्तु० ।। ३० ।।

**विवरण** – मानवाला जीवनामध्ये चार अवस्था अनुभवावयास मिळतात जागृती, स्वप्न, सुषुप्ती व समाधी. त्यापैकी जागृतीमध्ये स्थूल व सूक्ष्म शरीरांचे ज्ञान परोक्ष – अपरोक्ष प्रमाणांनी होत असते पण स्वप्नामध्ये स्वतःच्या स्थूल शरीराचे भान नसते. त्या ठिकाणी स्वतःचे शरीर दिसते ते स्वनिर्मित असते. परंतु त्यावेळी सुखदुःखांचे अनुभव घेणारा आत्मा मात्र तोच असतो व त्याचे भान असते. तसेच सुषुप्तीमध्ये वासनामय लिंग ( सूक्ष्म ) शरीराचे भान होत नाही, परंतु सुखानुभव आत्म्याला होत असतो. कारण जागे झाल्यावर मी सुखाने झोपलो होतो असे तो म्हणत असतो. म्हणून लिंग शरीराचे भान न होता साक्षीरूपाने आत्म्याचे भान होत असते. त्याचप्रमाणे अनेक धर्मांचा वर्षाव करणाऱ्या समाधी-

मध्ये कारणशरीर म्हणजे सुषुप्ती शब्दाने ओळखले जाणारे अज्ञान भासत नाही. त्यावेळी फक्त आत्म्याचेच भान होत असते. म्हणून जागृती, स्वप्न सुषुप्ती व समाधी ह्या चारीही अवस्थेमध्ये एक आत्मा भासत असतो. स्वप्नामध्ये स्थूल शरीराचे भान न होता साक्षीरूपाने आत्म्याचे भान होणे याला अन्वय असे म्हणतात व आत्म्याचे भान होत असता स्थूल शरीराचे भान न होणे याला व्यतिरेक असे म्हणतात. तसेच निद्रेमध्ये लिंग ( सूक्ष्म ) शरीराचे भान न होता आत्म्याचे भान होणे म्हणजे अन्वय व आत्म्याचे भान होत असता लिंग शरीराचे भान न होणे हा व्यतिरेक होय. याचप्रमाणे समाधीमध्ये सुषुप्ती शब्दाने उपलक्षित अज्ञान म्हणजे कारण शरीर याचे भान न होता आत्म्याचे भान होते हा अन्वय व त्यावेळी आत्म्या-चेच भान असते कारण शरीराचे अज्ञानाचे भान होत नाही हा व्यतिरेक होय. अशाप्रकारे सर्व अवस्थांमध्ये अवस्था बदलल्या तरी आत्म्याचे भान अखंड असते. या ठिकाणी दृष्टांत माळेचा दिला आहे. माळेत फुले अनेक असतात परंतु दोरा एकच असतो. तसा सर्व अवस्थांमध्ये आत्मा सच्चिदानंदघन असा एकच आहे. लहानपणी जो मी विद्यार्थीदशा भोगीत होतो तोच तरुणपणी पुत्राचे सुख अनुभवून आता म्हातारपणी नातवंडांचे सुख अनुभवीत आहे असे म्हणणारा आत्मा एकच असतो अवस्था मात्र वेगळ्या असतात. भगवद्गीतेमध्ये " वासांसि जीर्णानि यथा विहाय नवानि गृण्हाति नरोऽपराणि " या श्लोकात अनेक शरीरांमध्ये आत्मा एकच अनुस्यूत आहे असे प्रतिपादन केले आहे. अशा प्रकारचा सर्व अवस्थेमध्ये व सर्वस्थितीमध्ये निरंतर भासणारा सच्चिदानंदघनस्वरूप असा आत्मा मीच आहे व तो स्थूल, सूक्ष्म, व कारण शरीराहून वेगळा आहे असे ज्ञान प्रत्येक क्षणाला असणे हेच मानवाचे कर्तव्य आहे. सर्वदा साक्षी आत्मा जागृत असूनसुद्धा देहादि-कांचा अध्यास घेऊन मानव स्वतःच्या आनंदाला मुकला व कृत्रिम विषयानंदाला आनंद समजू लागला व स्वतःची ओळख विसरून गेला ही महती विनष्टी आहे. म्हणूनच श्रीमद् विद्यारण्यांनी देहत्रयातीत आत्म्याची अनुभूती सर्वदा असावी अशी प्रार्थना केल्यावर तथास्तु म्हणून संतांनी आशीर्वाद दिला ।। ३० ।।

## प्रार्थना ३१ वी

भगवन्तं प्रीतिपूर्वकं भजतो ममोपर्यनुकंपार्थं भगवान् वासुदेवो ममात्मभावस्थः सन् विवेक प्रत्ययरूपेण भक्तिप्रसादस्नेहाभिषिक्तेन मद्भावनाभिनिवेश वातेरितेन ब्रह्मचार्यादि साधन संस्कारवत्प्रज्ञावर्तिना विरक्तान्तःकरणाधारेण विषयव्यावृत्त चित्तरागद्वेषाकलुषित निवातापवरकस्थेन नित्यप्रवृत्त प्रत्ययैकाग्र्यध्यानजनित सम्यक्दर्शन भास्वता ज्ञानदीपेनाज्ञानजमविवेकतो जातं मिथ्याप्रत्ययरूपं मोहान्धकारं तमो नाशयत्वित्याशीर्निरंतरं भूयादिति भवन्तो महान्तोऽनुगृह्णन्तु ॥ तथास्तु ॥०३१॥

**विवरण** – श्रीमद् भगवद्‌गीतेमध्ये अध्याय १० श्लोक १० व ११ मध्ये भगवंताची अशी प्रतिज्ञा आहे की– "तेषां सतत युक्तानां भजतां प्रीतिपूर्वकम् । ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयान्ति ते ॥ १० ॥ तेषामेवानुकम्पार्थं महमज्ञानजं तमः । नाशयाम्यात्मभावस्थी ज्ञानदीपेन भास्वता ॥ ११ ॥" वरील दोन श्लोकातील प्रतिज्ञा लक्षात घेऊन भक्तीचा महिमा ह्या प्रार्थनेत वर्णन केला आहे व भक्तिभावाला वश होणाऱ्या भगवान् वासुदेव परमात्म्याचीच कृपा होण्याबद्दल प्रार्थना केली आहे. "ज्ञानदेवतु कैवल्यं" हा सिद्धान्त जरी असला तरी भक्तीशिवाय ज्ञानप्राप्ती होत नाही. संत एकनाथांनी "भक्तिप्रेमावीण ज्ञान नको देवा" अशा वचनाने भक्तीचा महिमा वर्णिला आहे. परमकोटीला पोहोचलेल्या महात्म्यांनी "भक्ती ज्ञानाची माउली" असेच वर्णन केले आहे व वरील श्लोकामध्येसुद्धा प्रत्यक्ष भगवंतानेही प्रेमपूर्वक भक्ती करणाऱ्याला बुद्धियोग म्हणजे ज्ञानयोगरूपी समाधी मी देतो असे म्हटले आहे. श्रीमद् विद्यारण्य हे स्वतः प्रीतीपूर्वक भगवंताची भक्ती करीत होते हे त्यांच्याच प्रार्थनेत दिसून येते. परमेश्वराला भक्तीचे नाटक आवडत नाही. तर प्रेमपूर्वक भक्ती आवडते अशी भक्ती करणारा कोणीही असला तरी त्याच्या हृदयामध्ये वास्तव्य करून भगवान त्याला प्रेम व सद्‌बुद्धी देतो. श्रीज्ञानेश्वर माउली म्हणतात, "पैं गा भक्तासी माझे कोड । मज तयाचे अनन्य गतीची चाड । कां जे प्रेमळांचे सांकड । आमुचिया घरी ॥" प्रेमभक्ती याचा अर्थ थोडक्यात इतकाच की, ज्याप्रमाणे स्वतःचे किंवा स्वतःच्या स्त्रीपुत्रादिकांच्याबद्दल आपले सर्व व्यवहार जितक्या कळकळीने होतात तितक्या कळकळीने सर्व व्यवहार ईश्वराबद्दल असणे यालाच प्रेमळ भक्ती म्हणतात. याचे थोडक्यात उदाहरण देऊन पुढील विवेचन करतो. नरसोबावाडीस प. पू. शांतानंदस्वामी म्हणून परमभक्त होते. ते ज्यावेळी महापूजा करीत त्यावेळी सकाळी देवापुढे जाऊन एक लाडू व थोडे पाणी ठेवून असे म्हणत की, "महाराज आज महापूजा होऊन भोजनास फार उशीर होणार आहे तरी एवढा लाडू खाऊन पाणी प्यावे म्हणजे बरे." असो. विद्यारण्य म्हणतात, अशा प्रेमळपणाने भक्ती करणाऱ्या माझ्यावर कृपा करण्यासाठी भगवान् समग्र, ऐश्वर्य, सामर्थ्य, यश, लक्ष्मी, ज्ञान, वैराग्य इत्यादी गोष्टींनीयुक्त असा वासुदेव स्थिरचरामध्ये वास्तव्य करणारा अर्थात् माझ्या आत्मस्वरूपामध्ये आत्मभावस्थ आत्माकार अंतःकरण वृत्तीमध्ये राहून – "तत्त्वमसि" अशा महावाक्याने प्रकट होणारे चिदात्मस्वरूप ते प्रकट करण्यासाठी ज्ञानरूप दिव्याने अज्ञानरूपी अंधकार नष्ट करो अशा रूपकाने प्रार्थना केली आहे. दीपक कसा व अंधार कसा याची विशेषणे देऊन वर्णन केले आहे. विवेक प्रत्ययरूपेण–आत्मा कोणता व अनात्मा कोणता अशा विचाराच्या व भक्तिप्रसाद स्नेहाभिषिक्तेन – परमेश्वराचे ठिकाणीच भक्ती केल्यामुळे परमे-

श्वराची कृपारूपी तुपाने भिजलेल्या व मद्भावनाभिनिवेशवातेरितेन-ज्याप्रमाणे दिव्याची वात मध्येच मंद होऊ लागल्यावर काडीने पुढे करावी लागते त्याप्रमाणे परमेश्वराच्या भक्तीच्या आग्रहरूपी वाऱ्याने मोठा केलेल्या तसेच ब्रह्मचार्यादी साधन संस्कारवत्प्रज्ञावर्तिना – आठ प्रकारचे ब्रह्मचार्य व शमदमादी साधनांच्या संस्काराने युक्त जी बुद्धी तीच एक वात त्याठिकाणी असलेल्या व विरक्तान्त-करणाधारेण–वैराग्ययुक्त अंत:करणरूपी पणतीमध्ये असलेल्या–विषयव्यावृत्त-चित्तरागद्वेषाकलुषित निवातापवारकस्थेन–विषयापासून निवृत्त चित्तातील प्रेम, द्वेष इत्यादी भावनांनी रहित अंत:करणरूपी निवाऱ्याच्या जागी असलेल्या–नित्य-प्रवृत्तैकाग्रचध्यान जनितसम्यग्दर्शनभास्वता–सतत एकांतामध्ये बसून निश्चलपणाने केलेले जे परमात्म चिंतन किंवा मीच सर्वत्र भरलो आहे असे चिंतन करून प्राप्त झालेली जी शुद्ध दृष्टी त्या शुद्ध दृष्टीच्या प्रकाशाने युक्त असलेल्या ज्ञानदीपेन–ज्ञानरूपी दिव्याने–अज्ञानजं अज्ञाना ( शरीर म्हणजे मी किंवा द्वैतभान ) पासून निर्माण झालेले–अविवेकतोजातं–आत्मा अनात्मा यांच्याबद्दल विचार नसणे मी व माझे अशा भावनेने संसार सागरात गोते खाणे अशा अविवेकाने निर्माण झालेले जे मिथ्या प्रत्ययरूपम्–भ्रमात्मकज्ञान असलेला मोहान्धकारम्–मोहरूपी अंधार हृदयस्थ वासुदेवा परमात्मा नष्ट करो असा आशीर्वाद माहात्म्यांनी देण्याची कृपा करावी अशी प्रार्थना केल्यावर सद्गुरूंनी त्रिवार तथास्तु असे म्हटले ॥ ३१ ॥

संपादक व प्रकाशक : के. रा. जोशी, ७६।३ 'श्री', चिपळूणकर पथ, एरंडवन, पुणे ४.
मुद्रक : रा. शं. नेलेकर, श्री नाथ प्रिंटिंग प्रेस: ३३५, शनवार पेठ, पुणे ३०.

# श्रीमद् विद्यारण्यस्वामी विरचित सार्थ सद्गुरु-प्रार्थना

लेखक :—श्री. वा. आ. चेये, वाईः

परमेश्वर प्रीतिपूर्वकं भजंतो ये भक्ता येन बुद्धियोगेन सम्यग्दर्शनलक्षणेन आत्मभूतं परमेश्वरमात्मत्वेनोपयंति प्रतिपद्यंते तं बुद्धियोगं भगवान्वासुदेवो ददा-त्वित्याशीर्निरंतरं भूयादिति भवंतो महान्तोऽनुगृण्हन्तु ।। ३२ ।।

विवरण—श्रीमद् भगवद्गीतेमध्ये "तेषां ततयुक्तानां भजतां प्रीतिपूर्वकम् । ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयान्ति ते ।। (अ. १० श्लो. १०) असे वर्णन केले आहे. त्याचा तात्पयार्थ असा की, भगवंताचे ठिकाणी सतत एकनिष्ठ राहून कोणत्याही फळाची इच्छा न धरता प्रेमाने भजन करणाऱ्या भक्तांना मी तत्त्वज्ञान देतो व त्या तत्त्वज्ञानामुळे असे भक्त माझ्या स्वरूपास प्राप्त होतात, म्हणजे परमेश्वरच होतात. अशा गीतेच्या आशयातून श्रीमद्विद्यारण्य लिहितात की, परमेश्वराचे भजन स्नेहपूर्वक होणे हे भगवंताला अतिप्रिय आहे. ते भक्त परमेश्वराला फार आवडतात कारण कोणतीही अभिलाषा न धरता ते भक्ती करीत असतात. निरिच्छपणाने भजन करण्यामध्ये जे प्रेम असते तसे कामनिक भजनामध्ये प्रेम नसते म्हणून सकाम भक्त इच्छा पूर्ण करून त्यांच्यापसून तो दूरच राहतो. व्यवहारातसुद्धा आपण पहातो की मागणाऱ्या पासून लोक दूरच राहात असतात. निष्काम भक्त मात्र भगवंताचे प्रेमच इच्छित असतात व ते भगवंताची भक्ती प्रेमानेच करीत असतात. श्रीनाथ महाराजांनी सुद्धा "प्रेम सुख देई । प्रेम सुख देई । प्रेमाविण नाही । समाधान ।।" असे म्हटले आहे. प्रेमाशिवाय भक्त म्हणजे वेश्येने केलेल्या शृंगाराप्रमाणेच आहे. म्हणून श्रीज्ञानेश्वर माउली सुद्धा हेच सांगतात की, भक्त प्रेमळच असतो. त्यास परमेश्वराने प्रेम अर्पण करण्याच्या आधीच त्याने ते प्राप्त करून घेतलेले असते. "तया मग जे आम्ही काही । द्यावे अर्जुना पाही । ते ठायीचीच तिही । घेतली सेल ।" अशा प्रेमळ भक्ताला भगवान बुद्धियोग देतात म्हणजे "सम्यक् दर्शन" नावाचा बुद्धियोग देतात. ऐहिक स्त्री पुत्र, धन, मान, ऐश्वर्य अधिकार वगैरे इच्छा व स्वर्गातील सुखे किंवा कैलास, वैकुंठादी लोकात राहाण्याची इच्छा ह्या सर्व गोष्टींची अभिलाषा भगवत्स्वरूप प्राप्तीला प्रतिबंधक आहे व परमात्मस्वरूपाची प्राप्ती हाच खरा पुरुषार्थ आहे. असे ज्ञान म्हणजे "सम्यक् ज्ञान" होय. ते ज्ञान प्रेमळ भक्ताला भगवत्कृपेने प्राप्त होते. अशा प्रकारचा बुद्धियोग प्राप्त होण्यास भगवंताची कृपा होणे आवश्यक आहे. पण परमात्मदर्शन झालेल्या महात्म्यांची संगती होऊन त्यांनी जर आशीर्वाद दिला तर तशी भगवत् कृपा सहज होऊ शकते. कारण भगवान भक्त पराधीन असल्याने महात्म्यांचा आशीर्वाद

होण्याचाच काय तो अवकाश असतो. परमात्मा त्वरित वर वर्णन केलेला बुद्धियोग देतो म्हणून श्रीमद्‌विद्यारण्य महात्म्यांना प्रार्थना करतात की भगवान वासुदेव म्हणजे स्थिरचरामध्ये जो व्यापून उरला आहे असा परमात्मा आत्मस्वरूप प्राप्तीचाच विचार करणारी बुद्धी देवो. असा आशीर्वाद आपण सतत द्यावा ॥ ३२ ॥

विकारमन्तरेण स्वाध्यस्तहं सर्वं साक्षादव्यवधानेन स्वरूपबोधेनेक्षते पश्यतीति साक्ष्यनुभव: सम्यग्भूयादिति भवंतो महांतोऽनुगृण्हन्तु ॥ ३३॥

विवरण:—संसाररूपी उलटया वृक्षावर जीव आणि शिव असे दोन पक्षी आहेत. त्यातील जीव नावाचा पक्षी स्वकर्माची बरीवाईट फळे चाखत असतो व शिव नावाचा पक्षी केवळ साक्षी म्हणून पाहात असतो. त्याप्रमाणेच तो साक्षी सर्वांनाच प्रकाशित करीत असत व तटस्थपणाने पाहात असतो असे साक्षीचे शास्त्रात वर्णन केले आहे. हे सर्व बाह्य आंतर जगत् स्व म्हणजे आत्म्याचे ठिकामी अध्यस्त आहे व हा अध्यास म्हणजे नसलेले भासणे होय. अज्ञानानेच अध्याय होत असतो. जसे दोरीवर साप भासणे, शिंपेवर चांदीचा भास होणे किंवा सूर्य किरणांवर जलाचा भास होणे हे अज्ञानामुळे भासत असते. अज्ञानी लोक त्याला खरे समजतात व त्याचा विकार म्हणजे परिणाम त्यांच्यावर होतो. परंतु जे लोक भासणाऱ्या गोष्टी खोटया आहेत असे म्हणतात त्यांना भासमान वस्तूपासून काहीच परिणाम होत नाही. अज्ञानी लोकाना सापाचा भ्रम होऊन कंप भीती वगैरे परिणाम होतो, शिंपेवर सूर्यकिरण पडल्यावर चांदी भासून आनंद होऊन घेण्याची प्रवृत्ती होणे व सूर्यकिरणांवर जलाचा भास होऊन ते मिळविण्यासाठी त्याकडे धाव घेणे हे परिणाम म्हणजें विकार दिसून येतात व जाणत्या मनुष्याला तसे भासले तरी ते खोटे समजून तटस्थ पणाने विकार न होता तो त्याकडे पाहात असतो. त्या प्रमाणेच या जगताचे आहे. हे भासमान सर्व जगत त्याबद्दल विचार करणारी बुद्धी व त्याचे ज्ञान करून घेणारी सर्व इंद्रिये ही सर्व त्या परमात्म्याच्या ठिकाणी अध्यासाने भासत असतात व जड जीवांचा जगत् या रूपाने सत्य मानून सर्व व्यवहार चाललेला असतो आणि सुख-दु:ख, मान-अपमान, चांगले-वाईट, इत्यादी विकार त्या जीवाला निर्माण होत असतात व त्याबद्दल तो क्लेशही भोगत असतो. वस्तुत: पाहाता या पैकी काहीच नसून अज्ञानामुळे आपणच खोटे निर्माण करून त्याचा अनुभव घेत असतो. परंतु याच्या उलट साक्षीचे आहे. साक्षी म्हणजे चेतन परमात्मा होय. ह्या परमात्म्यानेच मायेच्या म्हणजे स्वशक्तीच्या साहाय्याने हे सर्व निर्माण केले. जीव रूपाने त्यामध्ये तो व्यापून राहिला, अहंकारादी रूपाने सर्व व्यवहार चालू केले. म्हणजे सर्वांना भासविणारा तो होऊन सर्व गोष्टी प्रत्यक्ष पाहतो. पण त्यापैकी स्वत:कडे कोणताच विकार त्याला प्राप्त होत नाही व त्याच्या शिवाय काहीच भासू

शकत नाही. सर्व नष्ट झाले तरी तो प्रकाशत असतो. असा तो साक्षी आहे म्हणजे पाहणारा आहे. पंचदशीमध्ये या बद्दल रूपक देऊन असे वर्णन केले आहे की ज्याप्रमाणे रंगमंचावर नाटकाचे वेळी जो दिवा असतो तो रंगमंचावर एखादी नर्तकी असते तिला, नाच पाहणाऱ्या राजाला, व सर्व प्रेक्षकांना उजेड देतो, प्रकाशित करीत असतो. खेळ संपून सर्व गेले तरी दिवा प्रकाश पाडतच असतो. त्याप्रमाणे ह्या जगतरूपी नाटचमंचावर बुद्धीरूपी नर्तकी जीवरूपी राजा, इंद्रिये व विषय ह्या सर्व प्रेक्षकांना साक्षी परमात्मा प्रकाशित करीत असतो. सर्वांकडे पाहात असतो व सर्व गेले तरी त्रिकालबाधित अखंडक रूपाने असतो. विद्यारण्य म्हणतात अशा साक्षीचे ठिकाणी अध्यस्त असलेले सर्व जगत जो साक्षी प्रत्यक्ष पाहातो व हे माझेच नित्य स्वरूप आहे अशा दृष्टीने व अभेद रूपाने पाहतो. असे पाहाणे म्हणजेच आत्मज्ञान होय. अशा प्रकारचा जो स्वात्मानुभव तो मला नीट व्हावा अशी प्रार्थना महात्म्यांच्या चरणी करून स्वात्मबोध म्हणजेच साक्षीअनुभव होण्याचा आशीर्वाद ब्रम्हनिष्ठांचे जवळ त्यांनी मागितला.

देहेंद्रियादि सकल जडावभासकत्वेन चिद्रप इति चिदनुभवः सम्यग्भूयादिति महान्तोऽनुगृण्हन्तु ॥ ३४ ॥

विवरण :—पूर्वीच्या प्रार्थनेत साक्षी दीपाप्रमाणे प्रकाशित करणारा आहे याचे वर्णन झाले. या प्रार्थनेत आत्मा सर्वांना चिद्रूपाने कसा भासक आहे याचे वर्णन करतात. आपण व्यवहारात जड व चेतन असा व्यवहार करताना पर्वत, दगड, धोंडे वगैरेंना जड म्हणतो व आपण स्वतः देह असे समजून स्वतःला चेतन असे समजत असतो. पण शास्त्रात सत् चित् आनंद स्वरूप आत्मा हाच चेतन व देह इंद्रिये वगैरे सर्व जडच आहेत हे सर्व आपणास चेतनरूपाने भासतात. ते सर्व आत्म्याच्याच भासकत्वाने भासत असते. "तस्यभासा सर्वमिदं विभाति ॥ असे कठोपनिषदात म्हटले आहे. त्या आत्म्याच्या प्रकाशानेच सर्व म्हणजे सूर्य, चंद्र, नक्षत्र, अग्नी, विजा इत्यादी तेज सर्व जगाला प्रकाशित करीत असते. ते तेज सुद्धा चिद्रूप आत्म्यामुळेच दिसत असते. मग देह इंद्रिये हे सुद्धा त्या चेतन सर्वभासक आत्म्यामुळेच भासत असतात. सर्वत्र जड चेतन वाटणाऱ्या वस्तूंमध्ये आहे असे जे भान होते ते परमात्म्याचेच प्रथम भान होते व त्यानंतर घट पटादी वस्तू भासत असतात. "तमेव भान्तमनुभाति सर्वम् ॥ असे जे कठोपनिषदामध्ये वर्णन केले आहे त्याचाच हा अर्थ आहे. सर्व जीव इतर वस्तू दिसण्यास सूर्य चंद्रादी तेजच कारण मानतात. ते स्वयंप्रकाश आत्मतत्त्वाचा विचार न करताच मानत असतात. म्हणून श्रीविद्यारण्यांनी प्रार्थनेत असे सुचविले आहे की सर्व जगाला भासविणारा आत्माच आहे व तो चिद्रूप आहे. असा चित् अनुभव सतत नीट व्हावा असा अशीर्वाद महात्म्यांनी द्यावा हीच त्यांच्या चरणा जवळ प्रार्थना आहे.

# प्रार्थना ३५ वी

आत्मनि कदाचिदप्रियाभावेन परप्रेमास्पदत्वेन चात्मा परमानन्द रूप इति आनन्दात्मानुभवः सम्यग्भूयादिति भवंतो महान्तो नुगृण्हन्तु ।। ३५ ।।

विवरण :—ह्या प्रार्थनेत बृहदारण्यकोपनिषदातील याज्ञवल्क्य मैत्रेयी संवादातून प्रतिपादन केलेले आत्म्याचे परमानन्द स्वरूप प्रतिपादन केले आहे. प्रत्येक प्राणिमात्राला जगातील वस्तू प्रिय वाटतात. ते त्या वस्तूवरील प्रेमामुळे प्रिय नसून त्या वस्तूमुळे स्वतःला आनंद वाटतो म्हणून प्रत्येक जण आपल्यावरच प्रेम करतो. पतीसाठीं पत्नीला पती प्रिय वाटत नाही तर स्वतःला आनंद आहे म्हणून पती प्रिय वाटतो. याच प्रमाणे पतीला सुद्धा पत्नी प्रिय वाटते. जगात कोणतीही व्यक्ती, वस्तू, क्रिया प्रिय वाटत असतात त्या आपणास आनंद होतो म्हणूनच प्रिय असतात. अर्थात आपल्या आनंदासाठी त्या वस्तूवर व्यक्तीवर किंवा क्रियेवर जे प्रेम केले जाते ते त्यांच्यासाठी नसून आपल्यासाठीच असते. रोग क्रोध, अपमान अपयश वगैरे मुळे आत्महत्या केली जाते. ही क्रिया सुद्धा त्या परिस्थितीतून मुक्त होऊन आपणास आनंद वाटेल अशा भावनेतून आत्मप्रेमामुळेच आत्महत्यादी प्रवृत्ती दिसते. सारांश हात्र की आत्मा निरतिशय प्रेमविषयक असल्यामुळे परमानंदरूप आहे. जो परमानंदरूप नसतो तो निरतिशय प्रेम विषय नसतो. अशा उलट सुलट अनुमानाने आत्मा आनंदरूप व निरतिशय विषय आहे तसे कोणीच नाही असा शास्त्रसिद्धांत आहे. म्हणूनच श्रीविद्यारण्य प्रार्थनेत म्हणतात की—आत्म्याचे ठिकाणी केव्हाही अप्रिय नसल्याने परमप्रेमाचे तेच ठिकाण आहे. म्हणूनच आत्मा परमानंदरूप आहे. तेथे दुःखाचा लवलेशही नाही. अशा परमानंदस्वरूप आत्म्याचा आनंदानुभव महात्म्यांच्या कृपेने नेहमी होत राहावा अशी त्यांच्या चरणी प्रार्थना आहे व तसा आशीर्वाद महात्म्यांनी द्यावा. यावर सर्व महात्म्यांनी तथास्तु म्हणून त्रिवार आशीर्वाद दिला. ।। ३५ ।।